सोलापूर तरुण भारत
आसमंत



# नरेंद्र मोदींच्या युक्रेन दौऱ्यामागचे गणित?

लक्ष्यवेध

प्रतिनिधी

**लोकसभा निवडणुकीनंतर ताकही फुंकून प्यायला लागलेल्या लोकांना मोदींच्या युक्रेन दौऱ्यातून नेमके काय साध्य झाले? अमेरिकेने बांगलादेशमध्ये सत्तांतर घडवून आणल्यामुळे मनाविरुद्ध हा दौरा तर करावा लागला नाही ना? रशिया आणि युक्रेन यांच्यात समतोल साधायचा हा निष्फळ प्रयत्न आहे का? असे प्रश्न पडणे स्वाभाविक आहे. त्याचाच उहापोह करणारा हा लेख...**

युक्रेनला भेट देणारे नरेंद्र मोदी भारताचे पहिले पंतप्रधान बनले. मोदींच्या युक्रेन भेटीकडे संपूर्ण जगाचे लक्ष लागले होते. अवघ्या सहाच आठवड्यांपूर्वी मोदींनी पंतप्रधानपदाच्या आपल्या तिसऱ्या टर्ममधील पहिल्या द्विपक्षीय दौऱ्यासाठी रशियाची निवड करून सगळ्यांनाच धक्का दिला होता. मॉस्कोमध्ये मोदींनी पुतीन यांना आलिंगन दिले असता, पाश्चिमात्य देशांमध्ये त्याची तीव्र प्रतिक्रिया उमटली. त्याच दिवशी रशियाच्या हल्ल्यामध्ये युक्रेनमधील अनेक लहान मुलं मारली गेली होती. युक्रेनचे अध्यक्ष व्होल्दोमीर झेलेन्स्की यांनी जळजळीत ट्विटद्वारे मोदींच्या रशिया भेटीचा निषेध केला होता. कदाचित, त्यामुळे मोदींनी युक्रेनला जाण्याचा निर्णय घेतला असावा, अशी चर्चा असली तरी त्यात तथ्य नाही.

युक्रेनचे लोक सोव्हिएत रशियातील सर्वात तंत्रकुशल म्हणून ओळखले जायचे. १९९१ साली सोव्हिएत रशियाच्या विघटनानंतर युक्रेन स्वतंत्र झाला. सांस्कृतिकदृष्ट्या रशियाच्या प्रभावाखाली असलेला युक्रेन आर्थिकदृष्ट्या युरोप आणि अमेरिकेवर अवलंबून होता. स्वतंत्र होताना युक्रेनने अण्वस्त्र प्रसारबंदी कायद्यावर स्वाक्षर्या करून आपल्याकडील अण्वस्त्रे नष्ट केली. त्यामुळे भारताने अण्वस्त्र चाचण्या केल्या असता युक्रेनने त्याचा निषेध केला होता. भारत-रशिया मैत्रीमुळे भारताने युक्रेनशी मर्यादित राजकीय संबंध ठेवले असले, तरी कृषी, औद्योगिक आणि संरक्षण क्षेत्रात भारत आणि युक्रेन यांच्यात भरीव सहकार्य निर्माण झाले. युक्रेनचे लोक तंत्रकुशल असल्यामुळे रशियन बनावटीच्या संरक्षण सामग्रीचे सुटे भाग आणि देखभालीसाठी भारत युक्रेनवर अवलंबून होता. याउलट, भारत आणि रशिया यांच्यातील संबंधांना ऐतिहासिक कोंदण असून वेळोवेळी सुरक्षा परिषदेत रशियाने भारतासाठी आपला नकाराधिकार वापरला आहे. १९७१ च्या बांगलादेश निर्मिती युद्धाच्या पार्श्वभूमीवर अमेरिका भारताला धमकावत असताना सोव्हिएत रशियाने भारताशी मैत्रीकरार केल्यामुळे बांगलादेशला स्वातंत्र्य मिळू शकले. भारत-रशिया यांच्यातील करारानुसार, दरवर्षी दोन्ही देशांचे नेते आलटूनपालटून एकमेकांना भेटतात. आज संरक्षण क्षेत्रात अमेरिका भारताचा सर्वात मोठा भागीदार असला, तरी भारताची प्रमुख लढाऊ विमानं, युद्धनौका, पाणबुड्या आणि रणगाडे रशियन बनावटीचे किंवा तंत्रज्ञानाने बनले आहेत.

भारतासारख्या जगातील सर्वात मोठ्या लोकशाही देशाने रशियाच्या आक्रमणाचा केवळ तोंडदेखला निषेध करणे आणि मोदींनी मॉस्कोला जाऊन पुतीन यांना भेटणे भारताच्या अनेक मित्रदेशांना अजिबात रुचले नव्हते. पण, तो भारताच्या स्वायत्त परराष्ट्र धोरणाचा एक अत्यंत महत्त्वाचा भाग आहे. मागे मोदींनी इस्रायल आणि पॅलेस्टाईनबाबत जे धोरण अवलंबिले होते, तसेच धोरण रशिया आणि युक्रेनबाबतही अवलंबिले. त्यापूर्वी एकही भारतीय पंतप्रधान इस्रायलला गेले नव्हते. इस्रायलला गेले तर पॅलेस्टाईनलाही जायचे, असा दबाव असताना मोदींनी जुलै २०१७ मध्ये केवळ इस्रायलचा तीनदिवसीय दौरा केला. जानेवारी २०१८ मध्ये इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहूंनी भारताचा दौरा केल्यानंतर सुमारे महिनाभराने मोदींनी जॉर्डन आणि पॅलेस्टाईनला भेट दिली.

युक्रेनला जाण्यापूर्वी मोदींनी पोलंडला भेट दिली. गेल्या ४५ वर्षांमध्ये एकही भारतीय पंतप्रधान पोलंडला गेले नव्हते. पोलंडमध्ये त्यांनी अध्यक्ष अंद्रेय सबास्टियन दुदा आणि पंतप्रधान डोनाल्ड टुस्क यांची भेट घेतली. दुसऱ्या महायुद्धामध्ये जामनगर आणि कोल्हापूरच्या संस्थानिकांनी हजारो पोलिश महिला आणि मुलांना आश्रय दिला होता. या शरणार्थींनी पोलंडला परत गेल्यानंतर या दोन संस्थानिकांच्या सन्मानार्थ स्मारकं उभारली आहेत. नरेंद्र मोदींनी या स्मारकांना भेट देऊन तेथे उपस्थित भारतीयांशी संवाद साधला. पोलंडमधील कोल्हापूर स्मारकाजवळ मोदींनी मराठीत केलेले भाषण समाजमाध्यमांमध्ये प्रसिद्ध झाले. पोलंडहून सुमारे दहा तासांचा रेल्वे प्रवास करून मोदींनी युक्रेनची राजधानी कीव्हला भेट दिली. रशिया आणि युक्रेनमधील युद्धामुळे विविध देशांचे नेते युक्रेनला जाण्यासाठी विमानप्रवास टाळतात. युक्रेनच्या युद्धापूर्वी मोदी यांनी झेलेन्स्की यांच्याशी ग्लासगो येथे भेट घेतली होती. युद्धाला सुरुवात झाल्यानंतर मोदी आणि झेलेन्स्की जपान आणि इटलीमध्ये भेटले होते. टेलिफोनच्या माध्यमातून त्यांच्यात तब्बल सातवेळा चर्चा झाली होती. 'जी २०' देशांच्या गटाचे यजमानपद भूषवत असताना भारताने झेलेन्स्कींना बोलवावे असा दबाव होता. पण, भारताने त्यास नकार दिला. दोन महिन्यांपूर्वी स्वित्झर्लंड येथे पार पडलेल्या युक्रेन-रशिया शांतता परिषदेत रशियाला न बोलावल्याने भारताने कनिष्ठ प्रतिनिधींना पाठवले होते. तेथील संयुक्त निवेदनावरही भारताने स्वाक्षरी करायला नकार दिला होता.

मोदी आणि झेलेन्स्की यांच्यामध्ये भारत आणि युक्रेन यांच्यातील द्विपक्षीय संबंध आणखी वरच्या स्तरावर कसे नेता येतील, यावर चर्चा झाली. कृषी, औषधे, संरक्षण तसेच व्यापारी संबंध कशा प्रकारे वाढवता येतील, हा त्यातील मुख्य भाग होता. रशिया आणि युक्रेनमधील युद्धाबाबत भारताची भूमिका काय, याबाबत संपूर्ण जगाला कुतूहल होते. मोदींनी पुन्हा एकदा स्पष्ट केले की, आजच्या काळात युद्ध हा मार्ग असू शकत नाही. युक्रेन आणि रशियाने एकमेकांशी बोलून आपापसातील प्रश्न सोडवावेत, ही भारताची भूमिका आहे. भारताने रशियाचा स्पष्ट शब्दांत निषेध केला नसला तरी, मोदी आणि झेलेन्स्की यांच्यामध्ये आंतरराष्ट्रीय कायदा, संयुक्त राष्ट्रांची सनद, परस्परांच्या सीमांचा आदर आणि राष्ट्रांचे सार्वभौमत्व या चौकटीत सहकार्य वृद्धिंगत करण्याची चर्चा झाली. मोदी म्हणाले की, रशिया आणि युक्रेन यांच्यातील युद्धामध्ये भारत तटस्थ नसून शांततेच्या बाजूने आहे. मोदींनी झेलेन्स्की यांना भारत भेटीचे निमंत्रण दिले. झेलेन्स्की यांनीही दुसरी शांतता परिषद विकसनशील देशात व्हावी, अशी इच्छा व्यक्त केली. लोकसभा निवडणुकीनंतर ताकही फुंकून प्यायला लागलेल्या लोकांना मोदींच्या युक्रेन दौर्यातून नेमके काय साध्य झाले? अमेरिकेने बांगलादेशमध्ये सत्तांतर घडवून आणल्यामुळे मनाविरुद्ध हा दौरा तर करावा लागला नाही ना? रशिया आणि युक्रेन यांच्यात समतोल साधायचा हा निष्फळ प्रयत्न आहे का? असे प्रश्न पडणे स्वाभाविक आहे. रशिया भारताचा भूतकाळ आणि काही प्रमाणात वर्तमान असला तरी भारताचे भविष्य होऊ शकत नाही.

(पान ४ वर)

# पाकिस्तानातून वाढते स्थलांतर

वेधक

पवन बोरस्ते



पाकिस्तानमधील ढासळती अर्थव्यवस्था, लष्कराचा वाढता प्रभाव, पायदळी तुडवली जाणारी लोकशाही, आणि बेरोजगारी, महागाई यामुळे त्रस्त झालेल्या पाकिस्तानी नागरिकांचा भ्रमनिरास झाला आहे. त्यामुळे लाखो नागरिक देश सोडून, इतरत्र स्थायिक झाले आहेत. चांगल्या संधीच्या शोधात हे नागरिक पाकिस्तान सोडत आहे.

अहवालानुसार, गेल्या १७वर्षांत एकूण ९५ लाख, ५६ हजार, ५०७ नागरिक पाकिस्तान सोडून गेले आहेत. २०१५ मध्ये सर्वाधिक नऊ लाख लोकांनी पाकिस्तानमधून स्थलांतर केले. २०१३ ते २०१८ पर्यंत पाकिस्तान मुस्लीम लीग- नवाजच्या राजवटीत सर्वाधिक लोकांनी पाकिस्तान सोडले. कोविड-१९ महामारीच्या काळात २०२२ आणि २०२३ मध्ये जवळपास आठ लाख लोकांनी देश सोडला. कुशल लोकांच्या स्थलांतराचे प्रमाणही पाच टक्क्यांनी वाढले आहे.

गेल्या दोन वर्षांत देश सोडून जाणार्यांपैकी बहुसंख्य हा कामगारवर्ग आहे. अनेक पाकिस्तानी कामगार चांगल्या नोकरीच्या शोधात, सौदी अरेबिया, यूएई, ओमान आणि कतार येथे स्थायिक झालेले आहेत. कोरोनानंतर यूएईमध्ये पाकिस्तानी कामगारांच्या संख्येत मोठी घट झाल्याचे पाहायला मिळाले. त्याउलट, सौदी अरेबियामध्ये मात्र पाकिस्तानी कामगारांच्या संख्येत लक्षणीय वाढ झाली आहे. कोविडनंतर पाकिस्तानी नागरिक यूके, इराक आणि रोमानियात सर्वाधिक स्थलांतरित होत आहेत. मुळात कोणत्याही देशाची अर्थव्यवस्था सुस्थितीत ठेवण्यामध्ये कामगारवर्गाचा महत्त्वाचा वाटा असतो.

अर्थव्यवस्थेचा डोलारा कामगारवर्गावर बर्यापैकी अवलंबून असल्याने, साहजिकच पाक सरकारची चिंता वाढली आहे. देशातील कामगारवर्ग अशा पद्धतीने मोठ्या प्रमाणावर स्थलांतर करत असेल, तर पाकिस्तानच्या अर्थव्यवस्थेसाठी ही धोक्याची घंटा आहे. त्याचप्रमाणे, अन्य देशांमध्ये पाकिस्तानी नागरिक जाऊन तिथेही शांत राहत नाही. अनेक देशांमध्ये या कामगारांकडून गुन्हे, चोरी करण्याच्या घटना समोर आल्या आहे. कोरोनाकाळात तर पाकिस्तानची पळता भुई थोडी झाली होती.

दहशतवाद्यांना पोसतापोसताच पाकिस्तानच्या नाकीनऊ येतात, तर आरोग्य व्यवस्थेकडे लक्ष देण्याइतका वेळच पाकिस्तानकडे कुठे असेल म्हणा. कोरोनाकाळात तर पाकिस्तानातील आरोग्यव्यवस्थेचा पुरता फज्जा उडाला होता. यामुळे वैतागलेल्या पाकिस्तानने त्यावेळी अफगाणिस्तानची तोरखंड आणि चमन सीमा खुली केली होती. जेणेकरून नागरिकांना अफगाणिस्तानमध्ये जाता येईल. कोणतीही चाचणी न करता लाखो लोकांनी त्यावेळी अफगाणिस्तानमध्ये प्रवेश केला होता. ज्याचा फटका दोन्ही देशांना बसला होता. त्याउलट, २०२३ साली पाकिस्तानने कागदपत्रे नसलेल्या अफगाणी लोकांना, त्वरित देश सोडण्याचे आदेश दिले होते. फाळणी झाल्यानंतर पाकिस्तानचे दोन तुकडे झाले आणि त्यातील एक तुकडा अर्थात आताचा बांगलादेश झाला. त्या देशाची अवस्थादेखील संकटात आलीच आहे.

पाकिस्तानात हिंदू आता अल्पसंख्याक झाले असून, बांगलादेशातही तीच परिस्थिती येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. शेख हसीना यांना राजीनामा देऊन बांगलादेश सोडून भारतात आश्रय घ्यावा लागला. फुटिरतावाद्यांनी बांगलादेश ताब्यात घेऊन, तरुणांची माथी भडकावून उरलीसुरली लोकशाहीदेखील नेस्तनाबूत केली. याचा सर्वाधिक फटका तेथील हिंदू नागरिकांना बसत असून, तिथे हिंदूवरील अत्याचार वाढले आणि हिंदूना देश सोडण्यास बाध्य केले जात आहे.

पाकिस्तानातही हिंदूंची परिस्थिती याहून भिन्न नाही. भारताचा विरोध, त्याचबरोबरीने हिंदूचा द्वेष करताकरता पाकिस्तान आणि पाकिस्तानाची अर्थव्यवस्था गटांगळ्या खात आहे. मानगुटीवर बसलेले चिनी भूतही पाकिस्तानला आता डोईजड झाले आहे. इमरान खान यांच्या पक्षावर बंदी घालून लोकशाहीसुद्धा नावापुरतीच राहिली आहे. त्यामुळे पाकिस्तानातील नागरिकांचे स्थलांतर पुढील काळात आणखी वाढण्याची शक्यता आहे.

**आर्थिक चिंतेने त्रस्त पाकिस्तानला आता आणखी एका समस्येने ग्रासले आहे. पल्स कन्सल्टंटच्या समोर आलेल्या एका अहवालाने पाकिस्तानची चिंता वाढवली असून, शाहबाज शरीफ सरकारवरही यामुळे टीका होऊ लागली आहे. सदर अहवालानुसार जवळपास एक कोटी पाकिस्तानी नागरिकांनी देश सोडला असून, यातील बहुतांश नागरिक इराक आणि रोमानियाला स्थायिक झाले आहे.**



# मविआचे गुन्हेगारीवर लाजिरवाणे राजकारण

**महाविकास आघाडीतील पक्ष आणि त्यांच्या नेत्यांनी बदलापूर अत्याचार प्रकरणावरुन केलेले राजकारण हे सर्वस्वी दुर्दैवीच. कारण, या प्रकरणात आरोपी अटकेत असून दोषी पोलिसांवरही कारवाईचा बडगा उगारण्यात आला. पण, तरीही या प्रकरणावरुन राजकीय लाभ पदरात पाडण्याचे मविआचे संधिसाधू राजकारण हे सर्वस्वी लाजिरवाणेच!**


सत्ताकारण

पवन त्रिपाठी

खरंतर गुन्हा कोणताही असो, तो अक्षम्य असाच. खासकरून महिलांसोबत होणाऱ्या बलात्काराच्या घटना या प्रचंड संताप व असंतोष निर्माण करतात. अशा घटना कदापि सहन करणे शक्य नाही. म्हणूनच बलात्काराच्या गुन्ह्यांना आळा बसावा म्हणून कायद्यात कठोर शिक्षांची तरतूद करण्यात आली आहे व त्यात अजून काही कठोर पाऊले उचलली जात आहेत. साधारण एक दशकापूर्वी 'निर्भया कांड'मुळे संपूर्ण जनतेमध्ये असाच प्रचंड राग व वेदना उफाळून आल्या होत्या. त्यावेळेस दिल्लीसमवेत संपूर्ण देशभरात पेटलेल्या आंदोलनामुळे तत्कालीन सरकारला बलात्काराच्या गुन्ह्यांसाठीच्या शिक्षांमध्ये योग्य तो बदल व्हावा, असे वाटू लागले व त्या संबंधित पाऊलेदेखील उचलण्यात आली, ज्याचा लाभ मुंबईतील 'शक्ती मिल' घटनेत झाल्याचे दिसून आले.

महालक्ष्मी स्थानकाजवळ असलेल्या 'शक्ती मिल' कंपाऊंडमध्ये एका महिला पत्रकारासोबत घडलेल्या दुष्कर्माचा गुन्हा नोंद झाल्या झाल्या व हा गुन्हा चर्चेत आल्यानंतर, एका दुसरी मुलीनेदेखील पोलीस स्थानकामध्ये जाऊन सांगितले की, त्याच 'शक्ती मिल'मध्ये २२ दिवसांपूर्वी तिच्यासोबतदेखील अशीच घटना घडली आहे. पोलिसांनी तिचादेखील गुन्हा नोंदवला व दोन्ही खटले समांतर चालवले. या खटल्याच्या अखेरीस तत्कालीन सरकारी वकील उज्ज्वल निकम यांनी 'निर्भया कांडा'नंतर कायद्यात झालेल्या तरतुदींच्या आधारे दोन्ही बलात्काराच्या घटनांमधील तिन्ही आरोपींना फाशीच्या शिक्षेची मागणी केली व सत्र न्यायालयाने ती मागणी मान्य करून तिन्ही आरोपींना फाशीची शिक्षा ठोठावली. पण, उच्च न्यायालयाने आठ वर्षांनंतर या गुन्हेगारांच्या फाशीच्या शिक्षेचे रूपांतर जन्मठेपेच्या शिक्षेत केले.

(पान ४ वर)



# रशिया-युक्रेन युद्धविराम आणि वाटाघाटी?

राष्ट्ररक्षा
ब्रि. हेमंत महाजन
भ्र. ९०९६७०१२५३

### पंतप्रधान मोदींची युक्रेनला भेट

पंतप्रधान नरेंद्र मोदी युक्रेनला भेट देण्याच्या शक्यतेला दिल्लीतील युक्रेन दूतावासाने दुजोरा दिला आहे. या दौऱ्यादरम्यान पंतप्रधान मोदी युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष झेलेन्स्की यांच्याशी विविध विषयांवर चर्चा करणार आहेत. पंतप्रधान मोदी यांनी मॉस्कोमध्ये रशियाचे राष्ट्राध्यक्ष पुतिन यांची भेट घेतली होती. आता मोदींचा कीव दौरा आयोजित असून या दौऱ्यादरम्यान भारत आणि युक्रेनचे संबंध कसे बदलतील? रशिया आणि युक्रेनमधील युद्धजन्य परिस्थितीवर काही परिणाम होणार का? युक्रेनबरोबरच्या रशियाच्या युद्धावर भारत तटस्थ राहिला आहे. भारताचे मॉस्कोशी ऐतिहासिक संबंध आहेत. भारताने युद्धावर पुतिन यांच्यावर टीका करणे टाळले असले, तरी संघर्ष संपवण्यासाठी त्यांना वारंवार शांततेचे आवाहन करण्यात आले आहे. मॉस्कोसोबतचे संबंध कायम ठेवण्यासाठी भारताने पाश्चिमात्य देशांच्या दबावाचा पण प्रतिकार केला आहे.

### सैनिक, दारूगोळा आणि क्षेपणास्त्रांची कमी

गेल्या दोन-अडीच वर्षांपासून सुरू असलेले रशिया-युक्रेन युद्ध केव्हा संपेल, याविषयी कुणीही सांगू शकत नाही. या युद्धामध्ये अत्याधुनिक तंत्रज्ञान, मोठी शस्त्रे, दारूगोळा यांचा प्रचंड वापर झाला. दोन्ही बाजूला हजारो सैनिकांचा मृत्यू झाला, हजारो जखमी झाले, हजारो सैनिक युद्धकैदी झाले आणि अनेक पळून गेले आहेत; ज्यामुळे रशिया आणि युक्रेनला सैनिकांची कमतरता जाणवत आहे. युद्धाची तीव्रता कमी होण्याचे मुख्य कारण आहे, लढण्याकरिता सैनिकांची कमी. याशिवाय दोन्ही बाजूंना दारूगोळा आणि क्षेपणास्त्रांच्या कमीला तोंड द्यावे लागत आहे. कारण क्षेपणास्त्रे फायर झाली की, ती पुन्हा वापरता येत नाही. क्षेपणास्त्रांची किंमत ही १०० कोटींपासून तर १० हजार कोटी रुपयांपर्यंतही असू शकते. क्षेपणास्त्रांच्या फायरिंगमुळे नौदलाची मोठी लढाऊ जहाजे पांढरा हत्ती बनली आहे. कारण लांबून अशा जहाजांवरती फायर करून त्यांना बुडवता येते. नेमके हेच रशियाच्या नौदलाच्या बरोबर झालेले आहे.

### युक्रेनचा हल्ला; बचावात्मक प्रतिहल्ला

२४ फेब्रुवारी २०२२ ला रशियाचे अध्यक्ष पुतिन यांनी युक्रेनवर आक्रमण केले. आता रशियावर प्रथमच युक्रेनने प्रतिहल्ला केला आहे. युक्रेनचा हा हल्ला बचावात्मक प्रतिहल्ला आहे. रशिया मानतो की डॉनेत्स्क आणि लुहान्स्क हे रशियाचेच आहेत. युक्रेनच्या समावेशातून नाटो देशांचा विस्तार रोखण्यासाठी बचावात्मक कारवाई आवश्यक होती. म्हणून पुतिननी युक्रेनवर आक्रमण केले होते. युक्रेनच्या तिप्पट सैन्य आणि सामग्री रशियाकडे आहे. तरीदेखील रशियात घुसून तेथील भूभाग ताब्याखाली आणण्याची आक्रमक कारवाई युक्रेनने गेल्या आठवड्यात केली. त्याकरिता युक्रेनच्या युद्ध नेतृत्वाला दाद द्यावी लागेल.

युक्रेनच्या या अनपेक्षित/अचानक हल्ल्यामुळे रशियन सैन्य, पुतिन सरकार आणि रशियाच्या गुप्तहेर यंत्रणा आश्चर्यचकित झाल्या. ६ ऑगस्ट रोजी सुरू झालेल्या कारवाईला थोपवणे रशियाला अजूनही शक्य झालेले नाही. उलट ज्या ठिकाणी युक्रेनचा हल्ला झाला, त्या आणि आजूबाजूच्या प्रदेशांमधून नागरिकांना सुरक्षित स्थळी हलवण्यासाठी कारवाई सुरू आहे. दोन प्रांतांमध्ये आणिबाणी जाहीर झाली आहे. आता युक्रेन सैन्य रशियाच्या अजून किती आत जाऊ शकेल, किती भागावर आपले नियंत्रण मिळू शकेल, हे आत्ताच सांगता येत नाही. कारण रशियाने युक्रेनच्या सैन्यावर प्रतिहल्ले सुरू केले आहेत.

### विविध कारणांमुळे युक्रेनचा रशियावर हल्ला

विविध कारणांमुळे युक्रेनने रशियावर हल्ला केला. कुर्स्क प्रांतामध्ये एक हजार चौरस किलोमीटरचा भूभाग युक्रेनच्या ताब्यात आला आहे. रशियाने ७६ हजार नागरिकांना सुरक्षित स्थळी हलवले आहे. या हल्ल्यामुळे पुतिनही चकित झाले, हे उघड आहे. हल्ल्यामागे युक्रेनची लष्करी कारणे होती. युक्रेनच्या पूर्वेस रशियाच्या सैन्याची मोठी जमवाजमव होत होती. आता तेथून काही सैन्य कुर्स्कच्या रक्षणासाठी पाठवले गेले आहे; ज्यामुळे रशियाचा डॉनेत्स्कसारख्या प्रांतांमधील दबाव कमी होईल.

कुर्स्कमध्ये रशियाचे अनेक सैनिक व नागरिक युक्रेनच्या ताब्यात आले आहेत. त्यांना ओलीस ठेवून रशियाशी युक्रेनच्या युद्धकैद्यांच्या मुक्ततेविषयी वाटाघाटी सुरू झाल्या आहेत. याशिवाय कुर्स्क सीमेवर एक बफर क्षेत्र निर्माण झाले आहे. याचा परिणाम म्हणजे रशियाने डॉनेत्स्कमधून कुर्स्ककडे कुमक रवाना केली आहे. कुर्स्क हल्ल्यामुळे रशियाचे युद्धकौशल्य आणि युद्धसिद्धतेतल्या मर्यादा उघड झाल्या आहेत. ज्या सहजतेने रशियाच्या हद्दीत कित्येक किलोमीटर आत युक्रेनच्या फौजा जाऊ शकल्या, ते पाहता युक्रेन आणखी काही आघाड्यांवर अशा कारवाया करू शकतो, अशी शक्यता आहे.



### रशियाची युद्ध लढण्याची क्षमता युक्रेनपेक्षा जास्त

रशियाची युद्ध लढण्याची क्षमता युक्रेनपेक्षा जास्त अनेकविध निर्बंध लादले गेले आणि या युद्धात अपरिमित हानी झाली तरी रशियाची अर्थव्यवस्था आजही सुस्थितीत आहे. कारण रशियाचा अनेक देशांशी व्यापार सुरू आहे. भारत हा रशियन खनिज तेलाचा सर्वांत मोठा खरेदीदार आहे. त्याहीपेक्षा चीन, उत्तर कोरिया आणि इराणकडून दारूगोळा आणि इतर सामग्री रशियाला मिळत आहे. यामुळे रशियाची युद्ध चालू ठेवण्याची क्षमता ही युक्रेनपेक्षा जास्त आहे. रशियन सैनिकांच्या युद्धामध्ये मारले जाण्याविषयी रशियाला फारशी चिंता नाही. रशियाची लोकसंख्या ही युक्रेनपेक्षा पुष्कळ जास्त असल्यामुळे सैनिकांची कमी रशियाला अजून तरी वाटत नाही.

### युद्ध क्षमता टिकवून ठेवणे मोठे आव्हान

युक्रेनचा २० टक्के भूभाग सध्या रशियाने व्यापला आहे. यात १० वर्षांपूर्वी ताब्यात घेतलेल्या क्रायमिया प्रांताचाही समावेश आहे. क्रायमिया गिळंकृत केल्यानंतरही पश्चिमी देश आणि अमेरिकेने काही केले नाही. त्यामुळे पुतिन यांचे मनोबल वाढले आणि त्यांनी युक्रेनवर हल्ला केला. मात्र युक्रेनने रशियाला कडवा प्रतिकार केला. दोन्ही देशांतील सैनिकी संख्याबळाची तफावत पाहता, युक्रेन फक्त काही महिने टिकाव धरू शकेल, असे काहींना वाटले. तसे काही घडले नाही. युक्रेनने चिवट प्रतिकार केला आणि अद्यापही करीत आहे. अर्थात युक्रेनला मोठ्या प्रमाणामध्ये अमेरिका आणि युरोपच्या राष्ट्रांची दारूगोळा, क्षेपणास्त्रे तंत्रज्ञान यामध्ये मदत झाली आहे. युक्रेनमध्ये मनुष्यहानीचा प्रश्न गंभीर आहे. शहरांमध्ये होणाऱ्या हल्ल्यांमुळे युक्रेनची अर्थव्यवस्था डबघाईला गेलेली असून पाश्चिमात्य देशांच्या मदतीवर अवलंबून आहे. युरोपमध्येही काही देशांत पुतिन समर्थक आहेत. युरोपीय समुदाय नाटोच्या छत्राखाली राहूनही युक्रेनला मदत पुरवण्याबाबत ही सरकारे नाराज आहेत. युक्रेनला अधिक विध्वंसक आणि लांबपल्ल्याची शस्त्रास्त्रे देण्याची इच्छा असूनही अमेरिका किंवा जर्मनीला ती देता येत नाहीत. कारण यास या दोन्ही देशांचा युद्धातील थेट सहभाग मानून अधिक तीव्रतेने हल्ले करण्याची किंवा युद्धाची व्याप्ती वाढविण्याची पुतिन यांची धमकी आहे.

अमेरिकेमध्ये डोनाल्ड ट्रम्प अध्यक्षपदी विराजमान झाल्यास तेथून मदतीचा ओघ थांबणार आहे. यामुळे येणाऱ्या काळामध्ये आपली युद्ध क्षमता लांब युद्धाकरिता टिकवून ठेवणे, हे युक्रेन समोरचे सर्वात मोठे आव्हान आहे. युद्ध की वाटाघाटी आज युद्ध युक्रेनने रशियन भूमीवर वळवले आहे. अडीच वर्षांच्या युद्धानंतरसुद्धा युक्रेनची रशियाच्या आत जाऊन हल्ला करण्याची क्षमता आहे. यामुळे रशियाला एक मोठा धक्काच बसला आहे. याशिवाय युक्रेनने आपल्या मित्र राष्ट्रांना म्हणजे अमेरिका आणि युरोपला एक संदेश दिला आहे की, त्यांची लढण्याची क्षमता खूप आहे; मात्र त्यांना शस्त्रास्त्रांची आणि दारूगोळ्याची मदत जरूरी आहे. ती लवकरात लवकर केली जावी, ज्यामुळे युक्रेन रशियाला वाटाघाटीच्या टेबलवर आणू शकतो. सध्याच्या परिस्थितीत रशिया किती आक्रमकता दाखवू शकतो, यावर युद्धाची पुढची दिशा ठरेल. मात्र वाटाघाटी करून शांतता प्रस्थापित करणे हा पर्याय दोन्ही देशांसमोर आहे.

पंतप्रधान मोदींच्या युक्रेन दौऱ्यात युद्धविरामाचा मार्ग सापडेल, अशी अपेक्षा आहे. तसे झाले तर हा भारताच्या डिप्लोमसीचा/मुत्सद्देगिरीचा सर्वात मोठा विजय असेल. (लेखक संरक्षणविषयक तज्ज्ञ आहेत.)

# संत साहित्यातील प्रार्थनेचे स्वरूप

संत प्रबोधन
प्रा. डॉ. हरिदास आखरे

सर्व संतांनी जगाच्या कल्याणासाठी प्रार्थना केली आहे. माणसाच्या जीवन जगण्याच्या आजच्या आकांक्षा या प्रार्थनेतून व्यक्त व्हाव्या. त्याचे जीवन सुखमय व्हावे. यासाठी संतांनी प्रार्थनाचे स्वरूप व्यक्त केले आहे.

संतांच्या अभंग वाङमयामध्ये तीन प्रकारच्या प्रार्थना केलेल्या आढळतात १) वस्तुनिर्देशरूप प्रार्थना २) नमस्काररूप प्रार्थना ३) आशीर्वादात्मक प्रार्थना वस्तुनिर्देशरूप प्रार्थना भारतीय तत्त्वज्ञानामध्ये वस्तूला 'ब्रह्म' संबोधले जाते. निर्देश करणे म्हणजे दाखविणे. ब्रह्म वस्तूचे यथार्थ ज्ञान करून देण्यास 'वस्तुनिर्देशरूप प्रार्थना' असे म्हणतात. **द्वे वाव ब्रह्मणो रूपे मूर्त चैवामूर्त च ।।१२।।** (बृहदा. उ. २।३।१, हरिपाठ विवरण अभंग, १/५) वस्तूनिर्देशरूप प्रार्थनेचे दोन प्रकार याप्रमाणे- १) सगुणाची प्रार्थना २) निर्गुणाची प्रार्थना.

**सगुणाची प्रार्थना:** सगुण साकार परमेश्वराच्या नाम, रूप, गुण, कीर्ती, शक्ती इत्यादींचे वर्णन संतांनी विविध ठिकाणी केलेले आढळते. त्यालाच 'सगुण प्रार्थना' असे म्हणतात. संत तुकारामांनी पांडुरंगाचे वर्णन असे केले आहे **सुंदर ते ध्यान उभे विटेवरी । कर कटावरी ठेवूनियां ।।१।। तुळसी हार गळां कासे पीतांबर । आवडे निरंतर हेंचि ध्यान ।।२।। मकरकुंडले तळपती श्रवणी । कंठी कौस्तुभमणि विराजित ।।३।। तुका म्हणे माझे हेचि सर्व सुख । पाहीन श्रीमुख आवडीनें ।।४।।** (तुकाराम गाथा २) विठ्ठलाचे कंबरेवर हात ठेवून उभे असणारे ध्यानरूप खूपच सुंदर आहे. गळ्यात तुळशीच्या माळा व कंबरेवर पीतांबर असलेले हेच ध्यान तुकोबांच्या आवडीचे आहे. ज्याच्या कानात मकराकार कुंडले झळकतात व गळ्यात कौस्तुभमणी शोभतो. तुकारामांची प्रार्थना येथे अंतर्मुख होऊन अंतर्धान पावताना दिसते. याच सगुणाचे वर्णन करताना ते पुढे म्हणतात,

**समचरणदृष्टि विटेवरी साजरी । तेथे माझी हरी वृत्ती राहो ।।१।। आणीक मायिक पदार्थ । तेथे माझे आर्त नको देवा ।।२।। ब्रह्मादिक पदे दुःखाची शिराणी । तेथे दुश्चित झणी घडो देसी ।।३।। तुका म्हणे त्याचे कळले आम्हा वर्म । जे जे कर्मधर्म नाशवंत १४ ।।४।।** (तुकाराम गाथा अ. १) प्रस्तुत अभंगातून संत तुकारामांना सगुणरूपी परमेश्वराची भक्ती व त्यांच्या निर्गुण रूपाचे यथार्थ ज्ञान हवे आहे. त्याशिवाय मायिक, दुःखरूपी व क्षणभंगुर असलेले भोग नको आहेत. तशी मागणी त्यांनी परमेश्वरचरणी केली आहे. त्यांना धनसंपदा नको आहे. मुक्ती नको आहे. तर, परमेश्वराचा कदापि आमच्या चित्ताला विसर पडू नये. परमेश्वराच्या गुणांचेच उच्चारण आमच्या मुखातून होऊ दे. त्यासाठी आम्हाला गर्भवासाचे दुःख झाले तरी ते सुखाने सहन करू, अशी विनवणी ते करतात. ती मागणी पूर्ण होण्यासाठी परमेश्वराजवळ ते मनोभावे प्रार्थना करतात **हे चि दान देगा देवा। तुझा विसर न व्हावा ।।१।। गुण गाईन आवडी। हे चि माझी सर्व जोडी।। २ ।। न लगे मुक्ति धनसंपदा। संत संग देई सदा ।।३।। तुका म्हणे गर्भवासी । सुखे घालावे आम्हासी ।।४।।** (तुकाराम गाथा २२९६)

**निर्गुणाची प्रार्थना :** भाविक भक्तांचा देव सगुण साकार असतो. तर ज्ञानी भक्तांचा देव निर्गुण निराकार असतो. अशा निर्गुण निराकार स्वरूपाच्या केलेल्या स्तवनाला 'निर्गुण प्रार्थना' असे म्हणतात. संत तुकारामांनी केलेली **निर्गुणाची प्रार्थना अशीनमो विष्णू विश्वरूपा मायबापा। अपारा अमुपा पांडुरंगा।।१।। विनवितो रंक दास मी सेवक। वचन ते एक आइकावे।।धृ।। तुझी स्तुति वेद करिता भागला। निवांत चि ठेला नेति नेति ।।२।। ऋषि मुनि बहू सिद्ध कविजन। वर्णितां ते गुण न सरती ।।३।।** (तुकाराम गाथा अ. ११२५) विश्वव्यापक, अपार व अनुपम असे स्वरूप असणाऱ्या ईश्वरा, तुझी प्रार्थनास्तुती मी काय करू शकेन! वेद व श्रुती यांच्यासोबतच सर्व ऋषी, मुनी, कवी या सर्वांनी कीर्ती गाऊनसुद्धा तुझे गुण संपत नाहीत. असा तू निर्गुण निराकार आहेस. तुझी कीर्ती गाणे माझ्या वाणीसाठी अशक्यप्राय आहे, असा तू अगाध आहेस. संत तुकाराम महाराज म्हणतात, आपले शरीर सर्व कामना पूर्ण करणाऱ्या चिंतामणीसारखे आहे. त्यासाठी अविद्या, अहंकार, आशा, निंदा, हिंसा, कपट आणि देहाभिमान जाणे आवश्यक आहे. चित्त स्फटिकाप्रमाणे शुद्ध पाहिजे. मोक्ष देणारे पवित्र तीर्थक्षेत्र वाराणसी आहे, असे सर्वत्र मानतात. पण, ज्याचे मनच चिंतामणी झाले आहे, त्याला त्या मोक्षाची गरज काय? उलट सर्व लोक त्याच्याकडे



मोक्षप्राप्तीकरिता येतात. पुढे ते निर्गुणात्मक कर्तव्यासंबंधी सांगतात. ज्याचे मन शुद्ध आहे, त्याच्या गळ्यात तुळशीची माळ असली- नसली तरी काही फरक पडणार नाही. कारण तो वैराग्य, भक्ती व ज्ञान या भूषणांनीच सुशोभित असतो. पांडुरंगाच्या गुणानुवादाचा तो नेहमी जयघोष करतो. त्याने आनंदाने पांडुरंगाला तन-मन-धन अर्पण केलेले असते. त्याला कशाची आशा नसते. तो पुरुष परिसाहून श्रेष्ठ आहे. त्याची प्रार्थना मी कशी वर्णन करू शकेन. **संत ज्ञानेश्वरांनीही निर्गुणाची केलेली प्रार्थना अशीसत्य ज्ञानानंद गगनाचे प्रावर्ण । नाही रूप गुण वर्ण जेथे ।।१७।।** (ज्ञानेश्वर गाथा- अ. ७९०) नमस्काररूप प्रार्थना ईश्वरास वंदन करणे, नमस्कार करणे या अर्थाने जी प्रार्थना केली जाते त्याला 'नमस्काररूप प्रार्थना' असे म्हणतात. परमेश्वराला अत्यंत आदरपूर्वक, आवडीने नमस्काररूप प्रार्थना केल्यास आपला मान-अभिमान, अहंकार सहजपणे नाहीसा होतो. परमेश्वराच्या भक्तीचे मुख्य लक्षणही तेच आहे. संत तुकाराम म्हणतात- **अहंकार गेला । तुका म्हणे देव झाला ।। दंभ मान चेष्टा । हे तो शूकराची विष्ठा ।।** (तुकाराम गाथा अ. ६३७) परमार्थ मार्गात साधकाच्या ठिकाणचे दंभ, मान-अभिमान हे अत्यंत घातक दुर्गुण आहेत. ते निवृत्त करण्यासाठी संत तुकारामांनी 'ईश्वरशरणागत' हाच एकमेव उपाय सांगितला आहे. साधकाची विनम्र वृत्ती त्याला परमेश्वराकडे नेणारी महत्त्वाची शक्ती आहे, असे तुकोबा सांगतात. **नम्र झाला भूता । तेणे कोंडीले अनंता।।** सर्व चराचरच परमेश्वराने व्याप्त आहे. नमस्काराच्या नम्रतेनेच आपण परमेश्वराला आपले करू शकतो. नमस्काररूप प्रार्थनेचे दोन प्रकार आहेत. वस्तुतंत्र प्रार्थना आणि कर्तृतंत्र प्रार्थना वस्तुतंत्र प्रार्थना: आत्मस्वरूपाच्या विचारदृष्टीने होणाऱ्या प्रार्थनेस 'वस्तुतंत्र प्रार्थना' म्हणतात. **मी वासुदेव तत्त्वता। कळो येईल विचारिता। आहे ठाऊक सभाग्य संता। नाही दुजा आणिक मागता ।।** (तुकाराम गाथा ४३३) मी परमात्म्यापासून भिन्न नाहीच. मी आणि परमात्मा अभिन्न आहे. या ठिकाणी वस्तुतंत्र प्रार्थना केलेली आहे.

**तुज मज नाही भेद। केला सहज विनोद ।।१।। तू माझा आकार। मी तो तुच निर्धार ।ध्रु ।। मी तुजमाजी देवा। घेसी माझ्या अंगे सेवा।२।। मी तुजमाजी अचळ । मजमाजी तुझे बळ ।।३।। तू बोलसी माझ्या मुखें मी तो तुजमाजी सुखें ।।४।। तुका म्हणे देवा । विपरीत ठायी नावा ।।५।।** (तुकाराम गाथा अ. २९१७) कर्तृतंत्र प्रार्थना या प्रकारच्या प्रार्थनेमध्ये शारीरिक क्रियेच्या स्वरूपामध्ये प्रार्थना केली जाते. जसे- नमस्कार करण्यासाठी हात जोडणे, चरणावर मस्तक ठेवणे, भक्त हात जोडून, डोळे मिटून डोक्यातील विचार, भावना मनामध्ये पुटपुटत आणि तेवढ्याच तन्मयतेने परमेश्वराशी एकरूप होत असतो. **श्री संताचिया माथा चरणावरी । साष्टांग हे करी दंडवत ।।१।। विश्रांती पावलो सांभाळा उत्तरी । वाढले अंतरी प्रेमसुख ।।धृ।। डौरली हे काया कृपेच्या वोरसे । नव्हे अनारिसो उध्दरिलो ।।२।। तुका म्हणे मज न घडता सेवा । पूर्व पुण्य ठेवा वोढवला ।।३।।** (तुकाराम गाथा अ. २१७८) तुकारामांनी केलेली प्रार्थना फलद्रूप होताना दिसते. त्यांना साक्षात परमेश्वराची पावले प्रार्थना करताना भेटतात. त्यामुळे त्यांना जी धन्यता वाटते ती **(पान ६ वर)**शब्दातीत



# कोलकाता केस आणि कपील सिब्बल!

नोंद
प्रसन्न आठवले
भ्र. ९०४९३५३८०९

२३ ऑगस्टला सुप्रीम कोर्टात, सुप्रीम कोर्टाने स्वतःहून दाखल करून घेतलेल्या अर्थात suo moto matter मधे, बंगाल सरकारतर्फे अर्थात ममता बॅनर्जी यांच्या सरकारतर्फे वकील म्हणून उभे असलेल्या सिब्बल यांना खंडपीठाच्या न्यायाधीशांनी अक्षरशः सोलून काढले आणि सळो की पळो करून सोडले.

त्याचा व्हिडिओ दोन तीन वेळा बघितला. सी. बी. आयने न्यायालयाला सादर केलेल्या रिपोर्टवरून, सिब्बल यांना कोर्टाकडून तपासलं आणि तासलं जात होतं. मुख्य मुद्दा एफ. आय. आर. कधी दाखल झाली. पोस्ट मोर्टेम (पी.एम.) कधी झालं. केस डायरीतील नोंदी, वेळा तपासाची, गुन्हा नोंदवण्याची प्रोसिजर, पी. एम. कधी झालं, इत्यादी गोष्टीवरून सी. बी. आय. ने सादर केलेल्या रिपोर्टवरून सिब्बल यांची तासडमपट्टी न्यायमूर्ती पारडीवाला यांनी न्यायाधीश मनोज मिश्रा आणि नंतर मुख्य न्यायमूर्ती चंद्रचूड यांनी कपिल सिब्बल यांच्यावर प्रश्नांची सरबत्ती केली.

कपील सिब्बल यांची न्यायालयापुढे सादर रिपोर्टला नाकारताना करावी लागत असलेली तकलादू विधानं, करावी लागणारी सारवासारव आणि त्याला पुन्हा- पुन्हा न्यायाधीशांनी लगावलेली फटकार आणि सिब्बल यांना सारवासारव करताना फुटत असलेला घाम, बघण्यात खरच धमाल येत आहे.

आतापर्यंत इतक्या तकलादू केसेसमधून तावून सुलाखून निघालेले सिब्बल आणि अनेक गुन्ह्यात गुन्हेगारांच्या आणि हिंदू विरोधी बाजू असणाऱ्या पक्षकारांची किंवा शांती समाजाची पाठराखण बिनदिक्कतपणे करणाऱ्या सिब्बल यांना शुक्रवारी सर्वोच्च न्यायालयात अक्षरशः निरुत्तर होताना, सॉरी म्हणताना आणि न्यायाधीश काढत असलेल्या निष्कर्षाला येस... येस.. म्हणताना बघायला मजा येत होती.

या केसवर त्यांचा कोणताही कंट्रोल नाही, अभ्यास नाही किंवा असं जाणवत होतं की, ते मांडत असलेली बाजू इतकी तकलादू आणि मुद्देरहित आहे की, भर न्यायालयात, सी. बी. आय. ने सादर केलेल्या तथ्याधारीत रिपोर्टमुळे, सिब्बल यांच्यावर तिन्ही न्यायाधिशांकडून जी प्रश्नांची सरबत्ती सुरू होती, ती बघण्यासारखी आहे. विशेषतः जस्टिस पारडीवाला यांनी सिब्बल यांना अक्षरशः गुडघे टेकायची पाळी आणली.

केसमधील पोलिसांची हलगर्जी आणि संदिग्ध भूमिका, एफ. आय. आर. फाईल करायच्या आधीच पी. एम. कसा केला, एफ. आय. आर. करायला इतका उशीर का झाला, म्हणजे नऊला पहाटे झालेल्या गुन्ह्याचा एफ. आय. आर. रात्री २३:४५ ला कसा फाईल केला जातो. गुन्हा नोंदवून घेण्याच्या आणि पी. एम. वगैरे एकूणच प्रक्रियेची अशी तोडफोड करण्याची घटना माझ्या तीस वर्षांच्या आयुष्यात मी पाहिलेली नाही, असं खेदयुक्त विधान न्यायाधीश पारडीवाला यांनी केलं.

इतक्या तिरस्कारयुक्त शब्दात न्यायाधीश पारडीवाला यांनी एकूणच कोलकाता पोलिसांची निर्भात्सना केली आणि सिब्बल यांच्या हे लक्षात आणून दिलं की, इतकी संवेदनशील केस अश्या प्रकारे हाताळण्यात आली.

एकूणच प्रशासन, पोलीस यंत्रणा आणि यांचा या केसमधील हलगर्जीपणा न्यायालयाने खेदाने नमूद केला. म्हणजे जी. डी. अर्थात जनरल डायरीमधील सकाळी १०:१० ला झालेली नोंद इथपासून संध्याकाळी ६:१० ते ७:१० ला झालेली पी. एम. आणि त्यानंतर रात्री २३:१० ला नोंदली गेलेली केस डायरी आणि रात्री २३:४५ ला नोंदला गेलेला एफ. आय. आर. या सर्व घटनाक्रमाचा जाहीर पंचनामा तीनही न्यायाधीशांनी करत, कपिल सिब्बल यांना पूर्ण निरुत्तर केलं

अर्थात केसचं महत्त्व, त्याची संवेदनशीलता, घडलेला निर्घृण आणि अमानुष प्रकार, याबद्दलचा राग आणि प्रशासन व पोलीस यांची त्यातील संशयास्पद वा हलगर्जी भूमिका, याची चीड न्यायालयाने पुरेश्या रागात आणि गांभीर्याने, सिब्बल यांच्या कानावर घातली. यावर सारवासारव करणाऱ्या सिब्बल यांनी सादर केलेल्या पुरव्याला किंवा मिनिट बाय मिनिट तपशील पाहून, या गोष्टीनंतर घुसवण्यात आल्या आहेत, अशी स्पष्ट कमेंट सुद्धा न्यायाधीश पारडीवाला यांनी केली. केसचं महत्व लक्षात घेता, या केसच्या प्रत्येक सूनावणीवर लक्ष ठेवायला हवं.

# चमत्कार अध्यात्माचे व मेंदूच्या चेतनाशक्तीचे!

यशासाठी
डॉ. नितीन विघ्ने
भ्र. ९८२२४६२९६८



**१.** संन्यास घेतल्यानंतरही पुन्हा कुटुंबात वापस जाण्याच्या अपराधाबद्दल धर्मसभेने विठ्ठलपंत आणि रुक्मिणी यांना देहांताची शिक्षा दिली. ती स्वीकारून त्यांनी इंद्रायणीत देहत्याग केला. तरीही 'संन्याशाची पोरे' म्हणून त्यांच्या चारही मुलांना खूप त्रास सोसावा लागला. त्यांना मदत करणाऱ्या मृद्‌गलशास्त्री परिवारालाही वाळीत टाकले. या समस्येचे निराकरण करण्यासाठी निवृत्तिनाथ, ज्ञानदेव, सोपानदेव व मुक्ताबाई या चारही भावंडांनी पैठणच्या धर्मसभेत जाण्याचा निर्णय घेतला. तेथे शास्त्र व पुराणांच्या आधारे अचूक व नम्रतेने उत्तरे देऊन ज्ञानदेवांनी सर्वांना निरुत्तर केले.

'आम्हा भावंडांना व मृद्‌गलशास्त्रींना शुद्धीपत्र द्या' अशी विनंती केली. त्यांचे प्रखर विरोधक गणेशभट्ट म्हणाले. 'मंदिराच्या जवळून जाणाऱ्या रेड्यात आणि तुझ्यात एकच ब्रह्म आहे असे म्हणशील का तू?' ज्ञानदेव म्हणाले, 'वेदोक्त महावाक्यांप्रमाणे रेड्यात आणि माझ्यात एकच ब्रह्मचैतन्य आहे.' 'असे का? मग ते सिद्ध करून दाखव. तू जी वेदोक्त महावाक्ये म्हणालास ती रेड्यालाही बोलता यायला हवीत.' ज्ञानदेवांनी अनुमतीसाठी त्यांचे आध्यात्मिक गुरू आणि वडीलबंधू निवृत्तिनाथांकडे पाहिले. निवृत्तिनाथ म्हणाले, 'ज्ञानदेवा कलियुगात चमत्कार घडल्याशिवाय परमेश्वराचं अस्तित्व मान्य होत नसतं. अहंकार आणि अन्याय दूर करण्यासाठी चमत्कार घडायला हवा!' 'जशी आज्ञा गुरुदेव!' असे म्हणून ज्ञानदेव निवृत्तिनाथ आणि ब्राह्मवृंदाला नमस्कार करून बाहेर आले. रेडा शांतपणे रवंथ करीत उभा होता. ज्ञानदेवांनी रेड्याच्या पाठीवरून प्रेमाने हात फिरविला. त्याची कातडी थरथरली.

ज्ञानदेवांनी डोळे बंद केलेत. रेड्याच्या माथ्यावर उजवा हात ठेवून आपली शक्ती त्याच्यात प्रवाहित करायला सुरुवात केली. आता रेडा ज्ञानदेवांकडे पाहू लागला. कुठलाही शब्द अद्याप बाहेर पडलेला नव्हता. मग ज्ञानदेवांच्या मुखातून ऋग्वेद पाझरू लागला... ॐ अग्निमीळे पुरोहितं यज्ञस्य देवमृत्विजम् । होतारं रत्नधातमम् ।। ज्ञानदेवांच्या मुखातून बाहेर पडणारे ऋग्वेदाचे स्वर व रेड्याच्या कर्णरंध्रातून हृदयात व मेंदूत गेलेत. त्या चेतनामय ध्वनी कंपनांनी आपले कार्य केले. रेड्याने आपले मस्तक ज्ञानदेवांच्या पायावर ठेवले व तो उच्च स्वरात ऋग्वेदाचे पठन करू लागला. हा चमत्कार पाहून सर्व वैदिक आश्चर्याने स्तब्ध झालेत. ज्ञानदेवांचे डोळे मिटलेले होते. निवृत्तिनाथांच्या डोळ्यातून अश्रुगंगा वाहू लागली. सारं चराचर स्तब्ध झालं. रेड्याच्या धीरगंभीर ऋग्वेदातील दैवी नादाने पूर्ण वातावरण भारून टाकले. तेथे उपस्थित असलेले सर्व लोकांचे श्वास आपोआप रोखल्या गेलेत.

कुणालाच दुसऱ्या कशाचेही भान राहिले नाही. आक्रस्ताळेपणाने विरोध करणारे गणेशभट्ट थरथर कापू लागले. त्यांच्या तोंडातून शब्दच फुटेना. अपराधीपणाची भावना उत्कट झाली. अहंकार ढासळला. स्वतःला त्यांनी ज्ञानदेवांच्या पायावर लोटून दिले व अश्रूंनी त्यांचे पाय धुवून काढले. सर्वच धर्ममार्तंडांनी ज्ञानदेवांना साष्टांग नमस्कार केला. पण ज्ञानदेवांची समाधी लागली होती आणि रेडा वेदपठन करीतच होता... **अग्निः पूर्वेभिरृषिभिरीड्यो नूतनैरुत। स देवां एह वक्षति।।** त्या वेद म्हणणाऱ्या रेड्यालाही लोकांनी प्रणाम केला. त्यावेळी उपस्थित असलेले सर्वात श्रेष्ठ पंडित केवलशास्त्रींनी खूप विनयाने ज्ञानदेवांना विनंती केली... 'ज्ञानेश्वरा, पशुमुखातील हे वेदपठन कृपया थांबवावं! आपण अंतरबाह्य शुद्ध आहात. आपण स्पर्श कराल ते सर्व शुद्धच होईल.

'ज्ञानदेवांमधील ईश्वरीशक्तीचे दर्शन झाल्यावर सर्व त्यांना ज्ञानदेवऐवजी 'ज्ञानेश्वर' म्हणू लागले. साऱ्यांनी त्यांचा जयजयकार केला. त्यांना शुद्धीपत्रच नव्हे, तर अतिविनयाने मानपत्र देण्यात आले. सांडणीस्वाराच्या हाताने मृद्‌गलशास्त्रींना आळंदीला शुद्धीपत्र पाठवण्यात आले. सगळीकडे एवढी प्रसिद्धी होऊनही आळंदी गावातील महादेव शास्त्री व विसोबा यांना अजून या भावंडांचे थोरपण कळले नव्हते. एक दिवस मुक्ताईने निवृत्तिनाथांसाठी मांडे भाजायचे ठरवल्यावर तिला मांडे भाजायला परळ (मातीचा तवा) हवे होते. विसोबाने त्रास द्यायला मुद्दाम कुंभारवाड्यात जाऊन सगळे परळ फोडून टाकले. मग ज्ञानेश्वरांनी योगशक्तीने आपली पाठच ताव्यासारखी लाल तापवली; त्यावर मुक्ताईने मांडे भाजले. हे सगळे लपून पाहणाऱ्या दुष्ट विसोबाला आपली चूक कळली व तोही मग ज्ञानेश्वरांचा भक्त झाला.

तापी नदीच्या काठावर १४०० वर्षे तप करून चांगदेव महाराजांनी अनेक सिद्धी व विद्या हस्तगत केल्या होत्या. बालवयातच त्यांनी १४ विद्या व ६४ कला आत्मसात केल्या होत्या. पण परमात्मास्वरूपाचे पूर्ण ज्ञान नसल्यामुळे ते सदैव कष्टीच असत. त्यांना शिष्यांकडून ज्ञानेश्वरांची माहिती कळली. आत्मज्ञान झाल्याशिवाय योगविद्येने रेड्याच्या तोंडून वेद बोलवणे अशक्य आहे, हे त्यांना चांगलेच माहीत होते. त्यांनी ज्ञानेश्वरांना कोरं पत्रं पाठवलं. त्यावर ज्ञानेश्वरांनी ६५ ओव्या लिहून 'चांगदेव पासष्टी' त्यांना पाठवली. ते वाचून त्यांना ज्ञानेश्वरांना भेटण्याची उत्कंठा लागली. पण येताना ते एका वाघावर बसले. चाबकासारखा हातात एक विषारी साप घेतला. सोबत त्यांचे शेकडो शिष्य हातात त्रिशूळ घेऊन त्यांचा जयजयकार करीत होते. त्यावेळी चारही भावंड एका भिंतीच्या कट्ट्यावर बसले होते. चांगदेवांचा अहंकार हरण करण्यासाठी ज्ञानेश्वरांनी ती निर्जीव भिंतच चालवली व चांगदेवांचं स्वागत करायला भिंतीवर बसून वायुमार्गाने त्यांना समोर गेलेत. हे पाहून चांगदेवांचा अहंकार गळून पडला. यथावकाश त्यांना मुक्ताईने गुरुमंत्र दिला.

गुरुवार, २२ ऑगस्ट इ. स. १२७५ रोजी जन्म झालेल्या ज्ञानेश्वर महाराजांनी रविवार, २ डिसेंबर इ. स. १२९६ रोजी वयाच्या २१ व्या वर्षी संजीवन समाधी घेतली. वयाच्या १५ व्या वर्षी लोकांना गीता कळावी म्हणून सोप्या भाषेत ज्ञानेश्वरी हा ग्रंथ लिहिला. त्यातील शेवटचे पसायदान तर जगाच्या शांतीसाठी महामंत्रच आहे. याशिवाय 'चांगदेव पासष्टी' व 'हरिपाठाचे अभंग' या त्यांच्या लोकप्रिय भक्तिरचना आहेत. संत नामदेव त्यांचे समकालीन मित्र होते. पुढच्या काळातील संत रामदासस्वामी, संत तुकाराम, संत एकनाथ, अक्कलकोटचे श्रीस्वामी समर्थ, शिर्डीचे साईबाबा, शेगावचे संत गजानन महाराज, संत श्री शंकर महाराज, संत श्री गोंदवलेकर महाराज व अनेक संतांचे अनेक चमत्कार प्रसिद्ध आहेत. त्यात अगदी कमी स्वयंपाकात हजारोंचे भोजनदान, मृत झालेल्या व्यक्तींना जीवनदान किंवा आजाराने ग्रासलेल्या भक्तांना रोगमुक्ती, पाण्याने दिवे प्रज्वलित करणे व अनेक चमत्कार त्यांच्या चरित्रात आपण वाचतो किंवा ऐकतो.

चमत्कार कसे होतात? जेव्हा कुणी सात्त्विक साधक स्वार्थाचा विचार न करता शुद्ध मनाने, भक्ती किंवा एकाग्रतेने परमात्म्याशी एकरूप होतो; तेव्हा या पूर्ण विश्वातील शक्ती त्याला उत्तम पारमार्थिक कार्य पार पाडायला उपलब्ध होतात व केवळ त्यांच्या सात्त्विक इच्छेने सामान्य लोकांना अशक्य वाटणारी गोष्ट घडून जाते. लोक त्याला 'चमत्कारद म्हणतात. पण प्रत्यक्षात परमात्म्याशी तादात्म्य पावलेल्या व्यक्तीसाठी ती एक सहज प्रक्रिया असते. अशा चमत्कारांमुळे लोक उत्तम विचार व कृती करायला उद्युक्त होतात. काही चमत्कार कुंडलिनी जागृत झालेल्या व्यक्ती करू शकतात. पण जर कुंडलिनी जागृत करणारी व्यक्ती शुद्ध व सात्त्विक विचाराची नसेल तर कुंडलिनी जागृत झालेल्या व्यक्ती व त्यांच्यामुळे इतरांना भयानक त्रास होऊ शकतो.

### सर्व संतचरित्रातून काय बोध घ्यायचा?

फक्त पैसा, सत्ता, शारीरिक सुखे या भौतिक गोष्टींना महत्त्व न देता, माणुसकीला प्राथमिकता द्या. कुणाला फसवू नका. कुणावर अन्याय करू नका. आपले आयुष्य चांगल्या कार्यात, चांगल्या उद्दिष्टांसाठी वेचा हा संदेश संतांनी दिला.

तुमच्या ईश्वराची प्रामाणिक भक्ती करा व इतर धर्मीयांचा सन्मान ठेवा. चांगले कर्म कराल तर चांगले फळ प्राप्त होईल हा विश्वास दिला. या संतांनी प्रसंगी अन्यायी व दुष्ट लोकांना शिक्षासुद्धा केली. कुणी अन्यायाने तुम्हाला एका गालावर मारले तर दुसरा गाल पुढे करून अन्याय करणाऱ्याला उत्तेजन देऊ नका तर अन्यायाचा प्रतिकार करा. स्वतःच्या व आपल्या परिवाराच्या रक्षणासाठी हातात शस्त्र धरायलाच हवे, हे सर्व संतांचे परमदैवत असलेल्या श्रीराम, श्रीकृष्ण, श्रीशंकर यांनी स्वतःच्या जीवनातून आपल्याला शिकविले आहे.

शास्त्र शिकून विद्वान व्हा. शस्त्र शिकून व प्रसंगी वापरून बलवान व्हा, सुरक्षित राहा, हा बोध घ्या. आपल्याच देशात राहत असूनही आपल्या मुली-सुना, शोभायात्रा, मंदिरे असुरक्षित झाली आहेत. संतांच्या शिकवणीनुसार आपण सगळ्यांनी एकोप्याने राहायला हवे. जातिगणना करा म्हणणाऱ्या नेत्यांना देशाबाहेर हाकला. देशात बेकायदेशीरपणे घुसणाऱ्या शत्रूंना व त्यांना मदत करणाऱ्यांना बाहेर घालवा. त्यांना मोकळं रान देणारे कायदे व जमीन हडपणाऱ्या संस्था बंद करा.


### २. इंट्युशन शिबिरात अतींद्रिय शक्ती जागृती:

एक १२ वर्षांची मुलगी अजिबात अभ्यास करत नव्हती. सतत चिडायची, त्रागा करायची. मग तिचे पालक तिला इंट्युशन शिबिरात घेऊन गेलेत. आणि फक्त तीन दिवसात तिच्यात आश्चर्यकारक बदल झाला. ती एकदम शांत झाली. डोळ्याला अजिबात दिसणार नाही अशी काळी पट्टी बांधून रंग ओळखू लागली, वाचू लागली. तिची स्मरणशक्ती वाढली. आधी तिला फक्त ३० टक्के गुण मिळायचे; आता तिला ८० टक्के गुण मिळू लागलेत. आठवीत शिकणारी दुसरी मुलगी अशाच शिबिरात गेल्यावर तिची साधारण स्मरणशक्ती 'फोटोग्राफिक मेमरी'मध्ये परावर्तित झाली. जन्मापासून अंध असलेली मुले अगदी अचूक रंग सांगून वाचू लागली. अशाच एका शिबिरात १५ वर्षे वयाच्या मुलीची अतींद्रिय शक्ती जागृत झाली. हरवलेली वस्तू कुठे आहे ते ती सांगू लागली. चीनमधील एका व्यक्तीचा लॅपटॉप चोरी गेला.

अत्यंत महत्त्वाची माहिती त्या लॅपटॉपमध्ये होती. त्याने या भारतीय मुलीची मदत घेतल्यावर, तिने तो लॅपटॉप या क्षणी कुठे व कसा ठेवला आहे. तो कोणत्या रस्त्याजवळ आहे, हे चिनी भाषेत सुंदर अक्षरात लिहून दिले. तिने आयुष्यात कधीही चिनी भाषा शिकली किंवा ऐकली नव्हती. मग ती भाषा तिला कशी कळली? त्या चिनी माणसाला तो लॅपटॉप बरोबर त्याच ठिकाणी सापडला. आणखी एक मुलगी तिची शक्ती जागृत झाल्यावर समोरच्या व्यक्तीच्या शरीराचे रोगांच्या दृष्टीने स्कॅनिंग करून त्या व्यक्तीला सध्या कोणता त्रास नेमका कशामुळे व केव्हापासून झाला आहे. शिवाय त्यावर कोणता उपाय योग्य ठरेल ते सांगू शकते. तसेच आयुष्यात कोणते ताणतणाव कशामुळे निर्माण झालेत. ते कसे कमी करता येतील ते अगदी अचूक सांगते. वर वर्णन केलेल्या काही अतींद्रिय शक्ती, ६ ते १५ वयोगटातील काही विद्यार्थ्यांना मिडब्रेन ॲक्टिव्हेशनच्या क्लासमध्ये तेथे शिकविलेल्या विविध मेंदूच्या व्यायाम प्रकारातूनसुद्धा प्राप्त झाल्या.

### महत्त्वाचे आकलन :

लेखाच्या पहिल्या भागातील संतांच्या चमत्कारी शक्ती दैवीकृपेने, योगसामर्थ्याने व भक्तीच्या शक्तीने साध्य झाल्यात. दुसऱ्या भागात वर्णन केलेल्या किशोरवयातील मुलामुलींच्या शक्ती निरागस मनाने विशिष्ट व्यायाम करून, मेंदूची चेतना जागृत करून व ध्यानसाधनेने प्राप्त झाल्या व त्यांच्या व्यक्तित्वाचा उत्तम विकास झाला. (लेखक सायकॉलॉजिस्ट, करीअर कौन्सेलर व सॉफ्ट स्किल्स ट्रेनर आहेत.)



## समतोल राखी । सर्वकाळ ।।

मीठाशी इमान । राखावे संसारी ।।
रामकृष्ण हरि । परमार्थ ।।१।।

हाती सदा काम । मूखी हरिनाम ।।
तोचि जाण राम । पुण्यवंत ।।२।।

आशेचे बंधनी । गुंतू नको फार ।।
निष्काम ते सार । जीवनाचे ।।३।।

काया वाचा मने । भजे पांडुरंग ।।
नांदतो श्रीरंग । अंतरात ।।४।।

संसार परमार्थ । पुण्याची पालखी ।।
समतोल राखी । जन्मभर ।।५।।

प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
९३०२०२९१७८

## सुनीता

काळेकुट्ट निर्वात, निर्जीव
सर्वत्र हे अवकाश आहे
म्हणतात तरी निष्ठूर
ते परतण्या अवकाश आहे
नाही जमीन, आकाश नाही
निराधार अंतराळ आहे
कायमचीच रात्र येथे
गोठलेला काळ आहे
सुंदर दुरून, भयाण जवळून
अनंत हे अंतरिक्ष आहे
सुरक्षित तू यावीस लवकर
हेच आमचे लक्ष्य आहे
दुस्साहसांचा मानवांना ध्यास
वा हव्यास आहे येशील
तू परतून लवकर आम्हास
हा विश्वास आहे

डॉ. शंतनू कुळकर्णी

## श्रीहरी

श्रीहरी, नित्य न्याहरी, नवनीत चोरी ।
हा हरी, कृष्णनरहरी, चित्तनीत चोरी ।।१।।
बासरी, वाजवी हरी, सुस्वरलहरी ।
रसभरी, आझे श्रीहरी, नादे मनोहारी ।।२।।
श्रीहरी, नाचे शिरावरी, कालिया जहरी ।
श्रीहरी, चिन्ह पद शिरी, नागशिरीधरी ।।३।।
श्रीहरी, नाद नरहरी संत, नरनारी श्रीहरी,
भक्तिगुण धरी, बांधी अंतरी ।।४।।
श्रीहरी, करी चाकरी, एकनाथा घरी ।
हा हरी, स्तुत्य व्यवहारी, ऋण फेडी त्वरी ।।५।।
श्रीहरी, व्यापिला जरी, सृष्टी साजिरी ।
श्रीहरी, क्षितिज बहू दुरी, मनवा जरी अधरी ।।६।।

डॉ. मिलिंद इंदूरकर

# गुंतवणूक: फळणारी आणि अडचणीचीही!

अर्थोद्योग
महेश देशपांडे

रिअल इस्टेट क्षेत्राबाबतच्या ताज्या पाहणीमधून ग्राहक वर्गाच्या भावनांविषयी काही दखलपात्र मुद्दे समोर आले. त्याच वेळी बँकांमधील मुदत ठेवींवरील व्याजदरात वाढ होण्याची शक्यता समोर आली. याच सुमारास बांगलादेशमधील संघर्ष संत्रा उत्पादकांच्या मुळावर आल्याने शेतीतली गुंतवणूक अडचणीमध्ये आल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. दरम्यान, ॲपलने विक्रीचा खास विक्रम नोंदविल्याची माहिती पुढे आली.



अलिकडेच समोर आलेल्या रिअल इस्टेट क्षेत्राबाबतच्या पाहणीमधून काही महत्त्वाचे मुद्दे समोर आले. त्याच वेळी बँकांमध्ये मुदत ठेवीच्या माध्यमातून केलेली गुंतवणूक फायद्याची ठरण्याची शक्यता समोर आली. याच सुमारास बांगलादेशमधील संघर्ष संत्रा उत्पादकांच्या मुळावर आल्याने त्यांची शेतीतली गुंतवणूक अडचणीमध्ये आल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. दरम्यान, ॲपलने विक्रीचा खास विक्रम नोंदविल्याची माहिती पुढे आली. विकासाच्या मार्गावर धावणाऱ्या भारतीय अर्थव्यवस्थेचा वेग मंदावण्याची शक्यता आहे.

घर खरेदीदार आणि गुंतवणूकदार यांच्यातील भावना निर्देशांकात घसरण झाल्याचे एका अहवालात दिसून आले आहे. जागतिक तणावादरम्यान, रिअल इस्टेट डेव्हलपर्स आणि वित्तीय संस्था पुढील सहा महिन्यांमध्ये रिॲल्टी क्षेत्रातील वाढीबद्दल सकारात्मक आहेत. रिअल इस्टेट सल्लागार नाईट फ्रँक आणि रिअल इस्टेट क्षेत्रातील नियामक 'नॅशनल रिअल इस्टेट डेव्हलपमेंट कौन्सिल' यांनी २०२४ च्या दुसऱ्या तिमाहीसाठी निर्देशांक जारी केला आहे. रिअल इस्टेट सेंटिमेंट इंडेक्सच्या दुसऱ्या तिमाहीनुसार, २०२४ च्या पहिल्या तिमाहीमध्ये सध्याची भावना ७२ अंकांच्या सार्वकालीन उच्चांकावरून ६५ अंकांवर घसरली आहे.

भविष्याची धारणादेखील ७३ अंकांवरून ६५ अंकांवर आली आहे. इंडेक्समध्ये हा आकडा ५० असेल तर मागणीमध्ये स्थैर्य दिसू शकते. संख्या ५० पेक्षा जास्त असेल तर मागणी वाढण्याची शक्यता आहे; ती ५० पेक्षा कमी असल्यास मागणी कमी होण्याची शक्यता आहे. हे आकडे रिअल इस्टेटच्या वाढीबद्दल अधिक संयत दृष्टिकोन दर्शवतात, ज्याचा परिणाम निवडणूक आणि अर्थसंकल्पीय अनुमानांनी झाला आहे. वर्तमान आणि भविष्यातील ६५ पॉईंट भावना अजूनही सकारात्मक आहेत. अर्थव्यवस्था सकारात्मक राहिली असून प्रमुख निर्देशकांमध्ये स्थिरता दिसून येत आहे. अलिकडेच रिझर्व्ह बँकेच्या अधिकाऱ्यांसोबत झालेल्या बैठकीदरम्यान अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी बँकांच्या घटत्या ठेवींबद्दल चिंता व्यक्त केली होती. अर्थमंत्र्यांनी बँकांना ठेवी वाढविण्यासाठी आकर्षक योजना आणण्यास सांगितले होते. सरकारच्या या भूमिकेनंतर सर्वच बँका ठेवी वाढविण्यात गांभीर्याने गुंतल्या आहेत. आगामी काळात केवळ कर्जेच महाग होणार नाहीत, तर एकामागून एक मुदत ठेवी सुरू होऊन आकर्षक व्याज मिळण्याचीही शक्यता आहे. रिझर्व्ह बँकेच्या आकडेवारीनुसार, बँकिंग प्रणालीमध्ये कर्जाचा वाढीचा दर १३.७ टक्के असून ठेवींच्या वाढीचा वार्षिक दर केवळ १०.६ टक्के आहे. याबाबत यापूर्वीही अनेकदा चिंता व्यक्त करण्यात आली होती. अलिकडे आरबीएल बँक, बँक ऑफ महाराष्ट्र, फेडरल बँक आणि तामिळनाडू मर्कंटाईल बँकेसह अनेक लहान बँकांनी विशेष मुदत ठेवीच्या योजना सुरू केल्या आहेत. बँक ऑफ महाराष्ट्रने ७७७ दिवसांच्या ठेवींवर ७.२५ टक्के व्याज जाहीर केले आहे. आता एक नजर अडचणीत आलेल्या शेतीतील गुंतवणुकीवर. महाराष्ट्रातील संत्रा उत्पादक शेतकऱ्यांसमोर मोठे संकट आले आहे. नागपूर आणि आजूबाजूच्या परिसरात मोठ्या प्रमाणात संत्र्याचे उत्पादन होते. बांगलादेशमधून या संत्र्यांना मोठी मागणी असते. दर हंगामात बांगलादेशला अडीच लाख टन संत्र्यांची निर्यात होते; पण बांगलादेशमधील अराजक स्थितीमुळे संत्र्यांची निर्यात रखडली आहे. याचा शेतकऱ्यांना मोठा फटका बसत आहे. विदर्भातून बांगलादेशला निर्यात होणाऱ्या अडीच लाख टन संत्र्यांचे यंदा काय करायचे, असा प्रश्न शेतकऱ्यांसमोर उभा ठाकला आहे. विदर्भातील अनेक संत्रा उत्पादक शेतकऱ्यांनी आपल्या संत्रा बागांमध्ये लाखो रुपये गुंतवून निर्यातयोग्य, दर्जेदार संत्री उत्पादनासाठी खास प्रयत्न सुरू केले होते; मात्र आता ही गुंतवणूक अडचणीमध्ये आली आहे. अजूनही संत्र्याचे उत्पादन बाजारात येण्यास दीड ते दोन महिन्यांचा कालावधी शिल्लक आहे. ऑक्टोबर महिन्यात संत्रा बाजारात येण्यास सुरुवात होईल. यंदा बहर चांगला असल्याने दमदार उत्पादन होण्याची शक्यता आहे. त्यामुळे केंद्र सरकारने हस्तक्षेप करून संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना नवी बाजारपेठ शोधण्यास मदत करावी, अशी अपेक्षा संत्रा उत्पादक शेतकरी, व्यापारी आणि निर्यातदारांनी व्यक्त केली आहे.

'ॲपल'ने भारतात मोठा विक्रम केला आहे. गेल्या ५० वर्षांमध्ये कोणतीही कंपनी करू न शकलेला विक्रम या कंपनीने केला आहे. या कंपनीचा विक्रम हा उत्पादन आणि निर्यातीबाबत आहे. या कंपनीची उलाढाल दोन लाख कोटी रुपयांवर पोहोचली आहे. या कंपनीच्या व्यवसायात मोठी वाढ झाल्याचे दिसून येत आहे. ॲपल ही कंपनी भारतात आली, तेव्हा काही वर्षांमध्ये उत्पादन आणि निर्यातीच्या बाबतीत ५० वर्षांमधला विक्रम मोडेल, असे कोणालाही वाटले नाही; मात्र आता हे घडले आहे. २०२४ मध्ये भारतात ॲपलच्या उत्पादन आणि निर्यातीत प्रचंड वाढ झाली आहे. सध्या कंपनीची उलाढाल दोन लाख कोटी रुपयांच्या पुढे गेली आहे. गेल्या ५० वर्षांमधील हा मोठा विक्रम आहे. विशेष म्हणजे 'ॲपल'च्या व्यवसायात गेल्या वर्षभरात जवळपास दुप्पट वाढ झाली आहे. दोन वर्षांपूर्वी चीनमधील कोविड उत्पत्ती आणि प्रसारामुळे 'ॲपल'ने आपले धोरण बदलले आणि भारतात प्रवेश केला. त्यानंतर कंपनीने येथे उत्पादन वाढवले.

आता भारत ही केवळ ॲपलसाठी मोठी बाजारपेठ बनलेली नाही, तर पुरवठा करणारे एक आघाडीचे केंद्र बनले आहे. आयफोन आणि ॲपलची इतर उत्पादने भारतातून जगातील अनेक देशांमध्ये निर्यात केली जात आहेत. मागील काही वर्षांपासून आयफोनच्या निर्यातीत मोठी वाढ झाली आहे. ॲपल आणि फॉक्सकॉन भारतात आपल्या उत्पादन युनिट्सचा सतत विस्तार करत आहेत. मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करत आहेत. भारत सरकारची 'पीएलआय' योजनाही यामध्ये खूप उपयुक्त ठरली आहे. 'ॲपल'च्या भारतातील कामकाजात आर्थिक वर्ष २०२४ मध्ये दोन लाख कोटी रुपयांची वाढ झाली आहे. २०२३ या आर्थिक वर्षात ही उलाढाल १.१५ लाख कोटी रुपये होती. आयफोन उत्पादन आणि मॅकबुक, आयमॅक, आयपॅड, वॉच आणि एअरपॉड्सच्या देशांतर्गत विक्रीत वाढ झाल्यामुळे ही वाढ दिसून आली आहे. विशेष बाब म्हणजे गेल्या ५० वर्षांमध्ये भारतातील ॲपलच्या सर्व युनिट्समध्ये उत्पादन आणि निर्यातीत सर्वाधिक वेगाने वाढ झाली आहे. 'ॲपल'च्या एकूण उत्पादनात भारताचा वाटा सुमारे १४ टक्के आहे. २०२३ मध्ये कंपनीचा हिस्सा केवळ सात टक्के होता. अधिकृत आकडेवारीवर आधारित गणना दर्शवते की, निर्यातीच्या आकडेवारीवर 'आयफोन'चे वर्चस्व आहे. गेल्या आर्थिक वर्षात सुमारे १.३५ लाख कोटी रुपयांची उपकरणे परदेशात पाठवली गेली. गणनेनुसार, ॲपल २०२४ मध्ये देशांतर्गत उत्पादने विकून अंदाजे ६८ हजार कोटी रुपये कमावतील. याउलट, आर्थिक वर्ष २०२३ मध्ये निर्यात केलेल्या 'आयफोन'चे मूल्य ६६ हजार कोटी रुपये होते. (लेखक आर्थिक घडामोडींचे अभ्यासक आहेत.)

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री बाळाजी जोशी यांचा जन्म २७ जानेवारी १९०१ मध्ये झाला. ते मराठी लेखक आणि साहित्यिक या शिवाय कोशकार व सामाजिक शास्त्रांचे अभ्यासक-संशोधक म्हणूनही ओळखले जातात. १९५१ मध्ये प्रकाशित असलेल्या त्यांच्या वैदिक संस्कृतीचा विकास ह्या ग्रंथाला १९५५ मध्ये भारतीय साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाला. हा मराठी ग्रंथाला मिळालेला पहिला साहित्य अकादमीचा पुरस्कार होता. अस्पृश्यता निवारण, विधवांचे पुनर्विवाह, अशा सामाजिक कार्यात सुद्धा लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी सहभाग घेतला.


# 'वैदिक संस्कृतीचा विकास' मधील सामाजिक सांस्कृतिक विकासाचे संदर्भ

साहित्य शिक्षण
किरण डोंगरदिवे
भ्र. ७५८८५६५५७६

वैदिक संस्कृतीचा इतिहास ह्या ग्रंथात शास्त्रीजींनी वेदकालीन संस्कृती, वैदिक समाजव्यवस्था व कुटुंबसंस्था, पुराणे व रामायण काळातील संस्कृती, जैन व बौद्ध संस्कृती व इस्लाम व ब्रिटीश काळातील प्रभाव या सर्वांचा लेखक तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी वैदिक संस्कृतीचा विकास या पुस्तकात सविस्तर आढावा घेतला आहे. संस्कृतीच्या अध्यात्मिक भागात धर्म, नीती कायदा, विद्या, कला प्राविण्य, साहित्य सर्व प्रकारचे मानवी सद्गुण आणि शिष्टाचार यांचा समावेश होतो, असे जेव्हा शास्त्रींजी म्हणतात, तेव्हा संस्कृतीच्या विकासासोबत वरील सर्व गोष्टींमध्ये प्रगती अपेक्षित असून ती शिक्षणाशिवाय शक्य नाही. विद्या आणि सद्गुण असलेल्या मनुष्याला सुसंस्कृत असे म्हटले जाते.

विद्या आणि कला यांच्या क्षेत्रात विकास क्रम निश्चित करता येतो. सर्व प्रकारच्या अनुभवाचे व विचाराचे क्षेत्र व्यापणाऱ्या कल्पना सांगणारे विज्ञान ही विद्येची उच्चतर अवस्था आहे त्यात गणित तर्कज्ञान आणि तत्वज्ञान यांचा अंतर्भाव होतो असे जेव्हा लेखक म्हणतात, तेव्हा ते प्राधान्य प्रमाणे मानव समाजाच्या विकासाला त्याला अनुभवातून मिळालेले शिक्षण महत्त्वाचे आहे असे सांगत असतात. वेदकालीन संस्कृती या प्रकरणांमध्ये शास्त्रीजी म्हणतात, आर्य अर्धवट भटके व ग्रामीण संस्कृतीचे होते. सिंधू संस्कृती नागर होती नगररचनेचे तंत्र आर्य नीट रीतीने सिंधू संस्कृतीच्या लोकांपासून कधीच शिकले नाहीत या अवतरणाचा विचार करता आर्य जर सिंधू संस्कृतीकडून वास्तुशास्त्र शिकले असते तर ते लवकरच स्थिरावले असते. त्यांचा सामाजिक विकासही मोठ्या प्रमाणात झाला असता. मात्र, त्यांना ती कला शिकून घ्यावीशी वाटली नाही. योग विद्या ही हिंदूधर्मातील श्रेष्ठ विद्या असून बौद्ध आणि जैन यांच्या परंपरेतही ही विद्या श्रेष्ठ मानली गेली आहे. असे अत्यंत महत्त्वाचे तत्कालीन विद्या कोणत्या आणि पिढी दर पिढी त्या कशा चालत आल्या त्यातून त्या विद्येचे संक्रमण कसे झाले इत्यादी बाबतही लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी भाष्य केलेले दिसून येते.

वेद या शब्दाचा मूळ अर्थ ध्यान किंवा विद्या असा होतो या अर्थाने वेदकालीन सर्व विद्यांचा निर्देश वेद या संज्ञामध्ये केलेला दिसून येतो. त्यात आयुर्वेद, धनुर्वेद, गांधर्ववेद, इतिहास वेद असे निर्देश दिसून येतात. चार वेदांचा विचार केला असता वैदिक संस्कृतीचा विकासामध्ये अनुभव ज्यांनी शिक्षण ही माणसाच्या प्रगतीची शिडी होती असे म्हणावे लागेल. संहिता, ऋचा, सूक्त, उपनिषदे, आरण्यके, अशा अनेक बाबींवर लक्ष्मण शास्त्री जोशी यांनी आपली मते अतिशय सूक्ष्म पणे मांडली आहेत. ब्राह्मण महात्म्य या वेच्यात मेधावर्धन म्हणजे बुद्धीच्या विकासासाठी ब्राह्मणांच्या प्रार्थना असत असे दिसते. यावरून बुद्धी विद्या आणि ज्ञान या तिन्ही गोष्टीला वेदकालीन संस्कृतीमध्ये महत्व होते हे लक्षात घ्यावे लागते. सम्राट जनक यांच्याकडे यज्ञकर्ते ब्राह्मण तत्त्वज्ञान शिकण्याकरता येत असत, असा उल्लेख छांदोग्योपनिषद यात सापडतो. यावरून शिक्षण देणे ही पुन्हा एका धर्माची मक्तेदारी कधीच नव्हती याकडे सुद्धा शास्त्रीजी आ-पले लक्ष वेधून घेतात. मोजण्याची कला केव्हा गणित या विषयांमध्ये वैदिकांनी दशांश पद्धती शोधून काढले, अंकसंख्येचा वाचक म्हणून वापर केला, त्यावरून वैदिक लोकसंख्या लिहीत असत




हे निश्चित होते. शून्याचा शोध ही गणित शास्त्रातील महत्त्वाची क्रांती होती, ती सुद्धा वैदिक काळातच झाली. अशा अनेक सूक्ष्म बाबींवर भाष्य करतो लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी वेदकालीन संस्कृतीमधील शैक्षणिक संदर्भांचा प्रसंगोचित असा आढावा घेतला आहे. वेदांची तार्किक प्रज्ञेत परिणीती या प्रकरणांमध्ये सनत्कुमाराकडे नारद ज्ञान प्राप्तीसाठी जातो. त्यावेळी सनत्कुमार नारदास विचारतो की, तू काय काय शिकला आहेस? ते सांगून पुढील प्रश्न विचार. यावर ऋग्वेद, यजुर्वेद, अथर्ववेद, इतिहास, पुराणे या सर्व विद्या येत असल्या तरी आत्मविद्या मात्र नाही असे नारद म्हणतात. या प्रसंगाचा उल्लेख तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी केला. त्यामागे वेद आले म्हणून तत्त्वज्ञान प्राप्त होते असे नाही. आत्मज्ञान म्हणजे वरील सर्व विद्यांचा वापर करून स्वतःच्या वेगळ्या भूमिकेवर पोहोचवून स्वतःची दिशा ठरवता येणे हेच खरे ज्ञान आणि शिक्षण होय. त्याचबरोबर ज्ञानाचा अहंकार होऊ नये ज्ञानी गुरूला शरण जावे अशा बाबींकडे लेखकाने लक्ष वेधले आहे. सांस्कृतिक विकासामध्ये न्यायदर्शन व वैशेषिक दर्शन हे बौद्धिक शुद्ध कल्पनांची उभारणी करणारी महत्त्वाची दर्शने आहेत. बौद्धिक संस्कृतीच्या दृष्टीने ही दर्शने भारतीयांच्या विद्याराधनेतील एका उच्च परिणतीचे दर्शन घडवितात. न्याय-वैशेषिक दर्शनानी निर्माण केलेल्या प्रवृत्तीचे अनुकरण करून बौद्ध व जैन आचार्यांनी तर्कशास्त्राच्या अभ्यासांत भर घातली. असे लक्ष्मणशास्त्री जोशी नमूद करतात बरोबर हिंदू धर्म सोबतच बौद्ध धर्म सांस्कृतिक विकासासाठी महत्त्वाचा धागा कसा होता हे सांगत असताना दिङ्नाग नामक बौद्ध आचार्याने मध्ययुगीन तर्कशास्त्राचा प्रारंभ केला. बौद्धांचे तर्क ग्रंथ बरेचसे नष्ट जरी झाले, तरी त्यांची तिबेटी भाषांतरें तिबेटांतील बौद्धमठांत सुरक्षित स्वरूपांत सापडतात.

जागतिक दर्जाचे विद्यापीठ समजल्या जाणाऱ्या प्राचीन नालंदा विद्यापीठाचा थोर तत्त्वज्ञ बौद्ध आचार्य धर्मकीर्ति सातव्या शतकाच्या प्रारंभी होऊन गेला. त्याने प्रमाणवार्तिक न्यायबिंदु इत्यादि तर्कग्रंथ रचले. युरोपमध्ये बर्कले याने जो विश्वस्वप्नवाद प्रतिपा दिला त्याचीच मांडणी बर्कलेच्या पूर्वी चौदाशें वर्षे अगोदर धर्म-कीर्तीने प्रमाणवार्तिकांत केली होती. धर्मकीर्तीचे न्यायबिंदू व प्रमाणवार्तिक हे ग्रंथ अलीकडे मूळ सस्कृतांत महापंडित राहुल सांकृत्यायन यांना सापडले. यावरून जागतिक ज्ञान आणि अभ्यास यांच्या तु-लनेत भारत कितीतरी जास्त प्रगत होता हे लक्षात येते. नालंदा विद्यापीठ ही जागतिक दर्जाची सर्वात प्राचीन अशी साहित्य संस्था या भारतामध्ये होती, हे महत्त्वाचे अवतरण शास्त्रजी नमूद करतात. अर्थशास्त्रकार कौटिल्य चाणक्य यांच्या काळात भारतीय राजे आणि ब्राह्मण नास्तिक विद्येचा अभ्यास करत ही अतिशय महत्त्वाची बाब जेव्हा लेखक नमूद करतात तेव्हा चार्वकाची जडवादी विचारसरणी त्याच्या नास्तिकतेसह या देशांमध्ये अभ्यासली जात होती. त्याचप्रमाणे नास्तिक ही एक विचारसरणी आहे तिचा सुद्धा अभ्यास झाला पाहिजे हा विचार तत्कालीन लोक करत असत हे लक्षात घ्यावे लागते. कौटिल्याच्या अर्थशास्त्राप्रमाणे पाणीनीचे व्याकरण ती सुद्धा एक ज्ञानदेणगी भारताने जगाला दिली आहे. ज्योतिषी आणि वैद्यक विद्या या सुद्धा वेदांमधून आलेले आहेत आणि हे मुळापासून भारतीयांचे विज्ञान आहे. हे सुद्धा लक्ष्मण शास्त्री जोशी सांगतात. चरक संहितेची भाषांतरे अरबी आणि पर्शियन भाषेमध्ये नवव्या शतकामध्ये झालेली आहेत. त्या वेळच्या इतर राष्ट्रांना माहित नसलेले शस्त्रक्रियेचे प्रगल्भ तंत्र सांगणारा ग्रंथ म्हणून याची ख्याती होती. पृथ्वीची स्वतःभोवतीची दैनंदिन फेरी हे दिवस रात्र होण्याचे कारण आहे हे आर्यभट्टाने इसवी सन ४९९ मध्ये लिहून ठेवले. आर्यभट्ट बीजगणिताचा जनक होता. या बाबीवरून गणित किंवा शास्त्रासारख्या विषयांसह खगोलीय ज्ञानातही भारत पुढारलेला होता, असे या ग्रंथातून लेखक सांगतात. याज्ञवल्क्याने गार्गी वाचक्नवी नामक ब्रह्मवादिनीस ब्रह्मवेत्त्यांच्या सभेत सांगितलेल्या अक्षरविद्येत नीतिशास्त्राचा विचार पुनः या उपनिषदांत मांडला आहे. असे जेव्हा आपण या पुस्तकात वाचतो तेव्हा भारतात अगदी सुरुवातीच्या काळामध्ये यांनाही शिक्षण देणारे काही आचार्य कार्य करत होते हे लक्षात घ्यावे लागते. तसेही पुत्र नसेल तर मुलीचा अधिकार पुत्रवत मानला जात होता आणि अशा मुलीला पत्रिका असे म्हटले जायचे. तिच्यापासून झालेल्या मुलाला तिच्या पित्याच्या संपत्तीचा वारसा लाभत असे. कन्यादानाचे पद्धतीपेक्षा उभय पक्षी स्वयंवराची पद्धतही त्याकाळी रूढ होती त्यावरून स्त्रियांना आपला पती निवडण्याचा अधिकार होता हे वेगळे सांगण्याची गरज नाही. त्यामुळे स्त्रियांना वैदिक संस्कृतीमध्ये कोणतेच हक्क नव्हते असे म्हणणे पूर्णपणे रास्त होत नाही. वेदाध्ययनाने ऋषी ऋणाची फेड होते म्हणजेच ब्रह्मचार्याश्रम अथवा शिक्षण घेऊनच ऋषी ऋणातून मुक्त होता येते अशा शब्दांमध्ये वैदिकमधील शिक्षणाचे महत्त्व लक्षात घ्यावे.

(पूर्वार्ध)

पान १ वरून

## नरेंद्र मोदींच्या युक्रेन दौऱ्यामागचे गणित?

भारत-रशिया यांच्यामध्ये व्यापार वाढणार असला तरी गुंतवणूक, पर्यटन, शिक्षण आणि तंत्रज्ञान या क्षेत्रांमध्ये भारत पाश्चिमात्य देशांकडे वाटचाल करत आहे. त्या देशांतून गुंतवणूक आणि अत्याधुनिक तंत्रज्ञान मिळवायचे तर त्यांच्या विश्वासास पात्र ठरणे आवश्यक आहे. त्या चौकटीमध्येच परराष्ट्र धोरणामध्ये स्वायत्तता चालू शकते. भारत आणि युक्रेनमधील संबंध सुधारण्यास मर्यादा असली तरी युक्रेन भेटीमुळे अमेरिका आणि युरोपीय देशांच्या मनात भारताबद्दल निर्माण झालेली अढी कमी होऊ शकते. गेल्या दहा वर्षांमध्ये भारताच्या संरक्षण क्षेत्रातील निर्यातीमध्ये तब्बल ३१ पटींनी वाढ झाली आहे. आपण सर्वाधिक किमतीची शस्त्रास्त्रं अमेरिकेकडून घेतो, तसेच शस्त्रास्त्रांची सर्वाधिक निर्यातही अमेरिकेला करतो. मोदी युक्रेनचा दौरा करत असताना संरक्षणमंत्री राजनाथ सिंह अमेरिकेला गेले होते. तेथे त्यांनी स्वाक्षर्या केलेल्या संरक्षण करारांकडे लक्ष दिल्यास भारत आणि अमेरिकेतील सहकार्याची वाटचाल नेमकी कोणत्या दिशेने सुरू आहे, हे स्पष्ट होते.


## मविआचे गुन्हेगारीवर लाजिरवाणे राजकारण

या दोन्ही घटनांचा उल्लेख एवढ्यासाठीच केला की, या दोन्ही घटना संपुआ सरकारच्या काळात घडल्या होत्या. पहिल्या घटनेनंतर संपूर्ण देशात प्रचंड आक्रोश उसळल्यानंतर कायद्यात बदल करण्यात आला व त्याचा लाभ वकिलांनी अशा प्रवृत्तींना नेस्तनाबूत करण्यासाठी योग्य पद्धतीने घेतला व दुसऱ्या घटनेत गुन्हेगारांना फाशीच्या शिक्षेपर्यंत घेऊन जाण्यात यशस्वी ठरले. ही वेगळी गोष्ट आहे की, न्यायालयाने या तिन्ही आरोपींची फाशीची शिक्षा रद्द करून त्यांना जन्मठेपेची शिक्षा सुनावली. पण, या प्रक्रियेला देखील तब्बल आठ वर्षे लागली. नुकतेच पंतप्रधान नरेंद्र मोदींनी लाल किल्ल्यावरून महिलांवर होणाऱ्या अत्याचाराबाबत जाहीर चिंता व्यक्त केली. ते म्हणाले की, अशा घटना ज्यावेळेस घडतात, फक्त त्यावेळेस गदारोळ माजविला जातो व काही वर्षांनंतर जेव्हा आरोपीला शिक्षा मिळते, त्यावेळेस कोणाचेही लक्ष नसते. त्यामुळेच कायद्याची भीती हळूहळू नाहीशी होत चालली आहे. अशा खटल्यांवर न्यायपालिका काय निर्णय देते, हे त्यांच्या अखत्यारीत येते व त्यांचा तो पूर्ण अधिकार आहे. पण, कायद्याची जबाबदारी सांभाळणाऱ्या राजकारण्यांनी एक गोष्ट नेहमी लक्षात ठेवली पाहिजे की, गुन्ह्यांचे राजकारण न करता, तो गुन्हा कशा पद्धतीने टाळता येईल, त्याबद्दल विचार करणे गरजेचे आहे. कारण, सत्ता येते आणि जाते. पण, ज्या दुर्दैवी घटना आज समाजात घडत आहेत, त्याच घटना उद्या देखील घडू शकतात, याचे भान असले पाहिजे. त्यामुळे अशा घटनांवर होणारे कीळसवाणे राजकारण सर्वप्रथम थांबविले पाहिजे.

महाराष्ट्रातील गेल्या १५ वर्षांचा इतिहास जर बघितला, तर बलात्काराच्या घटना वाढतच गेल्या आहेत. २००९ साली पुण्यातील आयटी क्षेत्रातील मुलीचे अपहरण करून बलात्काराची घटना समोर आली होती. २०१३ साली मुंबईतील वांद्रे टर्मिनसवर दिल्लीवरून आलेल्या प्रीती राठीवर ॲसिड फेकण्यात आले. एवढेच नव्हे तर, २०१९ ते २०२२ पर्यंत महाविकास आघाडी सरकारच्या काळातही महाराष्ट्र अपराधमुक्त झाला नाही. २०२१ साली साकीनाका बलात्कार कांड असू दे, २०२० साली नांदेडमध्ये अल्पवयीन मुलीवरील बलात्काराची घटना, २०२१ साली तर एका १५ वर्षीय मुलीवर ३३ नराधमांनी सलग कित्येक महिने अत्याचार केल्याची घटनाही आपल्या सर्वांसमोर आली होती. २०२१ साली बीड येथे घडलेली घटना, २०२१ सालीच पुणे येथे घडलेले सामूहिक बलात्कार कांड, २०२० साली सिंधुदुर्ग येथे घडलेली घटना व २०२१ साली घडलेले बहुचर्चित दिशा सालियन हत्याकांड, अशी ही महिला अत्याचाराच्या गुन्ह्यांची यादी फार मोठी आहे.

बदलापूर येथे दोन लहान मुलींवर घडलेल्या अत्याचाराच्या घटनेवर 'बंद'चे आव्हान करण्यात आले व नंतर तोंडावर काळी पट्टी लावून निषेध व्यक्त करणाऱ्याच्या कार्यकाळातच वरील नमूद केलेल्या अत्याचारांच्या घटना घडल्या होत्या. पण, मग आज महिला अत्याचाराच्या घटनांना विरोध करणार्यांनी, त्यांच्या कार्यकाळात घडलेल्या अत्याचारांच्या प्रकरणांवर कधी काळी पट्टी लावून निषेध व्यक्त करून, राजकारण केले होते का? म्हणूनच अशा गोष्टींवर राजकीय पोळ्या न शेकता, यांसारख्या घटनांवर नियंत्रण आणण्यासाठी कठोर पाऊले उचलणे गरजेचे आहे आणि त्याच पद्धतीने आताचे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याद्वारे कठोर पाऊले उचललीदेखील जात आहेत. बदलापूर कांडाचा गुन्हा दाखल झाल्या झाल्याच पोलिसांनी आरोपीला बेड्या ठोकल्या व गुन्हा नोंद करण्यासाठी ज्या ज्या पोलिसांनी दिरंगाई केली, त्यांना ताबडतोब निलंबितदेखील करण्यात आले. ही ताबडतोब कारवाई केल्यानंतर राजकारण करण्यासाठी कुठेच वाव मिळत नाही. अशा सर्व घटनांमुळे राजकारणाचा स्तर दिवसेंदिवस आणखीन खालावत चालला आहे व सरकारी यंत्रणेवरदेखील जनतेचा विश्वास कमी होण्यास मदत होत आहे. बदलापूर प्रकरणात जनतेच्या मागणीनुसारच हे प्रकरण जलदगती न्यायालयात वर्ग करण्यात आले व उज्ज्वल निकम यांसारखे सक्षम वकील नियुक्त करून जनतेमध्ये विश्वास निर्माण करण्याचे प्रयत्न केले. पण, आता उज्ज्वल निकम यांच्या नियुक्तीवरूनही काँग्रेसने राजकारण सुरु केले, हे दुर्दैवीच. ज्या कर्तृत्ववान वकिलाने 'शक्ती मिल' कांडामध्ये सहा महिन्यांच्या आत गुन्हेगारांना फाशीची शिक्षा मिळवून दिली, त्या वकिलाच्या कर्तृत्वाबद्दल काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी शंका निर्माण करणे, हे दुर्दैवीच. कारण काय तर, निकम यांनी भाजपतर्फे लोकसभा निवडणूक लढवली होती. जर हाच आधार असेल, तर अभिषेक मनू सिंघवी व कपिल सिब्बल हे दोघे कर्तृत्वशून्य असल्याचे मान्य करतील का?

## कालचक्र



सुखाचा काळ होता
दिवस मंतरले होते
फुलांच्या वाटेत मी
जगणे अंथरले होते

दिवस हळवे तरीही
साद घालती अजुनी
बालपण दरवळते
जणू चारही बाजूनी

दुनिया ही नक्षत्रांची
कशी घेऊ मी कवळून?
काल परवाच तर गेले
दु:ख भरजरी जवळून!

गेले भरारूनी दिवस
जगायचे राहून गेले;
जगतो म्हणता म्हणता
जगणेच वाहून गेले!

हा काळ कोणता,
कोणता हा गाव?
एका क्षणात कसा
गेला उलटून डाव?

वाट संपत नाहीये
पोळलेत जरी पाय
तापल्या दुधालाच
येतात म्हणे साय!

नियतीची किमया सारी
खेळ रोजचा नवा आहे;
जगण्यासाठी मला पण
जुनाच काळ हवा आहे!

पुंडलिक आंबटकर

## वनमाला ठमाताई....

गौरव
शरद चव्हाण

आपल्या वक्तृत्वाच्या जोरावर ठमाताईंनी वेळ पडल्यानंतर विरोधकांच्या व्यासपीठावर जाऊन ही अथवा वनवासी कल्याण आश्रमाच्या विरोधात वैचारिक संघर्षामध्येही अनेक वेळेला सडेतोड भूमिका मांडत विरोधकांना गप्प केलेले आहे. आदिवासी वनवासी, आदिवासी हिंदू नाही अशा आरोपांचे खंडन करतांना ठमाताईंच्या वाणीला विशेष धार चढते. डीलिस्टिंगच्या पुण्यामधील जाहीर सभेत भाषण करताना विरोधकांनी भर सभेत गोंधळ माजवत हल्ला चढवला की, आम्ही हिंदू नाही आहोत तेव्हा ठमाताई मंचावरून कडाडल्या, कोण म्हणत आदिवासी, वनवासी हिंदू नाही? आदिवासी वनवासी ही आहे आणि तो हिंदूच आहे. अशा कठीण प्रसंगी धीरोदत्त केलेल्या भाषणचा समाजमनावर दीर्घ काळ प्रभाव पडतो.

अनेक व्यासपीठावर अगदी मुख्यमंत्र्यांपासून ते कलेक्टर आणि सरकारी अधिकार्यांपर्यंत ही निवेदनाच्या माध्यमातून ठमाताईंनी आपली आणि संघटनेची भूमिका मांडलेली आहे. त्यामुळे केवळ जनजाती समाजाचेच नाही तर सर्व समाजाचे ही खऱ्या अर्थाने नेतृत्व करत आहेत. राम आमचा वंशज नाही. आम्ही देवाला मानत नाही अशा वैचारिक गोंधळामध्येही वैचारिक वादविवादा बरोबर कार्यकर्त्यांमधील श्रद्धा कायम ठेवण्यासाठी प्रात्यक्षिकाची जोड ही रायगड परिसरात ठमाताईंनी दिली, ती शबरी यात्रा सुरू करून. कल्याण आश्रम कामाच्या बरोबरीने समाजातील मनाला भिडणारे अनेक विषय त्यांनी हातात घेण्यास सुरुवात केली. त्यातील अभिनव व अनोखा प्रयोग म्हणजे १९९८ मधील सामूहिक विवाह. आदिवासी वनवासी क्षेत्रामध्ये अनेक उदात्त कल्पना आहेत ज्या लिव्ह अँड रिलेशनशिपमध्ये आपण आज वावरत आहोत ते आदिवासी समाजामध्ये अनेक वर्षापासून समाजमान्य पद्धतीने सुरू आहे. त्यात लग्न न करता ही केवळ समाजाची संमती घेऊन एकत्र राहता येतं, संसार स्थापता येतो आणि मग कधीतरी उतार वयात लग्न करण्याची प्रथा आहे.

ठमाताईंचा एकूण समाजाकडे बघण्याचा दृष्टिकोन हा मातृवत झाल्यामुळे सर्व ठिकाणी मायेची पाखरण त्यांनी पेरली. त्या परिसरात ज्यांना कोणी नव्हतं त्यांना काकू आणि ठमाताईंचा आधार निर्माण होऊ लागला. त्यांच्या शेजारी राहणाऱ्या दोन बहिणी आई-वडील वारल्यामुळे अनाथ झाल्या. त्यातील एक पायाने अधू अपंग होती. स्वाभाविकपणे ठमाताई तिच्या आई झाल्या. मोठ्या बहिणीला ही चिंता; हीचे कसे करायचे. वस्तीतील एक मुलगा तिला स्वीकाराला तयार होता. परंतु, लग्न लावण्याची ऐपत नसल्याने बहिणीचा सल्ला होता की, तू लग्न न करता त्याच्या घरी राहिला जा.

मुलीने आपले दुःख हे ठमाताईंना सांगितले. ठमाताईंनी जबाबदारी स्वीकारून तिचे लग्न लावून दिले. त्यानंतर अशा मुलींचा शोध सुरू झाला अथवा ज्यांनी संसार केला पण लग्न अजून झालेले नाही त्यांचे सामूहिक विवाह समाजाला सोबत घेवून होवू लागले. जनजाती समाजात सामूहिक विवाहाची प्रथा सुरू झाली. त्यामुळे पूर्वी लग्नानिमित्त होणार्या अनेक कुरीती बंद झाल्या. करता- करता गेल्यावर्षी एकत्रित २६३ जोडप्यांचे सामूहिक विवाह सोहळा ठमाताईंच्या नेतृत्वाखाली वनवासी कल्याण आश्रमाने तडीस नेला.

आदिम जमातीतील कातकरी असलेल्या ठमाताईंच्या कर्तृत्वाचा सुगंध सर्वदूर दरवळू लागला, अनेक पुरस्कार त्यांना मिळू लागले. परंतु प्रत्येक पुरस्कार स्वीकारताना संघटनेची परवानगी घेऊनच त्यांनी तो विनमपणे आपल्या संस्कृतीची नाळ जपत जनजाती पेहरावातच स्वीकारला. यात महाराष्ट्र शासनाचा आदिवासी सेवक पुरस्कार, नातू फाउंडेशनचा पुरस्कार, राष्ट्रपती पुरस्कार असो वा उंच माझा झोका हा पुरस्कार असो. कौतुकाची बाब म्हणजे या पुरस्काराच्या सन्मानार्थ मिळणारी राशी, उदाहरण म्हणून राष्ट्रपती पुरस्कारात एक लाखाचा धनादेश ही समाविष्ट होता. परंतु अत्यंत निस्पृह भावनेने त्यांनी तो वनवासी कल्याण आश्रमाच्या खात्यात जमा करून टाकला. आपण आज जे काही आहोत ते कल्याण आश्रमामुळे आहोत याची जाणीव ठमाताईंनी आजपर्यंत ठेवलेली आहे. अशी कर्तुत्वान महिला संघ परिवारात कशी काय तिच्यामुळे या वनवासी क्षेत्रात आपल्याला काही करता येत नाही. निर्माण झालेली सामजिक बांधिलकी संपवायची असेल तर तिचे सामाजिक कामबंद झाले पाहिजे. त्यासाठी सोपा उपाय म्हणजे राजकीय क्षेत्रात आणले पाहिजे. यासाठी शरद पवारांपासून, शिवसेना, काँग्रेस पक्षाने त्यांना नगरसेवक, जिल्हा पंचायत ते अगदी आमदार होण्यासाठी अनेक वेळा त्यांच्या झोपडीचा



दरवाजा ठोठावला. परंतु संघटने प्रति अत्यंत निष्ठावान असलेल्या ठमाताईंनी प्रत्येकाला स्पष्टपणे नकार देताना हेच सांगितले की, मला सामाजिक काम करायचे आहे. मी माझ्या भाषणाच्या मार्फत माझं मलाच निक्षून सांगितलेले आहे की, हा आपला मार्ग नाही. त्यामुळे मी माझ्या विचारांशी प्रतारणा करणार नाही आणि मी सामाजिक कामातच शेवटपर्यंत राहीन. आपल्यापैकी प्रत्येकाने आजच्या या परिप्रेक्षात विचार करून बघावा राजकारणाची संधी त्यानिमित्ताने सर्व सुविधा मिळत असताना केवळ आपल्या निर्णयावर ठाम व त्यापासून अलिप्त राहून आजही साधेपणाने व खडतर जीवन जगणे हे खरच कठीण आहे.

विविध पुरस्कार मिळाल्यामुळे त्यातच महाराष्ट्र शासनाचा आदिवासी सेवक पुरस्कार प्राप्त झाल्यामुळे अनेक सरकारी योजना ठमाताईंच्या दारात हात जोडून उभ्या राहू लागल्या. कारण त्यांना देणे सरकारी यंत्रणेला भागच होते. त्यातूनच ठमाताईंच्या लक्षात आले, मला योजनेचा लाभ तर सहज मिळेल पण मी घेतले तर अन्य समाज बांधवांना मिळणार नाही. आपली प्रगती होईल पण आपल्या व आपल्या समाजबांधवांमध्ये दरी निर्माण होईल. परंतु योजना तर हाताच्या जावू द्यायच्या नाहीत त्यातूनच योजना नेमक्या काय असतात. सरकारी यंत्रणेतून त्या कशा पदरी पाडून घ्यायच्या. ह्याचा अभ्यास सुरू झाला. आपल्या हक्काच्या योजना घ्यायच्या पण नियमाने, भ्रष्टाचार न करता व सरकारी बाबूंना एकाही रुपयाची लाच न देता. ह्या कामात आपल्याला युवकांची फौज उभी करावी लागेल. जी ह्या विरोधात उभी राहील. झाले सेनापती ठमाताई व बीनेचे शिलेदार युवक युवती. त्यांच्यामार्फत विविध राजकीय व सामाजिक म्हणवणार्या नेत्यांना, ठेकेदारांना व सरकारी यंत्रणेला कधी गोड बोलून तर कधी वचक दाखवत ठमाताईंनी १२५ घरकुल मंजूर करून घेतली ती ही एकही पैसा स्वतः न घेता व न देता. योजना मंजूर झाल्यानंतर अनेक ठिकाणी मिळालेल्या योजनेचाही गैरफायदा घेतला जातो तो गैरफायदाही किंवा आपल्या व कल्याण आश्रमाच्या नावाला गालबोट लागू नये ह्या निर्धाराने ठमाताईंनी ऐकून १२५ परिवाराला श्रमदानाने आपल्याच निर्माण होणार्या घरासाठी कारसेवा करण्यास प्रवृत्त केले व ते स्वतःसह अमलात आणून घरकुल योजना खर्या अर्थाने सफल केली. याचाही परिणाम स्थानिक राजकीय पक्षांवर बरोबरीने सरकारी यंत्रणेवरी खोलवर उमठला कारण इतका पारदर्शी झालेला बहुतेक तो पहिलाच सरकारी कारभार होता. सर्वत्र ठमाताईंचं कौतुक ही झाले.

(पान ६ वर)

संत रामदासस्वामींना उद्धव, कल्याण, वेण्णास्वामी असे अनेक थोर शिष्य लाभले. त्यांनी विविध मठांद्वारे व साहित्याद्वारे समर्थ संप्रदायाचा झेंडा डौलाने फडकत ठेवला. गुरू रामदासस्वामींचा रामभक्तीद्वारे लोकजागृतीचा मंत्र, उपदेश मस्तकी शिरोधार्थ मानून त्यांनीही अवघा हलकल्लोळ केला. देशभर पसरलेल्या समर्थ स्थापित मठांचे कार्य अपूर्व आहे. शिष्य परिवारीतील संत वेण्णा, संत गिरीधर, माधवस्वामी, श्रीधरस्वामी यांनी कोदंडधारी रघुवीराचे आपापल्या परीने गुणसंकीर्तन केले. त्यांच्या साहित्यात समर्थ रामदास प्रणित रामभक्तीचे विलोभनीय दर्शन घडते.

लेखांक ३५

# समर्थ शिष्य परिवाराची 'रामभक्ती'

## १) संत वेणाबाई २) संत गिरीधर ३) संत माधवस्वामी

...रघुनंदन
विद्याधर ताठे
भ्र.९८८१९०९७७५

उत्तम कार्यकुशल आणि अध्यात्मिक सत्वसंपन्न अधिकारी शिष्यपरंपरा लाभणे हे कोणत्याही पंथ-संप्रदायाचे भाग्य व भविष्य असते. समर्थ रामदासांना हेवा करावा असे एकापेक्षा एक निष्ठावान सक्षम शिष्य लाभले. अर्थात समर्थांनी असे शिष्य तयार केले, घडवले ही त्यांची खरी थोरवी. समर्थ रामदास स्वामींना उद्धव, कल्याण वेण्णास्वामी, आक्कास्वामी, दिनकर गोसावी, भीमस्वामी असे अनेक शिष्य लाभले. या शिष्यांनी श्रीराम व समर्थ रामदास यांची आध्यात्मिक थोरवी गात पारमार्थिक कार्य केले. या शिष्यांपैकी अनेकांनी भक्ती साहित्यात मौलिक भरही घातली आहे.

धुळे येथील वाग्देवता मंदिरात आपणास सर्वांचे साहित्य मूळ स्वरूपात पाहता, अभ्यासता येईल असे जतन करून ठेवण्यात आलेले आहे. समर्थांच्या शिष्य परिवारातील अनेकांच्या साहित्यात राम-रामायण विषयी लिहिलेले आढळते. त्यामध्ये मिरज मठाच्या वेण्णास्वामी यांनी लिहिलेले १५६८ ओव्यांचे 'सीता स्वयंवर', मन्नागुडी मठाचे मेरूस्वामी यांनी लिहिलेले 'श्रीराम चरित्र' आणि दक्षिण प्रांतातील माधवदास कृत 'रामायण' हे विशेष उल्लेखनीय आहे. तंजावर येथील सरस्वती महल संग्रहालयातही आपण हे साहित्य पाहू शकतो. तसेच भक्त समर्थ भक्त श्रीधरस्वामी यांचे समग्र साहित्य सातारच्या भक्तिधाम द्वारे श्री. रामकाका वसंतगडकर यांनी ग्रंथरूपात प्रकाशित केलेले आहे. त्यामध्ये भगवान श्रीधरस्वामी कृत मराठी व संस्कृत भाषेतील अनेक स्तोत्रे आहेत. त्यात 'रामपाठ', 'श्रीरामचंद्र प्रभू' रामप्रार्थना अशा तीन मराठी आणि 'श्री रामभद्रस्तोत्रम' हे संस्कृत स्तोत्र विशेष आहेत.

**'सीतास्वयंवर' व 'संकेत रामायण' :-**

समर्थ शिष्या वेण्णाबाई तथा वेण्णास्वामी या ज्ञानसंपन्न विदुषी शिष्या होत्या.कारुण्य, वैराग्य, पांडित्य आणि परतत्त्वस्पर्शी कवित्व लाभलेल्या वेण्णाला वेण्णास्वामी, वेणीराम नावाने भक्त मंडळी ओळखत होती. प्रारंभी संत एकनाथांच्या 'नाथ भागवत' ग्रंथाचा त्यांच्यावर विशेष प्रभाव होता. त्यांचा काळ इ.स. १६२८ ते १६७८ मानला जातो. त्यांनी समर्थांच्या कृपेने 'सीतास्वयंवर' नावाचा ग्रंथ लिहिला तो रामायणावर आधारीत आहे. त्याशिवाय त्यांनी



'वेणीरामायण' लिहिले ते प्रकांडाचे आहे.

**हे सीतेचे सैंवर (स्वयंवर) ।**
**वाल्मिकी बोलिला विस्तार।**
**रम्य रसाळ सुंदर । नाना विलासे करोनी।।**

या सीता स्वयंवराच्या वरातीमध्ये वर्हाडी म्हणून धर्म, अर्थ, काम, मोक्ष हे चार पुरुषार्थ नटून थटून सहभागी झाले होते. अशी सुंदर कल्पना वेण्णास्वामींनी या काव्यरचनेत केलेली आहे.

**समर्थदेवे वेणाबाईसी वरदाने दिधली।**
**सीतास्वयंवर रामायणे वदविली।।** (समर्थ प्रताप)

या 'सीतास्वयंवर' शिवाय वेणी गिरीधर कृत 'संकेत रामायण' नावाची रचना मिळते. या संकेत रामायणातील ७ कांडापैकी ६ कांडे ही वेणाबाईंच्या हातची असून केवळ ७ वे एकच कांड गिरीधर यांनी लिहिले असा अभ्यासकांचे समर्थहृदय श्री शंकरराव देव यांचे मत आहे.

'रामदास आणि रामदासी' मालेतील त्रेचाळीसाव्या भागात श्री.शं.श्री. देव यांनी वेणी रामायण छापले आहे. त्याची ओवी संख्या १५३६ इतकी आहे. हे रामायण मात्र पाच कांडांचेच आहे. या वेण्णाबाई कृत रामायणाच्या पाच कांडांमध्ये गिरीधर याने आणखी दोन कांडे जोडून वेणाबाईंचे रामायण पूर्ण केले तेच वेणा गिरीधर कृत 'संकेत रामायण' असावे असे एक मत आहे. मराठवाड्यातील बीड स्थित रामदासी मठाचे गिरीधरस्वामी हे महंत होते व ते समर्थशिष्या वेणाबाईंच्या शिष्य बाईयाबाई यांचे शिष्य होते. वेणाबाई या गिरीधरांच्या परात्पर गुरू होत्या. यावरून वेण्णाबाईंनी अनेक महिलांना समर्थ दीक्षा देऊन समर्थ केले होते, हेही लक्षात येते.

गिरीधराचे ग्रंथकर्तृत्व अफाट आहे. 'समर्थ प्रताप' मुळे ते विशेष विख्यात आहेत पण आणखी विशेष गोष्ट म्हणजे गिरीधरांनी पाच वेगवेगळी रामायणे लिहिली आहेत. १) संकेत रामायण २) अब्द रामायण ३) मंगल रामायण ४) छंदो रामायण आणि ५) सुंदर रामायण. या पाचामध्ये 'संकेत रामायण' सर्वात मोठे आहे तर 'मंगल रामायण' श्लोकबद्ध असून त्यात एकूण १५१९ श्लोक आहेत.

**माधवस्वामींची दोन रामायणे:-**

समर्थांचे शिष्य राघवदास हे दक्षिण भारतातील समर्थानुयायी महंत म्हणून प्रसिद्ध होते. त्या राघवदासांचे शिष्य 'माधवस्वामी' (१६४८ ते १७०८) हे विद्वान व व्यासंगी होते. त्या माधवस्वामींनी लिहिलेली दोन रामायणे तंजावरच्या सरस्वती महल संग्रहालयात मिळतात. १) श्लोकबद्ध रामायण २) ओवीबद्ध रामायण. माधवस्वामींनी ओवीबद्ध रामायणाच्या शेवटी लेखनकाल दिलेला असून तो शके १६१७ असा आहे. या ओवीबद्ध रामायणाची एकूण ओवी संख्या १७२९० एवढी प्रचंड आहे. म्हणजे हा ग्रंथ जवळ जवळ दासबोधा एवढा प्रचंड आहे. माधवदास यांच्या या ओवी रामायणाचा लेखन क्रम सलग नाही. त्यांनी प्रथम किष्किंधा कांड लिहिले व सर्वात शेवटी अरण्यकांड लिहून रामायण पूर्ण केले. माधवदासांचे 'ओवी रामायण' पूर्ण ७ कांडांचे संपूर्ण आहे. पण त्यांचे 'श्लोक रामायण' फक्त युद्धकांडापर्यंतच असून एकूण श्लोक ७२६ आहेत. हे माधवस्वामी थोर संत, भावार्थ रामायणाचे लेखक, एकनाथमहाराज यांच्या कन्येचे पुत्र आहेत. म्हणजे संत एकनाथांचे नातू आहेत.

संत एकनाथांच्या दोन्ही मुलींच्या मुलांनी म्हणजे नाथांच्या दोन नातवंडांनी मराठी साहित्यविश्वात 'रामायण' लिहून स्थान प्राप्त केलेले आहे. ते दोन प्रख्यात नातू म्हणजे १) पंडित कवी मुक्तेश्वर आणि २) दक्षिण भारतातील समर्थशिष्य राघवदासांचे शिष्य माधवस्वामी. समर्थ रामदासांचे व संत एकनाथांचे कौटुंबिक-पारिवारीक नाते होते. त्याचा हा वृद्धिंगत झालेला 'रामभक्ती' धागा आहे. यातून आपणास समर्थ संप्रदाय आणि वारकरी संप्रदायाचे अंतरंग साम्यभावाचे अद्वैत समन्वयी एकात्म दर्शन घडते. असा हा संप्रदाय समन्वय हेच महाराष्ट्रभूमीचे खास वैशिष्ट्य आहे.

# जेष्ठांचा आनंद तरुणाईसाठी प्रेरणादायी ठरावा



अमृतकुंभ
प्रा. वसंत गिरी
भ्र. ९०११२२९२३२

सकाळी चालायला गेल्यावर अनेक जेष्ठ नागरीकांची भेट होते. एकेकांची स्वभाव वैशिष्टे, मानसिकता किंवा त्यांच्या वाट्याला आलेली प्रश्नांची गुंतागुंत पाहिली की, आपल्या विचाराला चालना मिळते. त्यातील काहींनी आपल्या नकारात्मक विचाराने आपले दैनंदिन प्रश्न वाढविलेले असतात. तर काही आपल्याभोवती निर्माण झालेल्या प्रश्नांची गुंतागुंत सकारात्मक विचाराने सोडविण्यासाठी सक्रीय असतात. शक्यतो कशाचाही मोह न ठेवता कुटुंब, आप्तेष्ठ व स्नेहीजनांना आनंदी ठेवणारे तेच खरे जेष्ठ. पण, ज्या व्यक्तीमत्वात सर्व गोष्टी याऊलट आढळतात. ते खरे वृद्ध. वयाने, शरीराने, मनाने आणि विचाराने सुद्धा.

एके दिवशी सकाळी चालता-चालता सदाअण्णा आजोबांना सहज म्हणालो, आजोबा आता एकट्याने प्रवास करणे टाळा. त्यावर तात्काळ उत्तर मिळाले. आता जगून तरी काय करायचं? अन् आता मौतीलं, सावडायलं, तेरवीलं जायचं आसलं तं नंबर आमचाचं. कारणं आमचं तिकीट नाही लागतं. अहो मास्तर, आमचं मरणपण बिना तिकीट झालं पाहिजे, आसं वाटते. या नालायक औलादींना. आमची सगळी कमाई मात्र आलगद यांच्या तोंडात येवून पडली पाहिजे. थोडं अनपेक्षित उत्तर मिळाल्याने मी जरा सावध झालो. आता आपलं आग्रही मत मांडण्यापेक्षा त्यांना काय वाटते? ते जाणून घेवू, असा विचार करुन मी पुढे त्यांना म्हणालो, आजोबा प्रवास करताना जोडीदार सोबत घेवून फिरण्याविषयी तुमचं मत काय? त्यावर उत्तर मिळाले. अहो, मास्तर घरी आसल्यावर बाई डोस्क्याल कमी किकरं लावती का? पारं भूगा करुन टाकती बघा डोस्क्याचा. आता तरं मले वाटते की डोस्क्यातं मेंदू नावाची काही गोष्ट शिल्लक राह्यली का नाही? काही पत्ताच लागतं नाही बघा. अहो, बाहीरं आल्यावर तुमच्यासारखे काही माणसं भेटतात तेवढंच आमचं आनंदी जग. एकदा घरी गेल्यावर जेवढी दातखिळी बसवून घेतली तेवढं चांगल. एकदा मी घरात गेल्यावर आजेबात बोलायचं नाही. असं ठरवून उगं गप्पगार बसतो. कोणं कायं बोलतंय लक्षच द्यायचं नाही म्हणलं. तरं घरवाली म्हणती, म्हथारं बहीरं झालं वाटते. लगेच सून म्हणती, मुकं बी झालं वाटते. अन् हे ऐकून आमच्या वंशाचा दिवा दात काढतोय. आता हे ऐकूनं घरातली सगळी माकडाची पीलं गप्प बसणार का? आसं आपल्या जीवाचं हासं झाल्यावर कोणाच्या सोबतं प्रवास करण्यात तरी काय मजा हे, आता तुम्हीच सांगा? मी थोडा विचार करतच पुढचा प्रश्न विचारला, तुम्ही घरुन निघाल्यावर हायवे ओलांडून येता. तुम्हाला भिती वाटत नाही का? यावर त्यांच उत्तर, आता आमच्यावाचून कोणाचं काही आडतं का? आम्ही आज मेलो काय, अन् उद्या मेलो काय? फक्त जातांना पटकन जागच्या जागी जीव गेला पाहिजे. फालतूचा त्रास आपल्याला नको, अन् आपल्यामुळं कोणालं नको. सदाण्णा बहुतांशी घरातीलं कटूसत्य फार स्पष्ट शब्दात सांगून गेले. माझ्या डोक्यातही विचारांचं काहूर सुरु झालं.

उतारवयातही आपलं शरीर स्वास्थ्य खूप उत्तम राहावे, यासाठी काही जेष्ठ नागरीक आग्रही असतात. त्यामुळे अति व्यायाम, अति चालणे हा प्रयोग करुन उतार वयात तरुण होण्याचे अघोरी प्रकार करतानांही दिसतात. अचाट साहस दाखविण्याचे हास्यास्पद प्रयोग करून नेमके ते काय साध्य करतात? या प्रश्नाची उकलं ब्रह्मदेवासही होऊ नये, याची काळजी घेणारे जेष्ठ काही लोकांसाठी श्रेष्ठ असू शकतात. पण आपले वर्तन हे सर्वमान्य झाले नाही तरी ते सर्वसमावेशक करण्याचा किमान प्रयत्न करायला काही हरकत नसावी.

भरपूर वाचन किंवा प्रसार माध्यमांचा उपयोग करुन नव्या पिढीसमोर किंवा पुढच्या पिढीसाठी काही विचारधन ठेवणारे ज्येष्ठ आपल्या कार्यावर निष्ठा ठेवून कार्यरत राहतात. आपल्या कार्याचा विनोद करणार्या चिल्लर नाण्याकडे फारसे लक्ष देण्याची त्यांना गरज वाटतं नाही. ते कितीही खणखण वाजत असले तरी त्याला आता लवकर भिकरीही घेत नाही. हे ओळखून असणारे जेष्ठ समाज व देशासाठी श्रेष्ठ असतात. आपले आरोग्य सांभळतांना आरोग्य संवर्धनाचा मार्ग नैसर्गिक असावा. त्यामुळे तो आपल्यासाठी हिताचा असेलच पण पुढच्या पिढीला मार्गदर्शक ठरेल. यासाठी ते सदैव जागरूक असतात. सेवानिवृत्तीनंतर त्यांना आपली संपत्ती वाढवून हावरटपणाचा अतिरेक करण्याची गरज वाटत नाही. त्याबाबत 'पांढरे केस आणि हिरवी मने' ऐवजी हिरवट मनाचे ज्येष्ठ फक्त निसर्ग नियमानुसार वयाने मोठी असतात. मी किती माया जमा केली म्हणून माझे कौतुक करा. अशी त्यांची प्रवृती असते. त्यामुळे भाडोत्री भाट लावून ते स्वतःवर दिवे ओवाळून घेतात. त्या झगमगाटात आपला चेहरा किती लख्ख चमकतो, हे सिद्ध करण्यासाठी त्यांचे कौतुक सोहळे सुरु असतात.

भूतकाळ विसरुन भविष्याची फार चिंता न करणारे जेष्ठ नागरिक सदासर्वदा कोळसा उगाळत नाहीत. कसं होईलं, काय होईलं या मंत्राचा जप करत नाहीत. पचेलं तेवढच खातात. भूक नसताना कुस्करू कुस्करू हाणा. अशा वर्तनाचे लग्नातील वर्हाडी होतं नाहीत. जेष्ठ नागरीकांनी बाथरूम व स्वच्छता गृहात सावकाश वावरले पाहिजे. आतं गेल्यावर पैशाचा अतिविचार करणार्या व्यवहार दक्ष अनेक जेष्ठ नागरिकांना दरवाजा तोडूनच बाहेर काढावे लागले. या वस्तुस्थितीचा विसर पडू देवू नये. धूम्रकांडी, मद्यदांडी आणि नॉनव्हेज हंडी सोबत वाहवत जाणे टाळावे. याबाबतीत तळीराम आदर्श ठेवून तळीरामगट निर्माण करुन आपल्या कर्तृत्वाची व आपण भोगलेल्या हालापेष्टाची दर्दभरी कहानी कोणालाही ऐकवण्यात धन्यता मानू नये.

वारंवार तीच कॅसेट ऐकवल्यास थोड्याच कालावधीत ते ऐकण्यासाठी भाड्याने माणसे मिळणार नाहीत. मद्यधुंद झालेल्या जेष्ठांना आपला भूतकाळ खूप आठवतो. लख्ख प्रकाश झाल्यावर जसे सर्व स्पष्ट दिसते तसे मद्यधुंद झाल्यावर विस्मरणाची शिकार झालेल्या अनेक घटना त्यांना आठवतात आणि मग, अभी तो मैं जवान हूं. ही त्यांची अवस्था होते. असे कृत्रिम प्रयोग टाळणे आपल्या स्वास्थ्यासाठी लाभदायक असते. निवृत्तीनंतर आपल्याला प्रवासाची आवश्यक्ता वाटतं असल्यास आपला जोश आणि होश लक्षात घेवून प्रवास करावा. तो प्रवास आणि त्यातील आपली आवड याविषयीच्या कल्पना स्पष्ट असाव्या. तो टूर कंपन्यांच्या फायद्यासाठी करुन आपला वेळ, पैसा, धावपळ आणि जीव धोक्यात घालणे म्हणजे आपली विवेक बुद्धी गहाण ठेवणे होय. अर्थात हे माझे व्यक्तीगत मत आहे. अतिभावनाप्रधान होवून कुणावर तरी अतिविश्वास टाकणे ही आपल्या फसवणुकीसाठी समोरच्या व्यक्तीला निर्माण करुन दिलेली संधी होवू शकते. सकारात्मक विचारांची साथ शेवटच्या क्षणापर्यंत सत्कार्याचा मार्ग दाखवीते. त्यामुळे 'जाऊ सुखे नरकात' असे म्हणण्याची वेळ येत नाही. नव्या पिढीला सतत सल्ला देवून 'फुकट सल्ला केंद्र' होऊन टवाळीचा विषय होण्यात काय हशील आहे? हा विचार करण्याची क्षमता शेवटच्या क्षणापर्यंत कायम राहावी. यासाठी मेंदू नावाच्या अवयवयाची तेवढी मशागत असावी. त्याबरोबर तो आपल्या डोक्यात त्याच्या ठिकाणी राहून त्याला कार्यरत ठेवण्याचे स्मरण ठेवल्यास मरण पुढे ढकलून जगणे सुसह्य होईल.

आपल्याला रिकामा वेळ आहे म्हणजे तो इतरांनाही आहे, असा आपल्या सोयीचा समज करुन आपले रिकामटेकडे उद्योग वाढविण्याची रिकामचोट बुद्धी आपणास न मिळो अशी प्रार्थना त्या विधात्याकडे करण्यासाठी दररोज थोडे तरी एकाग्र झाले पाहिजे. काहीही आवश्यक्ता नसतांना आणि आयुष्य किती शिल्लक राहिले? हे जरी माहित नसले तरी लागले नेत्र पैलतीरी एवढे कळूनही पैशाचा पाठलाग जमिनीला पाठ लागेपर्यंत करत राहणे, या हावरटपणाला वेळीच पूर्णविराम देता आला तरच जेष्ठत्वासोबत श्रेष्ठत्व प्राप्त झाले असे म्हणावे लागेल. दुपारी मनसोक्त झोप घेवून रात्रीचे जागरण करत इतरांच्या झोपेत अडथळे आणून मी रात्री घरातच गस्त घालून घराची किती काळजी घेतो, असे आपल्या वर्तनाचे उदात्तीकरण करणे याला ग्रेट कसे म्हणावे? आपले छंद अवश्य जपा. त्यासाठी एकांतप्रिय व्हा. पण, त्यासाठी इतरांच्या स्वातंत्र्यावर गदा आणण्याची गरज नाही. (पान ६ वर)

# रवींद्रनाथ टागोर : वारसा आणि कार्य

(भाग १२)


थोडं मनातलं
विश्वास देशपांडे
भ्र. ९४०३७४९९३२

रवींद्रनाथांच्या रूपाने बहुमुखी प्रतिभा लाभलेला स्वर्गलोकातील एक गंधर्वच जणू भूतलावर आला होता. कविता तर ते वयाच्या आठव्या नवव्या वर्षांपासून करतच होते. त्यामुळे रवींद्रनाथ हे प्रामुख्याने कवींद्रनाथ जरी असले तरी कथा, कादंबरी, नाटक, नृत्य आणि संगीत यासारख्या विविध कला आणि साहित्याच्या प्रांतात त्यांनी मनमुराद मुशाफिरी केली आणि कलेच्या प्रत्येक प्रांतात आपल्या शैलीचा अजोड ठसा उमटवला. त्यांच्या कविता, कथा, चित्रं, रवींद्र संगीत हे अनेक पिढयांना प्रेरणा देणारं ठरलं. त्यारूपाने एक समृद्ध वारसा त्यांनी मागे ठेवला.

मला वाटतं या सगळ्या गोष्टींमध्ये त्यांची जी गती होती, त्याला कारणीभूत त्यांना लहानपणी मिळालेले संस्कार आणि वातावरण होते. आपल्या आयुष्यावर आपले आईवडील, गुरु, मित्र आणि सभोवतालचे वातावरण या सगळ्या गोष्टींचा प्रभाव पडतो आणि त्यातून आपले व्यक्तिमत्व आकार घेत असते. रवींद्रनाथांना त्यांच्या घरातलं वातावरण या सगळ्यांसाठी अतिशय अनुकूल होतं. त्यांच्या जोराशांको वाड्यात 'सत्य सुंदर मंगलाची' नित्य आराधना सुरु असायची. त्यांचे मोठे बंधू ज्योतीदा काव्यलेखन करीत आणि घरातील सर्वांसमोर त्याचं सुरेख चालीत वाचन होत असे. घरातील सगळेच त्याचा आनंद घेत. या आनंदलहरींचा परिणाम रवींद्रनाथांवर न होता तरच नवल!

त्यांच्या घरात नेहमीच त्या काळातील कला, साहित्य क्षेत्रातील मान्यवरांचे जाणेयेणे सुरु असायचे. छोट्या मोठ्या मैफली सुरु असायच्या. एखाद्या टिपकागदासारखे संवेदनशील मन असलेला छोटा रवी या सगळ्या गोष्टी आपल्या मनात नीट साठवून घेई. लहानपणी रुजलेली ही बीजे त्याच्यात पुढे अंकुरित होऊन एक मोठे प्रतिभासंपन्न व्यक्तिमत्व जन्माला आले. त्या काळात कारणाशिवायच अकृत्रिम प्रेमाने लोकांचे त्यांच्या घरी जाणेयेणे असायचे. उदार वृत्तीने, आपुलकीच्या भावनेतून माणसे सहज एकमेकांकडे जात असत. मनमुराद गप्पागोष्टी, अधूनमधून उडणारी हास्याची कारंजी यामुळे घरात एक प्रकारचा जिवंतपणा आणि चैतन्य कायम असायचे. पण पुढे पुढे हे सुंदर वातावरण हरवल्याची खंत देखील रवींद्रनाथांनी व्यक्त केली आहे.

आज तर आपल्याला या सगळ्या गोष्टींचा अभाव प्रकर्षाने जाणवतो. आजकाल कोणी कोणाकडे कामाशिवाय जात येत नाही. काम असलं तरच लोक फोनवरून संपर्क साधतात. घरातल्या माणसांचा एकमेकांशी असलेला संपर्क तुटत चालला आहे. या प्रवृत्तीबाबत बोलताना रवींद्रनाथ म्हणतात, ' ही एक प्रकारची सामाजिक कृपणता



आहे. आणि या कृपणतेसारखी कुरूप सामाजिक गोष्ट दुसरी कोणतीही नाही.'

रवींद्रनाथांच्या घरात होणाऱ्या या अनौपचारिक सभा संमेलनामुळे त्यांना आयतीच मोठी संधी प्राप्त झाली आणि त्याचा आनंद आणि लाभ त्यांनी मनापासून घेतला. रवींद्रांचे मोठे बंधू ज्योतिरिंद्रनाथ आणि त्यांची पत्नी कादंबरीदेवी हे अत्यंत प्रेमळ आणि सहृदय असे जोडपे होते. पारंपरिक आणि औपचारिक शालेय शिक्षणात न रमणार्या रवींद्रनाथांना त्यांनी पूर्णपणे खुलं आकाश दिलं. त्यांच्या पाठिंब्यामुळे रवींद्रनाथांना स्वतःतील कलागुणांचा शोध घेता आला. ज्योतिरिंद्रनाथ कवी होते तसे उत्तम संगीतकारही होते. ते उत्तम पियानो वाजवत. त्यांच्या पियानोवर वाजवण्यासाठी त्यांचे मित्र अक्षयबाबू आणि रवींद्रनाथ काव्यरचना करीत असत. तेव्हापासून गीत आणि संगीत रवींद्रांच्या रक्तात भिनू लागले होते.

रवींद्रनाथांची वहिनी कादंबरीदेवी म्हणजे एक अत्यंत सुसंस्कृत आणि कला आणि साहित्याची उत्तम जाण असलेलं व्यक्तिमत्व होतं. या वहिनीच्या पोटात अपार माया होती. तिनं रवींद्रांना आईचं प्रेम तर दिलंच पण त्यांच्यातील कलागुण ओळखून त्यांना वेळोवेळी प्रोत्साहन दिलं. त्यांच्यामुळेच श्रेष्ठ बंगाली कवी बिहारीलाल चक्रवर्ती यांच्यापर्यंत रवींद्रांना पोहोचता आलं. बिहारीलाल चक्रवर्ती हे कवी आणि संगीतकार होते. रवींद्रनाथांना त्यांच्या रचना खूप आवडत. त्यांचा प्रभाव रवींद्रनाथांवर त्या बालवयात पडला. आपणही त्यांच्यासारखं कवी, संगीतकार व्हावं असं रवींद्रनाथांना वाटू लागलं. रवींद्रनाथांनी या बिहारीलाल चक्रवर्ती यांचं 'मॉर्निंग बर्ड' असं सुरेख नामकरण केलं.

रवींद्रनाथ यांचं घर चित्तपूर रोडवर होतं. त्याच्या आजूबाजूला असणारं वातावरण, त्यांचे मित्र या सगळ्यांचं प्रतिबिंब त्यांच्या लहानपणीच्या कवितांमध्ये उमटलं आहे. पिंजर्यात बंदिस्त असलेला पोपट आपण सगळेच पाहतो पण लहानग्या रवीला पिंजऱ्यातील बंदिवान पोपट म्हणजे पारतंत्र्याचं प्रतीक वाटला.त्यांच्या बालसाहित्यात मनाची निरागसता आहे, बालपणीचं कुतूहल आहे.

सामाजिक स्थित्यंतरे आणि त्यांचा बालमनावर होणारा परिणाम मनमोकळेपणाने त्यात व्यक्त झाला आहे. रवींद्रनाथांनी आपल्या बर्याच कवितांमधून मातृप्रेमाचं लोभसवाणं दर्शन घडवलं आहे. त्यांच्या एका कवितेत आई आपल्या बाळाला शांत झोप लागावी म्हणून निद्रेला आवाहन करते आहे. ही निद्रा दूरवर असलेल्या परी राज्यातून यावी असे तिला वाटते. ती म्हणते

**सानुल्या बाळाच्या डोळ्यावर झोप**
**उतरे कोठून सांगा कैसी?**
**म्हणतात कोणी तिचे घर आहे दूर गावी लपलेले!**
**घर आल्हाददायक वसे कळ्या अंकुरात**
**छायेमध्ये जंगलाच्या काजव्यांनी लकाकते!**
**झोप येते बाळापाशी तेथूनचि थेट**
**घेते पापण्यांचा गोड पापा!**

किती सुंदर गोडवा आहे या कवितेत! ही कविता म्हणजे एक सुंदर अंगाईगीतच जणू!

त्यांची पहिली कविता 'बिष्टी पॅरी टापूर टिपूर' (पावसाचे थेंब). ही म्हणावी लागेल. देशभक्तीची उत्कट भावना देखील त्यांच्या अनेक कवितांमधून आपल्याला आढळते. आपल्या 'देशाची माती' या कवितेत ते म्हणतात-

**देशमृत्तिके, माझे माथे तुझिया ठायी टेकवितो,**
**विश्वव्यापिनी, विश्वमाऊली तूच तिचा अंचल तो,**
**मनात माझ्या देही, प्राणी असशी तू गे निवासिनी,**
**श्यामल, कोमल तुझीच मूर्ती अंतरी सुवासिनी.**

'शिशु' हा त्यांच्या बालकवितांचा पहिला काव्यसंग्रह. पुढे वयाच्या १५ व्या वर्षी त्यांनी 'बनफूल' या नावाची एक दीर्घ काव्यकथा लिहिली.

ब्रजभाषेत भानुसिंह म्हणून प्रसिद्ध कवी होते. रवींद्रनाथांनी आपल्या काही कविता 'भानुसिंहेर पदावली' हे टोपण नाव घेऊन लिहिल्या. सुरुवातीला काव्यरसिकांना वाटले की या कविता भानुसिंहांच्याच आहेत. पण जेव्हा लहानग्या रवीचे नाव समोर आले तेव्हा केवळ चौदा पंधरा वर्षांचा मुलगा अशा कविता लिहू शकतो यावर अनेकांचा विश्वास बसला नाही.(क्रमशः)

# ग्रहसंकेत

(रविवार, १ सप्टेंबर ते शनिवार ७ सप्टेंबर २०२४)

नारायण जगन्नाथ कारंजकर, ज्योतिष भास्कर
ज्येष्ठ पत्रकार, फिल्टर पंपाजवळ, माढा रोड, मु.पो.कुर्डूवाडी, जि.सोलापूर (भ्र. ९४२३७५८४०१)

✻ **रविवार, १ सप्टेंबर-** शिवरात्री, आदित्य पूजन, पर्युषण पर्वारंभ, आहिल्यादेवी होळकर पुण्यतिथी (तिथीप्रमाणे), रामकृष्ण क्षीरसागर महाराज पुण्यतिथी सोलापूर, काळभैरव यात्रा नांदणी ता. शिरोळ ✻ **सोमवार, २ सप्टेंबर-** दर्श पिठोरी अमावस्या (पोळा), सोमवती अमावास्या, मातृदिन, वृषभ पूजन, दर्भाहरण, शिवपूजन, शिवामूठ सातू ✻ **मंगळवार, ३ सप्टेंबर-** इष्टि, मंगळगौरी पूजन, प्रतिपदा श्राध्द, तुकाई यात्रा इटकरे, श्री भवानीदेवी यात्रा बलवडी (खा.) ता. खानापूर, सकाळी ७: ५६ पर्यंत अमावास्या ✻ **बुधवार, ४ सप्टेंबर-** चंद्रदर्शन (१९:४३ पर्यंत), मौनव्रतारंभ, द्वितीया श्राध्द, महादेवगिरी महाराज पुण्यतिथी कुंडल ता. पलूस, बालमुकुंद बालावधूत जयंती कोल्हापूर, ✻ **गुरूवार, ५ सप्टेंबर-** साम श्रावणी, तृतीया श्राध्द, शिक्षक दिन, डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन जयंती, चक्रधरस्वामी जयंती, शरण शिवलिंगेश्वर अड्डपल्लकी माधन हिप्परगा ✻ **शुक्रवार, ६ सप्टेंबर-** हरितालिका तृतीया, स्वर्णगौरी व्रत, मन्वादि, वराह जयंती ✻ **शनिवार, ७ सप्टेंबर-** श्री गणेश चतुर्थी, पार्थिव गणेश पुजन, चंद्रदर्शन निषेध (चंद्रास्त्र २१: १८), जैन संवत्सरी (चतुर्थी पक्ष), घरात श्री गणेश मूर्ती स्थापना दुपारी १: ३० पर्यंत करावी, श्रीपाद श्रीवल्लभ जयंती पीठापूर, नरवीर उमाजी नाईक जयंती

**मुहूर्तः-** ✻ **साखरपुडा-** ४, ५ सप्टेंबर ✻ **डोहाळ जेवन-** ५ सप्टेंबर ✻ **बारसे-** ४, ५ सप्टेंबर ✻ **जावळ-** ५ सप्टेंबर ✻ **गृहप्रवेश-** ४, ५, ६ सप्टेंबर.

### मेषः मनासारखे घडत जाईल

जिथे राहता त्या- त्या कॉलनीत चार तरी कुटूंबे जोडा, अहंकार असेल तर खरंच लवकर सोडा. पराक्रमात राशी स्वामी मंगळ असल्याने कार्यक्षेत्रात उत्साह, धडाडी वाढेल. नव्या कामांना गती मिळेल. पैश्या अभावी रेंगाळलेली कामे मार्गी लागतील. श्री गणेश आगमनापासून सर्वकाही मनासारखे घडत जाईल. चिंता नको. नव्या ओळखी लाभदायक ठरतील. सरकारी कामे करून घ्या. सुसंधी लाभतील. शुभ ता. ५, ७

### वृषभः कलेचा गौरव

जाणं- येणं वाढलं की आपोआप प्रेम जिव्हाळा वाढेल, गप्पागोष्टीत दुःखाचा विसर पडेल. राशीतील गुरूमुळे भाग्य वृध्दिंगत करणाऱ्या घटना घडतील. घरात शुभ कार्ये जमतील. कौटुंबिक आनंददायी घटना घडतील. गुरूकृपेने संततीबाबत अपेक्षा पूर्ती होईल. नवे विचार मार्गी लागतील. नव्या विचारांना चालना मिळेल. अपेक्षित संधी लाभतील. कलेचा गौरव होईल. शुभ ता. ५, ७

### मिथुनः नव्या विचारांना गती

सुख असो, दुःख असो. एकमेकांकडे गेले पाहिजे, सगळ्यांच चांगलच होऊ दे, असं देवाला म्हटलं पाहिजे. षष्ठेश, लाभेश मंगळ राशीतच आल्याने रेंगाळलेली कामे मार्गी लावता येतील. नव्या विचारांना गती मिळेल. कार्यक्षेत्रात विचाराने रहावे. अपेक्षित संधी लाभतील. सरकारी कामे होतील. हुशारीने विविध समस्यांवर मात कराल. शुभ ता. ४, ६, ७

### कर्कः आव्हानांना सामोरे जावे

काही काही सणांना आवर्जुन एकत्र यावं, एकमेकांचे सुख-दुख विचारावं. आठवा शनि, बारावा मंगळ त्यामुळे काही आव्हानांना सामोरे जावे लागेल. सरकारी कामे होतील. कलेचा विकास होईल. जुने येण्या- देण्याचे व्यवहार जागरूकतेने करावेत. प्रतिकुलतेवर मात करावी लागेल. नवीन गुंतवणूक विचाराने करावी. शुभ ता. ६, ७

### सिंहः अपेक्षित कामे होतील

सुख वास्तूत कधीच नसतं, माणसांची ये-जा पाहिजे, उंबरठ्यालाही पायांचा स्पर्श झाला पाहिजे. राशीतील रविच्या जोडीला बुधही येत आहे. त्यामुळे अंगिकृत कार्यात समाधानकारक घटना घडतील. अपेक्षित कामे मनासारखी होतील. कलेतून अर्थाजन घडेल. नव्या विचारांना गती मिळेल. आत्मविश्वास वाढत जाईल. बॅंक, विमा, ज्ञानदान अशा क्षेत्रात अनुकूलता वाढेल. सुसंधी लाभतील. शुभ ता. ४, ७

### कन्याः मतभेद टाळावेत

दोन दिवसासाठी का होईना जरूर एकत्र यावं. जुने दिवस आठवतांना पुन्हा लहान व्हावं. कर्मस्थ मंगळामुळे कार्यक्षेत्रात मनासारखी प्रगती साधता येईल. नव्या योजना स्विकारून मार्गी लावू शकाल. नव्या ओळखी लाभप्रद ठरतील. धार्मिक, सामाजिक कार्यात पुढाकार घ्याल. अनुकूलता वाढत जाईल. सुसंधीचा लाभ उठवावा. शुभ ता. ६, ७

### तुलाः चिंता कमी होईल

वर्षातून एखादी दुसरी आवर्जुन ट्रिप काढावी. त्यांचं आमचं पटत नाही, ही ओळ खोडावी. मंगळ भाग्यस्थानी आल्याने समस्या कमी होतील. नव्या क्षेत्रात पदार्पण करू शकाल. सरकारी कामे करून घ्यावीत. कमिशनवर चालणार्या व्यवसायात प्रगती होईल. अपेक्षित संधी लाभतील. दैनंदिन कार्यात अधिक लक्ष घालावे. चिंता कमी होईल. प्रगतीच्या घटना घडतील. शुभ ता. ५, ७

### वृश्चिकः दगदग करू नका

आयुष्य खूप छोटं असत. काही धरा काही सोडा सगळे वाद मिटवून घ्या. चौथा शनि, आठवा मंगळ त्यामुळे विविध समस्यांना सामोरे जावे लागेल. विनाकारण दगदग करू नका. नव्या कामांना विलंबाने अनुकूलता वाढेल. अनावश्यक खर्च टाळावा. अपेक्षित फलप्राप्तीसाठी अधिक परिश्रमाची गरज आहे. पोटाच्या तक्रारी संभवतात. काळजी घ्यावी. शुभ ता. ७

### धनु- स्थावर प्रश्न वाढवू नका

साबण, सुगंधी तेलात कधीच आनंद नसतो. चार पाहुणे आल्यावरच आकाश कंदील हासतो. राशी समोरच मंगळ असल्याने स्वमताग्रह टाळावा. भाग्यात रवि-बुध राहणार असल्याने अनुकूलता वाढेल. नव्या विचारांना चालना मिळेल. स्थावर प्रश्न वाढवू नका. प्रगतीच्या घटना घडतील. अडचणीतून मार्ग निघत जाईल. कौटुंबिक जीवनात वाद टाळावेत. शुभ ता. ५, ७

### मकरः शुभ घटना

महिन्यातून एखाद्या दिवशी अंगत पंगत केली पाहिजे, पक्वान्नाची गरजच नाही, पिठलं- भाकरीही खाल्ली पाहिजे. षष्ठात मंगळ आल्याने प्रतिस्पर्ध्यांवर मात कराल. संततीबाबत शुभ घटना घडतील. चिकाटीने रहावे. प्रगती होत जाईल. सरकारी कामासाठी अधिक पाठपूरावा करावा लागेल. नव्या विचारांना चालना मिळेल. अनुकूलता वाढेल. शुभ ता. ७

### कुंभः समस्या कमीहोतील

एखाद्या दिवशी सर्वांनी सिनेमा पाहावा. मिळून सर्वांशी नेहमी हसून खेळून रहात जावं. चौथा मंगळ, पाचवा झाल्याने अनुकूलता वाढेल. नव्या संधी लाभतील. राशी समोर रवि-बुध असल्याने चिंता कमी होईल. नव्या कामांना गती मिळेल. घाईने कोणतेही निर्णय घेऊ नका. प्रगतीच्या घटना घडतील. समस्या कमी होतील. शुभ ता. ४, ६, ७

### मीनः मानसिक अस्वास्थ

परिस्थितीचे चटके सहन केल्यावरच माणसाची किंमत वाढते. व्ययात शनि तर चौथा झालेला मंगळ यामुळे प्रकृतीच्या तक्रारींकडे दुर्लक्ष करू नका. राशीत नेपच्यून राहू समवेत असल्याने मानसिक अस्वास्थ राहील. फार चिंता करू नका. अपेक्षित घटना घडत जातील. विचाराने रहावे. नव्या संधी विचारपूर्वक स्विकाराव्यात. शुभ ता. ५, ७

!! शुभं भवतु!!

# झाडाझडती

सत्ताकारण
सोमनाथ देशमाने
भ्र. ९४२१६३६२९१



आम्ही आमच्या मायबाप वाचकांच्या मनाचा हळुवार कानोसा घ्यायचा अल्पसा प्रयत्न करत आहोत. मतदारराजा आधी बिघडला की राजकारणी आधी बिघडला की एकमेकां सहाय्य करु, अवघे धरु कुपंथ करत करत दोघांनी एकमेकांना बिघडविले? या प्रश्नाचे उत्तर शोधण्याचा निष्फळ प्रयत्न आम्ही करणार नाही.

भारतातल्या सर्वात मोठ्या भारतीय जनता पक्षाने निवडणुकीपूर्वी इतर पक्षांशी आघाडी अजिबात करु नये, निवडणूक निकालानंतर सरकार स्थापन करण्यासाठी जिथे गरज असेल तिथे समविचारी पक्षांशी आघाडी करण्यास हरकत नाही.

महाराष्ट्रात उध्दव ठाकरे आणि शरद पवार यांना देवेंद्र फडणवीसांनी त्यांच्याच भाषेत दिलेलं तोडीसतोड प्रत्यूत्तर अनेकांना भावलं असलं तरी भारतीय जनता पक्षाने पडतं घेऊन महायुतीतल्या घटक पक्षांना, विशेषतः आक्षेपित मंडळींना दिलेलं झुकतं माप आणि स्थानमानपान अनेकांना आवडलेलं नाही.

देवेंद्र फडणवीस यांच्या निष्कलंक, कर्तव्यनिष्ठ निस्पृहतेचा सगळीकडे आदरयुक्त भावनेतून उल्लेख केला जात असला तरी त्यांच्या नको तिथं उफाळून येणाऱ्या सद्गुणविकृतीवर मात्र कडक आक्षेप घेतले जातात. ज्याप्रमाणे भाजपेतर लोकप्रतिनिधी आपल्या मतदारांशी, कार्यकर्त्यांशी, मतदार संघाशी सतत संपर्क ठेवतात; दूरदृष्टीने आपापल्या मतदार संघांची मजबूत बांधणी करतात. त्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्षाचे बहुतेक लोकप्रतिनिधी कुठेच दिसत नाहीत. आम्हाला कसली चिंता नाही, मोदी है तो सबकुछ मुमकीन है, ही भारतीय जनता पक्ष आणि लोकशाही आघाडीच्या लोकप्रतिनिधींची भूमिका सर्वांसाठीच आत्मघातकी ठरत आहे. कित्येक मतदार संघ, स्थानिक स्वराज्य संस्था राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या ताब्यात आहेत, पण तिथे भारतीय जनता पक्ष सहसा कुठेही दिसत नाही. सत्ता आमची आहे, पण तिथली यंत्रणा आमची नाही. भारतीय जनता पक्षासाठी जिवावर उदार होऊन पक्षासाठी काम करणारा कार्यकर्ता अडचणीत सापडला तर त्याच्या मदतीसाठी ना भारतीय जनता पक्षाचे नेते, पदाधिकारी, लोकप्रतिनिधी धावून येतात ना संघ परिवार त्याची दखल घेतो. याउलट भाजपेतर पक्षातील छोट्यात छोट्या कार्यकर्त्याच्या मदतीला त्या पक्षातील मोठ्यात मोठा नेता-लोकप्रतिनिधी धावून येतो; काय चूक, काय बरोबर याची कुठलीही फिकीर न करता येतो. जनतेसाठी आपला भ्रमणध्वनी चोवीस तास खुला ठेवणारा एक लोकप्रतिनिधी त्या भांडवलावर पुन्हा निवडून आला आहे.

लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्र भारतीय जनता पक्ष, संघ परिवारातील इतर घटक आणि महायुतीतील घटकपक्ष यांच्यात कुठेही समन्वय दिसला नाही. भारतीय जनता पक्षातील काही अतिमहत्वाकांक्षी नेते, लोकप्रतिनिधी यांच्यातील गटबाजीचा, पाडापाडीचा सर्वाधिक फटका उत्तर प्रदेश आणि महाराष्ट्र प्रांतांना बसला आहे.

तिकीट वाटप करताना सर्वोत्तम उमेदवार निवडीसाठी आधी मतदारांचा कानोसा; मग स्थानिक, प्रादेशिक नेतृत्वाशी सल्लामसत करत करत प्रत्येक पायरीवर जबाबदारी निश्चित करुन मग वरिष्ठ पातळीवर अंतिम निर्णय घ्यायला हवा! तिकीट वाटप प्रकियेत उद्धवणारे मतभेद चव्हाट्यावर येऊ नयेत यासाठी खबरदारी घेतली पाहिजे.

मोदी चारसो पार मताधिक्याने तिसऱ्यांदा सत्तेवर आले तर ते बाबासाहेबांची घटना बदलतील. या कॉंग्रेसी आरोपावर घटनेची सर्वाधिक मोडतोड करणाऱ्या कॉंग्रेला सडेतोड उत्तर देण्यात भारतीय जनता पक्ष कमी पडला.

प्रदीर्घ काळ सत्तेत असतानाही शरद पवार जे आरक्षण मराठ्यांना देऊ शकले नाहीत, ते आरक्षण देवेंद्र फडणविस यांनी दिलं. मुंबई उच्च न्यायालयात टिकवलं; आरक्षणाबाहेर असलेल्या आर्थिकदृष्ट्या कमकूवत घटकांना मोदी सरकारने आरक्षण दिलं. अशी ही मंडळी प्रचलित आरक्षण कसे घालवतील? असा प्रतिप्रश्न विचारुन आरक्षणधारकांना आश्वस्त करण्यात भारतीय जनता पक्ष कमी पडला. दोन दशकांहून अधिक काळ सर्वोच्च सत्तास्थानी असलेल्या नरेंद्र मोदी यांनी आपल्या पदाचा दुरुपयोग आपल्या घरातल्या आप्तस्वकीयांसाठी सुध्दा कधी केला नाही, ते नरेंद्र मोदी अडाणी- अंबानी यांच्यावर मेहेरबान होणे शक्यच नाही, हे जनतेला पटवून देण्यात भारतीय जनता पक्ष कमी पडला.

२००४ ची पुनरावृती होऊ शकते ही शक्यता भारतीय जनता पक्षाने विचारातच घेतली नाही.

लोकसभा निवडणूक जाहीर व्हायच्या कितीतरी आधीपासून जॉर्ज सोरोस गर्जत होता; जामिनावर असलेले राहुल गांधी विदेशात जावून प्रक्षोभक देशद्रोही वक्तव्ये करत होते, त्यांची पुढील वाटचाल कशी असेल याचे संकेत देत होते. तरीही भारतीय जनता पक्षाने त्याकडे फारशा गांभीर्याने बघितलेच नाही. सत्य पायात चपला सरकवीपर्यंत असत्य गावभर फिरुन आलं! असत्य उघड होईपर्यंत व्हायचा तो परिणाम होऊन गेला. समाजाची दिशाभूल करणाऱ्या दृकश्राव्य, मुद्रित आणि इलेक्ट्रॉनिक प्रसारमाध्यमांना वठणीवर आणण्यासाठी कठोर कायदेशीर तरतूद करायलाच हवी.

भारतीय जनता पक्ष, राष्ट्रीय मुस्लिम मंच आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघ यांच्या काही वरिष्ठ नेते आणि पदाधिकारी यांनी जाहीर वक्तव्य करुन जो संभ्रम निर्माण केला गेला. त्यामुळे विरोधकांच्या हाती आयतं कोलित दिलं गेलं. हे सगळं टाळता आलं असतं तर बरं झालं असतं. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि भारतीय जनता पक्ष हे एकाच परिवारातले असले तरी वेगवेगळ्या क्षेत्रात कार्यरत असल्यामुळे कार्यपध्दतीबाबत मतभेद असू शकतात, त्याची जाहीर वाच्यता होऊ नये.

रामभक्त कारसेवकांवर गोळीबाराचे आदेश देऊन त्याबद्दल कुठलीही खंत न बाळगता वेळ पडली तर पुन्हा तसे आदेश देईन असं बिनदिक्कतपणे सांगणाऱ्या मुलायम सिंग यादव यांना भारतरत्न पुरस्कार दिला गेला हे कुण्याही सनातनींना आवडलेले नाही. संघ विचारधारेशी विपरित-विसंगत विचारधारा असलेल्या चौधरी चरणसिंग आणि कर्पुरी ठाकुर यांना भारतरत्न पुरस्कार दिल्यामुळे अनेक सनातनी नाराज झाले आहेत.

'सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास, सबका प्रयास!' सर्वाधिक राग व्यक्त होत आहे तो या धोरणावर. 'सबका विकास' सगळीकडे दिसतोय, पण 'सबका साथ', 'सबका विश्वास' आणि 'सबका प्रयास' मात्र गायब? मग 'सबका विकास' कशासाठी? असंतुलित लोकसंख्या वृध्दी भारताला गिळंकृत करुन टाकील? लोकसंख्या नियंत्रण कायदा आणि समान नागरी कायदा एव्हाना यायला पाहिजे होते. प्रदीर्घ काळ जामिनावर असलेल्या आरोपींवर दाखल झालेल्या भ्रष्टाचारांच्या खटल्यांचा जलद निपटारा व्हायला हवा होता. न्यायालयांवरील ढासळत चाललेला विश्वास दृढ करण्यासाठी, न्यायप्रक्रिया पारदर्शक करण्यासाठी अमूलाग्र न्यायिक सुधारणा कराव्याच लागतीत.

घुसखोर पाकिस्तानी, बॉंग्लादेशी, रोहिंग्या मुसलमानांचा डोईजड होत चाललेला बोजा भारत आणखी किती दिवस सहन करु शकेल? ही उपरी टोळकी भूमीपुत्रांच्या तोंडचा नुसता घासच हिरावून घेत आहेत असं नाही, तर मतदार यादीत घुसून भारतीय निवडणुका प्रभावित करत आहेत. त्यांच्याकडं असलेल्या शिधापत्रिका; आधार, मतदान ओळखपत्रं, पारपत्रं त्वरित रद्द करुन त्यांची तातडीने हकालपट्टी केली पाहिजे. स्वेच्छेने अथवा आणीबाणीच्या प्रसंगी आपली धर्मभूमी, मायभूमी भारताच्या कुशीत येऊ इच्छिणार्या जगभरातल्या सनातनींचं स्वागत झालं पाहिजे, त्यांना भारतीय नागरिकत्व आणि मताधिकार तातडीने मिळाले पाहिजेत.

संघ परिवार, भारतीय जनता पक्ष आणि तमाम भारतहितैषी सनातनी यांना हात जोडून एकच नम्र विनंती आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ परिवाराची राष्ट्रनिष्ठा, राष्ट्रसमर्पण, कुठलाही भेदभाव न करता प्रामाणिक सेवाकार्य यांविषयी भारतीय जनमानसात आणि जगभरात प्रचंड आदर आहे. आदरयुक्त आदर आणि आदरयुक्त वचक यात खूप फरक असतो. संघ परिवाराने आपल्या निरंतर सेवाकार्यांमधून आदरयुक्त वचक निर्माण करण्याचा कधीही प्रयत्न केला नाही. संघ स्वयंसेवकाच्या हातात असलेली काठी जिला दंड म्हणतात ती आपल्या माथी कधीच पडणार नाही याची नाठाळातल्या नाठाळालासुध्दा खात्री असते, मग संघाचा आदरयुक्त वचक कसा निर्माण होणार? भीती वाटणे तर दूरची गोष्ट झाली. २०४७ सालापर्यंत आपला भारत जागतिक महासत्ता, जागतिक अर्थसत्ता होईलही, पण त्याची मधूर फळं सनातन भारताला चाखायला मिळतील का? घर बांधा तुम्ही, कब्जा करतो आम्ही; बोंबलत बसा तुम्ही. २०२४ पर्यंत भलतच काही विपरित घडलं तर? **(उत्तरार्ध)**

पान २ वरून

## संत साहित्यातील प्रार्थनेचे स्वरूप

**आजि डोळिया लाधला । आनंद देखिला धरणीवरी ।। धन्य तुका म्हणे आम्हासी फावले । पावलो पाउलें विठोबाची ।।** (तुकाराम गाथा अ. ३८५३) आशीर्वादात्मक प्रार्थना आपल्या मनातील इच्छा-आकांक्षांसोबतच समाजाची, देशाची मागणी पूर्ण होण्यासाठी ईश्वराच्या जवळ केलेल्या प्रार्थनेस 'आशीर्वादात्मक प्रार्थना' असे म्हणतात.

संत ज्ञानेश्वरांनी ईश्वराजवळ पसायदानाचे जे मागणे मागितले, ते आशीर्वादात्मक प्रार्थनेतच मोडते. विश्वव्यापक परमेश्वराजवळ ज्ञानेश्वरांनी केलेली प्रार्थना ही विश्वप्रार्थना आहे. सर्व जगामध्ये शांतता, सुख नांदावे. सर्वांचे कल्याण व्हावे. यासाठी संत ज्ञानेश्वर विश्वकल्याणमय पसायदान मागतात.

**आता विश्वात्मके देवे । येणे वाग्यज्ञे तोषावे तोषोनि मज द्यावे । पसायदान हे ।।१।। जे खळांची व्यंकटी सांडो । तया सत्कर्मी रती वाढो । भुता परस्परे पडो । मैत्र जीवांचे ।।२।।** (ज्ञानेश्वरी १८-१७९३-१८०१)

संत तुकारामाची अभंगगाथा म्हणजे पाचवा वेद. जिला सर्व संत वाङमयामध्ये 'पंचमवेद' संबोधले जाते. त्यामध्ये संत तुकारामांच्या जीवनाचे सत्यस्वरूप आहे. देव जोडण्याचा, देवरूप होण्याचा साधा-सोपा स्वानुभवी उज्ज्वल मार्ग त्यांनी दाखविला आहे. तो खालील प्रार्थनेतून दिसतो-

**हेचि दान देगा देवा । तुझा विसर न व्हावा ।।१।। गुण गाईन आवडी । हेची माझी सर्व जोडी ।।२।।**



**न लगे मुक्ती धनसंपदा । संतसंग देई सदा ।।३।। तुका म्हणे गर्भवासी । सुखे घालावे आम्हासी ।।४।।** (तुकाराम गाथा अ. २२९६) ईश्वराचा कधीही विसर पडू न देणे. राचे गुणगाण करणे हेच आमचे परमभाग्य. तेच आमच्या आयुष्याचे संचित. आम्हाला ऐश्वर्य, धनसंपदा नको. केवळ संतांचा सहवास नेहमी घडू दे. एवढीच रास्त मागणी प्रस्तुत प्रार्थनेतून केली आहे. सर्व संतांनी केलेली प्रार्थना ही स्वतःसाठी नसून सर्वांसाठी आहे. असे व्यापकत्व संतांच्या प्राथनेतून व्यक्त होते.

पान ४ वरून

## वनमाला ठमाताई

सामाजिक काम करणाऱ्यांना त्यात ही स्त्रियांना अनेक वेळेला घरच्या आघाडीवर नाना प्रकारच्या अडचणींना तोंड द्यावे लागते किंवा त्याचा योग्य तो समन्वय करता येत नाही. त्यामुळे अनेक वेळेला सामाजिक क्षेत्रात कर्तृत्व गाजवणारी व्यक्ती ही घर-परिवाराच्या व समाजाच्या दृष्टीने उपेक्षेचा विषय झालेली असते. परंतु याबाबतही ठमाताईंनी घर व सामाजिक काम यांचा योग्य तो समन्वय व संतुलन कायम ठेवले.

ठमाताई वनवासी कल्याण आश्रमाच्या पूर्णवेळ कार्यकर्त्या आहेत. इतकी वर्षे पूर्ण वेळ काम करणे म्हणजे काही सोपे नाही. बैठक व कार्यक्रमाला जिथे अपेक्षित तेथे उपस्थित राहणे हा सर्वोपरी नियम. एकदा संघ प्रचारक व विविध क्षेत्रातील पूर्णवेळ कार्यकर्त्यांची बैठक रायगड येथे होती. स्थान तसं आतमध्ये आणि मुख्य रस्त्यापासून थोडे वर होते. ठमाताईंच्या अंगात ताप होता. अपेक्षित आहोत म्हणून गेलं पाहिजे या निर्धाराने त्यांच्या घरापासून प्रथम रिक्षाने कर्जत, कर्जतहून ट्रेनने पनवेल व तिथून पुढे बसने प्रवास सुरू झाला.

स्थानापर्यंत पोहचेपर्यंत ठमाताईना फारच त्रास झाला. सर्वांनी आग्रह करून सुद्धा विश्रांती न घेता ठमाताई वर्गाच्या प्रथम व द्वितीय सत्राला उपस्थित राहिल्या नंतर सर्वांच्यावतीने प्रमुख अधिकाऱ्यांनी त्यांना परत घरी जाण्यास सांगीतले. ती ही आज्ञा शिरसावंद्य मानून परतीचा प्रवास सुरू केला. बैठकीला किंवा कार्यक्रमाला जाण्यापूर्वी आठ दिवस अगोदर सर्व घराची योजना पूर्ण करणे घरातल्या मुलांसाठी, पतीसाठी व सासूसाठी सर्व प्रकारचे नियोजन करून मग बाहेर पडण. आपल्यापेक्षा वयाने अधिक मोठ्या असणार्या पतीची दारू सोडविण्याचा अभिमान त्यांनी कधीच बाळगला नाही. त्यामुळे आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवताना पती म्हणून असलेला त्यांचा आदर त्यांनी कायम जपला.

बहुतेक सामाजिक कार्यकर्त्यांच्या घरामधली पुढची पिढी ही सामाजिक काम करण्यास तयार होत नाही. परंतु आज जर आपण पाहिलं तर ठमाताईची मुलगी, सून व मुलगा हे आपापल्यापरीने समाजसेवेचे व्रत घेऊन काम करतच आहेत. कर्जतसारख्या अति दुर्गम भागामध्ये राहून देशभरामध्ये वनवासी कल्याण आश्रमाचे व सामाजिक काम करताना आपल्या आरोग्याची म्हणून काळजी जेवढी घेतली पाहिजे होती तेवढी न घेतल्यामुळे आता शरीर अनेक व्याधींनी ग्रस्त झालेले आहे. कर्जतपासून पनवेलपर्यंत डायलिसिससाठी आठवड्यातून दोन-तीन वेळा जावं लागतं. प्रवासाची दगदग आजाराची लक्षणे सोबत असतानाही संघटनेसाठी आज ही प्रवास करण्यास सदैव तत्पर आहेत. घरी येणाऱ्या लोकांची तितक्याच मायेने विचारपूस करून त्याचे प्रसन्न चित्ताने स्वागत करणे हे ठमाताईच करू जाणे.

वयाच्या आठव्या वर्षी लग्न होऊन जाम्बिवली परिसरात आलेली ती. खरंतर कोणत ही स्वप्न घेऊन आली नसेल, किंबहुना जीवन म्हणजे काय याचीही तीला कल्पना नसावी. कल्याण आश्रम, घळसासी अथवा डॉ. कुंटे परिवार भेटला नसता व सासूबाईंचा प्रेमळ वरदहस्त लाभला नसता तर जगरहाटीप्रमाणे ठमा अनंत पवार म्हणून जीवन व्यतीत करत असती. परंतु जातिवंत हिर्याला शोधून काढल जातच त्याला पैलू पाडले जातात मग सदोदित चमकणे हीच त्याची नियती होते. त्याचप्रमाणे निसर्गाच्या मोकळ्या माळरानावर उगवलेल्या ह्या वन कलिकेने आपल्या सोबत अनेकांचे जीवन समृध्द करणारी एक यशस्वी वनमाला गुंफली ज्यात मध्यभागी टवटवीत व टपोरे पुष्प म्हणून सन्मानाने शोभून दिसण्याचा मान हा ६१ व्या वर्षात पदार्पण करणाऱ्या आणि सर्वदूर आमच्या ताई म्हणून परिचित झालेल्या ठमाताईंचा आहे. (उत्तरार्ध)

पान ५ वरून

## जेष्ठांचा आनंद तरुणाईसाठी प्रेरणादायी

जेष्ठ नागरिक संघाचे सभासद अवश्य व्हा. तिथे वादाव-दी करुन मला किती कळते व इतर सर्व कसे बालबुद्धीचे आहेत. हे सिद्ध करण्याचे अचाट प्रयोग टाळा. जेष्ठांनी बनवाबनवी करणे सर्वअमान्य असते हे विसरु नका. आपल्या घरासमोर फुलांचे एकही झाड न लावता, भल्या पहाटे उठून इतरांची फुले चोरण्यात धन्यता मानू नका. देवासाठी चोरलेली फुले निषिद्ध आहेत. मनोभावे पूजा किंवा सदाचाराच्या पालखीला फुलांची आवश्यकता नाही. राजकारणाची निरर्थक चर्चा करुन आपल्या व इतरांच्या डोक्याला शिण आणू नका. मतभिन्नता मान्य करुन व्यक्ती स्वातंत्र्य मान्य करा. 'देखोना मेरी मुर्गी एक टांगपे कबसे खडी' ह्या हेकडपणाचा व्यर्थ अभिमान हे शहाणपणाचे लक्षण नव्हे. आपल्या आजाराचे सतत कौतुक करण्यापेक्षा डॉक्टरजवळच सत्यकथन करा.


जोडीदारासोबत तुटेपर्यंत ताणत बसण्यापेक्षा यशस्वी माघार घेण्यातीलं शहाणपणा लक्षात घ्या. साठा गेला तरी ताठा कायम ठेवण्यात काहीच अर्थ नसतो, हे सुरुवातीला लक्षात आले नसले तरी शेवटी शेवटी यायला काही हरकत नसावी. प्रवचन, किर्तन, सत्संग, सभा, संमेलने, सांस्कृतिक उपक्रमात सहभागी अवश्य व्हा. पण आंधळे अनुयायी होण्याचे मात्र टाळले पाहिजे. आपल्या देहाला एवढे स्वस्त का आणि कशासाठी करायचे? हा प्रश्न असे निर्णय घेण्यापूर्वी स्वतःला विचारता आले पाहिजे. याशिवाय प्रत्येक वेळी काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर या सहा शत्रूंना (षड्रीपूंना) दूर ठेवून निर्णय घेतला तर सदाअण्णावर जो पश्चात्ताप करण्याची वेळ आली. ती आपल्यावर येणार नाही. आपल्या वाढत्या वयात मी वृद्ध नसून जेष्ठ आहे. हे आपल्या वर्तनातून सिद्ध होते. बरेचदा आपण स्थितप्रज्ञ असणे, हे सुद्धा जेष्ठत्वाचेच लक्षण आहे.



# जवळीकीची मानसशास्त्रीय उकल

सकारात्मकतेचे तत्वज्ञान
डॉ. नितीन ह. देशपांडे
deshapandenh@gmail.com

सकारात्मकतेचे तत्वज्ञान २३१



मागील लेखाचा शेवट आपण जवळिकीशी असलेल्या सहा आव्हानांनी संक्षिप्तपणे केला होता. त्यांवर थोडी विस्तारपूर्वक चर्चा करू या म्हणजे उपचारांचे मार्ग मनाला पटत जातील. अनुभव, ते कोणत्याही वयातील असोत आपल्याला बरेवाईट हादरे देत असतात. सध्या बदलापूरची घटना गाजते आहे, त्याही आधी कोलकोता येथील वैद्यकीय क्षेत्रातील महिलेच्या निर्घृण हत्येबद्दल खूप गदारोळ सुरु आहे. राजकारणाचा किंवा अशा प्रकारच्या गुन्ह्यांच्या पार्श्वभूमीचा विचार थोडा बाजूला सारू, पण आघात झालेल्या व्यक्तीचे भावी आयुष्य निर्वेध असेल याची कोण खात्री देईल?

बालपणी भावनिक दृष्ट्या एकाकी पडणे, वडीलधाऱ्यांच्या दुर्लक्ष होणे आणि सातत्य नसलेली काळजी घेतली जाणे याचा एकत्रित परिणाम भावविश्वावर होतो असं

बोवेलबी यांचे १९६९ चे संशोधन सांगते आणि त्याला माईन व सॉलोमन यांनी १९९० मध्ये दुजोरा दिलेला आहे. अशा परिस्थितीतून गेलेल्या बालकांना मग कोणावरही विश्वास ठेवणे अवघड जाते, भावनांच्या नियमनात गोंधळ उडतो. भविष्यात कोणत्याही नात्याचे सुरक्षित रूप नजरेसमोर आणता येत नाही आणि आयुष्य उध्वस्त होते. नात्यांमध्ये फसवणूक, तडजोडी आणि भावनांचा कोरडेपणा प्रत्ययास आला की माणसे अविश्वासाच्या वाटेने निघतात.त्यांचे वर्तन अशा विषारी वागण्यामधून विचित्र होऊ लागते. फार मनमोकळेपणे वागल्यास गैरसमज संभवतात आणि गैरफायदा घेतला जाऊ शकतो याची असंख्य उदाहरणे आसपास आढळतात. विशेषतः समाजमाध्यमातील स्त्री-पुरुष मैत्रीकडे दूषित आणि पूर्वग्रहाच्या नजरेतून बघितले जाते. अशी व्यक्ती सहजासहजी उपलब्ध आहे असे गैरसमज वाढत जातात.विशेषतः एकाकीपण वाट्याला आले तर अशी माणसे अलिप्त होतात, कोरडी होत जातात, कोणातही गुंतत नाहीत. त्यांना कायम अस्वीकाराची भावना खात असते, कोणाशीही जवळीक नकोशी होते आणि दुखावले जाण्याचे भूत त्यांच्या मानगुटीवर बसते. विश्वासार्हतेचे बंध विकसित होत नाहीत. मग ते स्वतःलाच कुरवाळत बसतात आणि मनातील अविश्वास दूर करण्यात असमर्थ ठरतात.

नजरेसमोर आदर्श असणे हे जवळीकीची पायाभरणी ठरते असं फीनी,कॉलिन्स आणि वॉटर्स यांचे मत आहे. सकारात्मक प्रारूप नजरेसमोर असल्याविना विश्वासार्हता कशी विकसित करायची, खुल्या संवादाचे महत्व काय असते आणि नात्यांमधील भावनिक गुंतवणूक कितपत असावी याचे ठोकताळे लागत नाहीत. चिंता, व्यक्तिमत्वातील विकृती अशा प्रवृतींशी जुळवून घेणे अवघड जाते. मानसिक स्वास्थ्य हमखास स्व-प्रतिमा, भावनांशी खेळ तसेच नात्यांमधील वैविध्य यांच्या समुच्चयाने प्रवास अवघड करीत असते. तिथे स्थैर्य संभवत नाही.

सातत्याने ताणांशी सामना (उदा. आर्थिक अस्थैर्य, असुरक्षित नाती यामुळे जवळीक स्थापन करणे धोक्याचे वाटत असते. असे ताण मग नात्यांमधील विसंवादाला कारणीभूत ठरतात. ताणांमुळे जन्म घेणारी नकारात्मकता नात्यांना घातक ठरू शकते. अशा आव्हानांचे परिणाम घालवायचे असतील तर जाणीवपूर्वक प्रयत्न, स्व-जागृती, क्वचितप्रसंगी व्यावसायिक मदत हे आपल्या हाती उरते.

**उपाययोजना**

सहा मार्गांनी आपण या समस्यांचे प्रभावी निर्दालन करू शकतो. पाया असावा विश्वासाचा, भावनिक सुरक्षेचा आणि प्रभावी संभाषणाचा म्हणजे शास्त्रीय उत्तरे सापडतात-

**(१) उपचार,समुपदेशन आणि प्रशिक्षण**

एखाद्याला मदत करायची असेल तर त्याचे आघातानंतरचे आडाखे समजून घ्यावे लागतात, अनारोग्याचे आकृतिबंध ताडून बघावे लागतात आणि त्यांची निरामय जोडणी इतरांबरोबर करावी लागते. मित्रांचे एक उदाहरण घेऊ या म्हणजे मित्रांचे साहचर्य एखाद्या उपचारासारखे कसे काम करते ते सहज ध्यानी येईल-

उपचारांमधून समस्यांना उत्तरे सापडतात. मित्रांशी गप्पा मारल्या की शीण जातो. भलेही दरवेळी त्याच्याजवळ वेळ अथवा ऊर्जा नसेल. उपचारांमध्ये विविध तंत्रे अवलंबिता येतात. मित्रांचीही वेगवेगळी उत्तरे देण्याची क्षमता असते. उपचार जसे निर्णायक तरीही व्यक्तिसापेक्ष असतात तसे मित्रांचे असते. मित्र आधारस्तंभ असतात आणि त्याचवेळी गुप्तताही बाळगू शकतात. मानसिक उपचारांमध्ये मित्र अधिक मोलाची भूमिका बजावू शकतात. मित्रोपचाराप्रमाणेच निसर्गोपचार (हरितोपचार), संगीतोपचार आपल्या दुखऱ्या नसांवर हळुवार, अलगद उपाय ठरतात आणि जखमा बऱ्या करतात.

**(२) स्व-करुणा**

आपल्यातील अधीरता कमी करण्याच्या कामी मनानुभूतीचा सराव आणि स्व-करुणेचा अभ्यास येतो असं काबत-झिंन यांच्या २००३ च्या संशोधनाने दाखवून दिले आहे. एकदा विचारांचा मागोवा घेण्याची सवय जडली आणि भावनांचा त्रयस्थ धांडोळा घेता आला की नियमन सहज जमते. कणव स्वतःबद्दलची कठोर टीकेची धार बोथट करण्यास मदत करते आणि स्व-सम्मानाच्या वाटेला नेते.

**(३) प्रभावी संवाद कौशल्ये**

खुला आणि प्रामाणिक संवाद विश्वासार्हतेचा पाया असतो आणि त्यांतून जवळीक साधता येते. सुदैवाने ही कौशल्ये सहजी आत्मसात करण्याजोगी आहेत. सक्रिय श्रवण, सकारात्मकता, आणि निर्विष संभाषण यासारख्या तंत्रांचा प्रभावी वापर करून नात्यांमधील समृद्धी वाढविता येते. विशेषतः दाम्पत्यामधील संवाद अधिक सुरक्षित संभवतो.

**(४) हळुवार निष्ठा जोपासणे**

विश्वास संपादन करणे सोपे नसते. त्यासाठी मोजून मापून पावले टाकावी लागतात. छोट्या-छोट्या कृतींमधून नातं जोपासावं लागतं आणि त्याला रुजवावं लागतं. एका प्रसिद्ध गीताच्या ओळी आहेत-

**बीज अंकुरे अंकुरे,**
**ओल्या मातीच्या कुशीत**
**कसे रुजावे बियाणे**
**माळरानी खडकात**

या गीतात पुढे बीजा हवी निगराणी, हवी मायेची पाखरं असाही संदेश हळुवारपणे पेरला आहे. फीनी आणि कॉलीन्स यांच्या या सूचना आहेत.

**(५) भावनिक आधार यंत्रणा**

आपल्या आसपास भावनिक आधार देणारी खमकी माणसे असावीत हे वाक्य बोलायला सोप्पं म्हणून कदाचित दुर्लक्षिलं जाईल पण संशोधन मानतं की सभोवती सकारात्मक सामाजिक जाळं असलं तर माणसे कोणत्याही ताणांचा सामना करू शकतात आणि त्यांच्या वाईट परिणामांपासून स्वतःची बिनबोभाट सुटका करून घेऊ शकतात. स्नेहीजन, परिवारातील स्वजन सतत भावनिक आधार पुरवत असतात आणि कोलमडून पडण्यापासून सावरत असतात.

**(६) स्व- प्रतिमेची निर्मम झाडाझडती**

रोजनिशी लिहिणे ही खूपच व्यक्तिगत बाब असली तरी त्यांतील सातत्य आपल्या संवेदनांवर जागल्याचं काम करीत असते. आणि त्यांतील धडे जवळीकेचे सेतू घट्ट करीत असतात. आपल्या वर्तनाकडे निरिच्छपणे, दुरून बघणे आपल्याला त्यामागचे साचे आणि संवेदन पारखून घ्यायला भाग पाडते. अंतर्मुखतेच्या टप्प्यावर अधिक जागरूकता निर्माण करते. यामुळे नात्यांची गुणवत्ता सुधारते आणि भावनांचे कल्लोळ शमतात. पर्यायाने कृतार्थ नाती तयार व्हायला मदत होते.

**जवळीकीची मानसशास्त्रीय उकल**

बालपणापासून सुरक्षेचे कवच आईकडे शोधायचे हा मानवी पैलू सर्वविदित आहे आणि मानसशास्त्र तेथूनच सुरुवात करते.कारण काळाच्या ओघात यांच्या कहाण्या बनत जातात.

विश्वासार्ह परतीचा मार्ग शेवटी पालक.च असतात. पण जेव्हा दुर्लक्ष करणारे पालक अथवा घरातील देखभाल करणारे नोकर असतात तेव्हा ते भावनिक ओलावा पुरवू शकत नाहीत, किंबहुना ते उपलब्धच नसतात सावरण्यासाठी. अशी मुलं कदाचित कुढी, अबोल बनतात आणि स्वतःच्या पायांवर पटकन उभी राहतात. आपल्या एकाकीपणाचा तुरुंग स्वतःभोवती बांधतात आणि मग कोणाशीही जवळीक साधायला ते सहसा धजावत नाहीत.

जॉन बॉवेलबी आणि मेरी ऐनवर्थ यांनी १९६० च्या सुमारास मानवी जवळीकेच्या शैलींचे अध्ययन करताना बालकांच्या भावविश्वाची उकल करण्याचा प्रथम प्रयत्न केला. त्यामध्ये त्यांच्या लक्षात आले की लहानपणीचे परावलंबित्व अधिक गहन आणि गूढ असते. त्याचा सखल अभ्यास १९८८ साली आणि नंतर २०१३ साली झाला, परिणामस्वरूप बालपणीचे नाते चार विविध जवळीकीच्या शैलींना जन्म देते असे गिब्सन यांच्या २०२० साली लक्षात आले.

**(अ) फटकून वागणारे, टाळाटाळ करणारे बाल्य**

स्वतःमध्ये काहीतरी दोष,व्यंग आहे असे मानून चालणारी मंडळी लहानपणापासूनच सहवास टाळण्याकडे, समाजात मिळून-मिसळून वागणे टाळण्याकडे कललेली असतात. त्यांचे विचार आणि वर्तन अस्थिर असते. त्यांच्यात खालील छटा प्रामुख्याने आढळतात-

१) मागे हटणारी
२) भावनिक कोरडेपणामुळे अंतर राखणारी
३) जवळीक न भावणारी
४) पूर्णतया स्वायत्त
५) जोडीदाराशीही जशास तसे वर्तन
६) कोणी अवलंबून राहिले की दबकणारी

परिणामस्वरूप अशा व्यक्ती नात्यांमध्ये भावनिक वा शारीरिक गुंतवणूक करायचे टाळतात.

**(ब) घाबरट (अव्यवस्थित, गबाळा)**

ज्या व्यक्तीच्या अविश्वास दाखविणारी, बेभरवशाची, व्यसनी किंवा भावनिक दृष्ट्या आजारी मंडळी लहानपणीच वाट्याला आली असतात ती व्यक्ती घाबरट होते. मग सगळ्याच नात्यांमध्ये हा तराजू वापरला जाण्याची शक्यता असते.

**अशा व्यक्ती-**

१) स्वतःला कुचकामी समजत असतात
२) नात्यांमध्ये द्विधा असतात
३) अति विचक्षणा करणाऱ्या असतात
४)छोट्या-छोट्या घटनांकडेही भिंगातून विश्लेषणात्मक बघतात.
५) निसर्गतः कोणावरही भरवसा करायला धजावत नाहीत.
६) कोणीतरी फसवणूक करणार या विचारात असतात.

बहुतांशी यांच्या वाट्याला बालपणी कौटुंबिक हिंसाचार अथवा लैंगिक अत्याचार आला असण्याची शक्यता असते आणि म्हणून ते कायम दडपणाखाली असतात. काय होतंय,ते सांगायला धजत नाहीत.

**(क) धास्तावलेलं बालपण**

पालकांच्या वर्तनातील धरसोड, सातत्याचा अभाव यामुळे मुले बालवयात धास्तावतात आणि गैरहजर राहायला शिकतात. त्यांच्यामध्ये दिसून येणारी काही लक्षणे

१) स्वार्थत्यागाकडे कल, इतरांना संतुष्ट करणे
२) टाळले जाण्याचे भय
३) एकाकी पडण्याचे, नकाराचे भय
४) नात्यांमध्ये सदैव पडते घेण्याचा कल
५) नाती जोपासण्यासाठी स्वतःकडे दुर्लक्ष

**(ड) सुरक्षित बाल्य**

पालक सदैव उपलब्ध असणे आणि त्यांचा सातत्याने मिळणारा आधार अशा बालकांना निर्धास्त ठेवतो.

**काही लक्षणे-**

१) नात्यांमध्ये सुरक्षित
२) आधार देणारे, खुला स्वभाव असलेले आणि सदैव उपलब्ध असणारे
३) वरील तिन्ही प्रकारांमधील बाल्यावस्थेला समजून घेत मदत करणारे

आपली जवळीकीची शैली ओळखण्यासाठीची प्रश्नावली आणि मुलाखतीचे तंत्र पुढील भागात विचारात घेऊन या.

---

# श्रावणी सोमवारची शिवामूठ सातू



आजीचा बटवा
नारायण कारंजकर
भ्र. ९४२३७५८४०१



पाचव्या श्रावणी सोमवारी श्री महादेवाच्या पिंडीवर सातूची शिवामूठ अर्पण करतात. दर्श पिठोरी अमावास्येस बैल पोळा आहे. सोमवारी अमावास्या असून मातृदिनही आहे. या दिवशी दर्भाहरण करतात. तांदूळ, तीळ, मूग व जवसानंतरची ही पाचवी शिवामूठ सातूची असते. सातू विषयी अनेकांना माहिती नाही. सातू कसा असतो. त्याचे औषधी उपयोग काय असतात? याची माहिती अशा प्रसंगातून मिळू शकते.

सातू हे गव्हाच्याच जातीतील धान्य आहे. सातूच्या क्षुपापासून काढलेला क्षार म्हणजे 'यवक्षार'. सातूला बार्ली असेही म्हणतात. सातूला सत्तूही म्हणतात. सतू हा प्रथिनांचा समृध्द स्त्रोत आहे. प्रत्येक शंभर ग्रॅम सातूमध्ये २० ते २५ ग्रॅम प्रथिने असतात. सातूचे पीठ आरोग्यदायी अन्न मानले जाते. गुजरात, बिहार, उत्तर प्रदेश तसेच महाराष्टाच्या विदर्भ भागात सातू अन्न म्हणून खाल्ले जाते.

सातू थंड, जठराग्नि वाढविणारा, पित्तशामक, वायू व कफनाशक आहे. सातूची चपाती रूचकर पचायला हलकी व मधुमेह आजारात गुणकारी आहे. मेद, चरबी कमी करण्यासाठी सातूची भाकरी खातात. लघवी साफ होण्यासाठी सातू फायदेशीर आहे. तृष्णा, दाह, त्वचारोग, जखमेवर सातू लाभप्रद आहे. आतड्यांसंबंधातील विविध समस्या सातूच्या सेवनाने दूर होतात.

सातूचे पीठ तयार करताना त्यात गहू, जव, हरभऱ्याची डाळ घालून लालसर खरपूस भाजतात. त्यात सुंठ, जिरे, विलायची टाकतात. हे मिश्रण दळले की सातूचे पीठ तयार होते. हे पीठ तयार करताना चुलीचा वापर केला जातो. या पीठापासून थालीपिठ तयार करताना चुलीचा वापर केला जातो. या पीठापासून थालीपिठ, धपाटे करतात. यज्ञ, आहुतीसाठी समिधा म्हणून सातूचा उपयोग हवनात केला जातो. सातूचे शीत, रूक्ष, रक्तशोधक, पित्तहन, मेहहन असेही गुणधर्म आहेत. व्रण, कुष्ठरोग, त्वचारोग, मेदरोग, पीनस, श्वास, कास, उरूस्तंभ या विकारात सातू गुणकारी आहे.

सातूपासून बनविलेला यवक्षार हा उष्ण, वातानुलोमक, स्वंदजनक, मूत्रजनक या गुणांनी युक्त असून अश्मरी, ह्र्द्यरोग, कास, प्लीहा रोग, अर्श (मूळव्याध) रोगावर गुणकारी आहे. मधुमेही रूग्णांनी सातूची भाकरी खावी. त्यामुळे मूत्रातून जाणारी साखर कमी होते. जुनाट सर्दी, दमा, खोकला यावर सातू उपयुक्त आहे. दाह, तृष्णा, रक्तपित्त यावर सातूचे पीठ पाण्यात कालवून पिण्यास देतात. सातूची पेज अशक्त, कृश मुलांना उपयोगी पडते. मुले सशक्त बनतात. भाजल्यामुळे जखमा झाल्यास त्यावर सातूच्या पिठाचा लेप करतात. अपचन व काविळ आजारांत यवक्षाराचा उपयोग होतो. यवक्षाराने दमा, खोकला कमी होतो. सातूची ही शिवामूठ श्री शिवपिंडींवर अर्पणश.

!! ओम नमः शिवाय!!


---

# ग्रामीण वेदनांचा लेखाजोखा; अर्धा कोयता

पुस्तक परिक्षण
अलकनंदा घुगे आंधळे

उसतोड कामगारांशी संबंधीत अर्धा कोयता हा शब्द अलकनंदा घुगे यांचा 'अर्धा कोयता' हा कथासंग्रह वाचतांना खऱ्या अर्थाने उमजत जातो. परिस प्रकाशनने प्रकाशित केलेल्या या संग्रहात एकूण १८ लघुकथा असून सर्वच कथा ह्या कष्टकरी, मजूर, ऊसतोड कामगार अशा आर्थिक परिस्थितीने गांजलेल्यांच्या आहेत. या कथांची मांडणी व संवादासाठी वापरलेली ग्रामीण भाषा, कथेचा गाभा, कथेतील प्रसंग वर्णन या सर्वच गोष्टींनी कथा परिणामकारक झालेल्या आहेत.

या कथांमधील पात्र सर्पदंशमधील सर्जा, अफवेच पीकमधील अंक्या, शिक्षा कथेतील धुरी, आळमधील संपत कथा संपते, पुस्तक वाचून संपते तरी आपल्या मनावर, सद्सदविवेक बुध्दीवर घणाघाती घाव घालत असतात. या कथांमधील वातावरण निर्मिती, संवाद, भाषा, मतितार्थ सारेच सखोल, सहज व सुंदर तसेच समजण्यास सोपे. प्रसंग उभारणी अगदी परिणामकारक आहे. या संग्रहातील कथांचे विषयही सर्वसामान्यांच्या आयुष्याशी निगडीत आहेत. त्यामुळे ह्या कथा वाचताना आपण आपल्याच माणसांबद्दल वाचतोय ही भावना बळावत जाते आणि वाचक कथानकाशी एकरूप होत जातो.




छेड या कथेतील विषयही तसाच. गंभीर पण सवयीने अंगवळणी पडलेला. आजही खेड्यापाड्यातच नव्हे तर शहरातही हे प्रकार सर्रासपणे सुरू आहे. पिन्या, दसऱ्या, बाल्यासारखी मुले वळणा वळणावर उभी राहून मुलींचीच नाही तर स्त्रीयांची पण छेड काढत असतात. मग काही जणी रस्ता बदलतात, काही घरचे सोबत आणतात. खूपच कमी जणी त्यांना वठणीवर आणतात पण आजही खेड्यांमध्ये साधासरळ मार्ग अवलंबला जातो. दुर्गा, सीता, मिना, तारा, सुनिता यां सारख्या मुली कोवळ्या वयात बोहल्यावर चढविल्या जातात.ही कथा वाचताना असे कितीतरी चेहरे डोळ्यासमोर तरळून जातात. हीच लेखिकेच्या लेखणीची ताकद आहे. यातील अशा अनेक कथांचे कथानक आपल्या आसपास घडत असल्याचे आपल्याला जाणवते. लेखिकेचा भवताल तिच्या लेखणीतून उतरलेला आहे. ही पात्र आपल्यातीलच आहेत.

ग्रामीण भाषेचा लहेजा संवादाची गोडी वाढवतो. शहरातील झगमगाटात जगणारे आपण कधीतरी या ग्रामीण जीवनाशी जोडलेलो असतो. तेथील शेतकरी, शेतमजूर, भरकटलेले तरूण तसेच ध्येयवेडे तरूणही आपण जवळून पाहिलेले असतात.या कथा वाचताना त्या अनुभवांची पुन्हा एकदा उजळणी होते.

आळ या कथेतील संगी व मंदी या मैत्रिणींमधली इर्षा संगीच्या कुंकवाचा संपतचा जीव घेऊन जाते. तर यशोदा या कथेतील यदोदा हीची ममता पैशांच्या चकाचोंदमध्ये भरडली जाते. पैशांना महत्व देणारी मुले व सुना यांना वाटणीनंतर आई नकोशी होते व शेवटी आयुष्यभर ऐशोआरामात राहिलेली यशोदा आयुष्याच्या संध्याकाळी वृध्दाश्रम जवळ करते. नकोशी या कथा मात्र नकारात्मकते कडून सकारात्मकतेकडे प्रवास करते. तुळसा शेवटी नकुशी या आपल्या सावत्र मुलीचा मुलगी म्हणून स्वीकार करते.

नकुशीची नक्षत्रा होते. यातील प्रत्येक कथा आपला भवताल प्रतिबिंबित करते.सकारात्मक व नकारात्मक अशी दोन्ही कथाबिज या कथांमध्ये येतात. त्यामुळे पारंपरिक व्यवस्थेने पिचलेली ही समाजव्यवस्था नकुशी या कथानकात सकारात्मकेने आधुनिकीकरणाकडे वळतांना दिसते. या कथांमधील संवादाची भाषा, शब्द, मांडणी, कथेतील पात्रांच्या भावना जशा आहेत तशाच पोहचवतात. लेखिका अगदी सुक्ष्मपणे सामाजिक, कौटुंबिक, ग्रामीण व्यवस्थेकडे बघते व स्वतः अनुभवल्या सारखी मांडते. म्हणूनच ते काळजाला भिडते. अगदी साधी सोपी भाषा, सरळ मांडणी, परिचयाचे संवाद यामुळे लिखाण थेट भिडते. समजून घ्यायला अगदी सामान्य माणसाला पण सोपे जाते. म्हणूनच या कथा वाचकांच्या मनावर राज्य करताहेत. या संग्रहाची ओळख असलेली कथा अर्धा कोयता वाचतांना ते प्रसंग अगदी डोळ्यांसमोर उभी राहतात. ऊसाच्या मोळ्या वाहून वाहून कांताचा नवरा लक्ष्मणच्या मेंदूला रक्तपुरवठा करणारी नस फाटते व त्याचा एक हात निकामी होतो.

घरातील कर्ता पुरुषच असा अधू झाल्यावर कांता अर्धा कोयता घेऊन इतर कुटुंबांसोबत ऊस तोडणीला जाते. शेवटी एकटी बाई मुकादमाच्या नजरेत भरते.पण आपली अब्रू वाचवताना कांताने घेतलेले दुर्गेचे रूप इतर कोप्यातील बायकांचे पण धैर्य वाढवते.हे प्रसंग वाचताना अंगावर येणारे शहारे मन सुन्न करतात. हे साधण्यात लेखिका अलकनंदा या यशस्वी झाल्या आहेत.

मंगळसूत्र कथेतील आप्रुगी, चंद्रा व माणिक असा त्रिकोण बऱ्याचदा बघायला मिळतो. पण जेव्हा सवत प्रेमातील वाटेकरी होता होता कष्टाच्या मोबदल्यातही वाटेकरी होते तेव्हा होणाऱ्या मानसिक वेदना, आप्रुगीचे भावविश्व लेखिका खूप सुंदर रितीने संयमित पणे मांडते. कुठेही नात्यातील बिभित्सता उमटून येत नाही. असा संयमीपणा या कथांना वेगळ्याच उंचीवर नेऊन ठेवतो.

या संग्रहातील प्रत्येक कथा अशी उंची गाठते. या कथा माणसातील माणुसकीला झिंझाडून ठेवतात. माणसाचे मेंदू,मन व ज्ञानेंद्रिये यांच्यावर कुठे आधुनिकतेची तर कुठे अंधश्रद्धेची किंवा समाजव्यवस्थेची झापडे बसलेली आहेत. त्यामुळे नाती कमकुवत व कुटुंब व्यवस्था डळमळीत होत चालली आहे. हे सार या कथांमध्ये ठासून भरलेले आहे.

या संग्रहातील १८ ही कथा या शेतकरी, कष्टकरी, गरीब, मजूर, स्त्रीपुरूष यांच्या विविध समस्यांवर प्रकाश टाकतात. पैशांचा अभाव, शैक्षणिक कमतरता, व्यसनाधीनता, अज्ञान, शंकेखोरपणा, आर्थिक विषमता, कौटुंबिक वादविवाद या घटकांचा ग्रामीण जीवनावरती किती दाहक दुष्परिणाम होतात हे या कथा सांगण्यात यशस्वी झाल्या आहेत.

परिस प्रकाशनने प्रकाशित केलेला हा संग्रह खूपच सुंदर व वाचनिय झाला आहे.अरविंद शेलार यांचे समर्पक मुखपृष्ठ, प्रशिध्द कथाकार बाबाराव मुसळे यांची समर्पक प्रस्तावना या संग्रहाच्या सौंदर्यात भर घालतात.लेखिकेचा हा पहिलाच कथासंग्रह आहे. अजून बरेच काही लिखाण त्यांच्या हातून व्हायचे आहे.त्यांना भावी लिखाणासाठी खूप खूप शुभेच्छा.

**संग्रह** - अर्धा कोयता
**लेखिका**- अलकनंदा घुगे-आंधळे

---

## प्राजक्त..!



शुभ्र फुले केशरी दांड्या
सडा अंगणी पडलेला
ओढून पांढरी चादर
कोण असे पहुडलेला...


उधळून असे येण्याचा
स्वभाव मला पटलेला
सकाळी पाहता तुजला
अंतरी मी मोहरलेला...

कसा करावा स्पर्श तुला
संभ्रम मज पडलेला
नाजूकता ही पाहता
गोंधळ माझा उडालेला...

लळा तुझा असे मजला
बालपणी तो लागलेला
पूजेसाठी वेचून फुले देताना
ती मम मातेला...

प्राजक्तासम आठवणी ठेवा
मस्त सांभाळलेला स्पर्श
तुझा होता मजला
सहज येती भेटायला...

आठवणी अजून तिच्या
घाव ह्रदयी जपलेला
पाहून फुल प्राजक्ताचे
अंतरी मी भांबावलेला...



बाबा देशपांडे

# वाढत चालला आहे अंतराळातला कचरा



अवकाशात आज अनेक टन कचरा भ्रमण करत आहे. अर्थात तो निर्माण करणाऱ्या देशांमध्ये भारतही आहे. जमिनीवरील कचरा हा जसा धोका निर्माण करत असतो, तसा अंतराळातील कचराही मोठा धोका निर्माण करत असतो. युरोपियन अवकाश संस्थेने नुकत्याच प्रसिद्ध केलेल्या 'अवकाश पर्यावरण अहवाल २०२४'मध्ये पृथ्वीच्या चारही बाजूंना अवकाश कचरा जमा झाला असल्याबद्दल विशेष लक्ष वेधले आहे.

लक्ष्यवेध

डॉ. सुरेश नाईक

ज्येष्ठ वैज्ञानिक

४ ऑक्टोबर १९५७ रोजी सोव्हिएत रशियाने 'स्फुटनिक' हा पहिला कृत्रिम उपग्रह अंतराळात पाठवल्यानंतर अवकाशयुगाला प्रारंभ झाला. त्या क्षेत्रात स्पर्धा सुरू झाली. अनेक देश अवकाशात उपग्रह पाठवू लागले. त्यांचे कार्य संपल्यानंतर अंतराळातच अखंड किंवा अवशेष रूपात साठून राहात असल्यामुळे हे उपग्रह एक प्रकारचे अनावश्यक साहित्य बनू लागले. त्यामुळे अवकाशात मानवनिर्मित कचरा साठायला सुरुवात झाली.

उपग्रह अंतराळात पाठवण्यासाठी वापरात येणारे प्रक्षेपकाचे म्हणजे रॉकेटचे भाग, कार्यकाल संपलेले आणि भरकटलेले कृत्रिम उपग्रह, स्पेसवॉक करताना अंतराळवीरांच्या नियंत्रणातून सुटलेल्या वस्तू, उपग्रहांची टक्कर झाल्यानंतर निर्माण झालेले सुटे भाग इत्यादी कारणांनी निर्माण होणारा अंतराळातील कचरा ही एक मोठी समस्या निर्माण झाली आहे. आज एक सेंटिमीटरपेक्षा लहान आकाराच्या १३ कोटी तुकड्यांचा कचरा अवकाशात सेकंदाला सात ते आठ किलोमीटर या वेगाने पृथ्वीभोवती भ्रमण करत आहे. एक ते दहा सेंटीमीटर आकाराचे ९ लक्ष तुकडे अंतराळात पृथ्वीभोवती भ्रमण करत असल्याचे आढळून आले आहे तर दहा सेंटीमीटरपेक्षा जास्त आकाराचे ३४ हजारांपेक्षा अधिक तुकडे कचऱ्याच्या स्वरूपात अवकाशात पृथ्वीभोवती फिरत आहेत.

सुनीता विल्यम्स यांच्या हातातून निसटलेला कॅमेरादेखील आता अंतराळात कचरा म्हणून अनंतकाळापर्यंत फिरत राहणार आहे. पृथ्वीभोवती फिरत असलेल्या कृत्रिम उपग्रहांपैकी सुमारे दोन हजार उपग्रह सक्रिय आहेत तर सुमारे पाच हजार कृत्रिम उपग्रह निष्क्रिय म्हणजे निकामी स्वरूपात आहेत. त्या पोकळीमध्ये ते अनंत काळपर्यंत तसेच पृथ्वीभोवती भ्रमण करत राहतील. पृथ्वीपासून कमी उंचीत भ्रमण करणारा कचरा हा आठशे ते हजार किलोमीटर उंचीवरून पृथ्वीभोवती फिरतो आहे. आज प्रत्यक्षपणे पृथ्वीला त्या कचऱ्याचा त्रास होत नाही. कारण तो पृथ्वीपासून वर अवकाशात ८०० किलोमीटरवर आहे. त्यातून रेडिएशन होत नसून त्यामुळे आपल्या वातावरणाला आज तरी काही धोका संभवत नाही. परंतु या वाढत्या कचऱ्यामुळे हळूहळू रॉकेट्सचे लाँचिंग करणे कठीण होत जाईल. सतत फिरणाऱ्या अडथळ्यांमुळे त्यांचा प्रवास धोकादायक होत जाईल. चांगल्या उपग्रहांशी त्यांची टक्कर होऊ शकेल. तशा काही घटना घडल्या आहेत किंवा थोडक्यात टळल्या आहेत. त्यामुळे चांगला उपग्रह बरबाद होऊ शकतो किंवा अजून बऱ्याच मोठ्या प्रमाणात कचरा निर्माण होऊ शकतो. १० फेब्रुवारी २००६ रोजी अमेरिकेचा वापरात असलेला इरिडियम-३३ हा दळणवळण उपग्रह आणि रशियाचा कार्यकाल संपल्यामुळे निकामी झालेला कॉसमॉस-२२५१ या दोन उपग्रहांची पृथ्वीपासून ७८९ किलोमीटर उंचीवर टक्कर झाली होती. यामुळे १७४० पेक्षा जास्त तुकड्यांचा कचरा अवकाशात इतस्तत: पसरला होता. वापरात नसलेल्या रशियाच्या उपग्रहाची कक्षा बदलली गेल्याने हा अपघात झाला होता.

१२ जुलै १९८९ रोजी इंग्लंडने अवकाशात पाठवलेला ऑलिम्पस-१ हा उपग्रह एका छोट्या लघुग्रहाचा तुकडा आदळल्याने निकामी झाला होता. २४ जुलै १९९६ रोजी कृत्रिम हेरगिरी करणारा फ्रान्सचा उपग्रह एरियन रॉकेटचा तुकडा आदळल्याने निष्क्रिय झाला होता. तर सप्टेंबर १९९१ मध्ये रशियाच्या कॉसमॉस-९५५ या उपग्रहाचा कचरा मार्गात आल्यामुळे अपघात टाळण्यासाठी अमेरिकेच्या स्पेस शटलला जागा बदलावी लागली होती.

अंतराळातील कचऱ्याचे व्यवस्थापन करायचा प्रयत्न आंतरराष्ट्रीय पातळीवर केला जात आहे. त्यात आपला इस्रोदेखील भागीदार आहे. आपला देश दोन प्रकारचे उपग्रह सोडतो. इन्सॅट मालिकेचे उपग्रह भूस्थिर कक्षेमध्ये सोडले जातात. पृथ्वी पूर्वेकडून पश्चिमेकडे फिरते आणि २४ तासात एक परिवलन पूर्ण करते. आपण सोडलेले उपग्रह पश्चिमेकडून पूर्वेकडे फिरतात आणि ३६ हजार किलोमीटर्सची प्रदक्षिणा पूर्ण करतात. त्यामुळे आपण पृथ्वीवरून पाहिल्यास ते स्थिर दिसतात. कारण तो वेग तुलनात्मकदृष्ट्या शून्य असतो. त्यामुळे त्यांना भूस्थिर कक्षेमधील उपग्रह म्हटले जाते. हे इन्सॅट मालिकेतले भूस्थिर उपग्रह टीव्ही सिग्नल्स, फोन आणि इतर संवादसाधनांच्या मार्गाने आंतरदेशीय आणि आंतरराष्ट्रीय संपर्क क्षेत्रासाठी कार्य करतात. या इन्सॅट उपग्रहांचे आयुष्य १५ वर्षे असते. कधी कधी सूर्याच्या गुरुत्वाकर्षणामुळे उपग्रहांची दिशा थोडी भरकटते. अशा वेळी पृथ्वीवरून आज्ञा देऊन ती दुरुस्त केली जाते. अर्थातच त्यावेळी थोडेफार इंधन वापरले जाते. १५ वर्षांच्या काळात हे इंधन संपत येते. तो उपग्रह कचरा म्हणून जाहीर केला जातो. हा कचरा झालेला उपग्रह त्यात उरलेल्या इंधनाचा वापर करून भूस्थिर कक्षेच्या हजारो किलोमीटर बाहेर फेकला जातो. या कक्षेत फक्त मृत उपग्रह फिरत असतात. त्याला उपग्रहांची स्मशानभूमी म्हणतात. ही कक्षा लोअर ऑर्बिटमध्येच असते. लोअर ऑर्बिट म्हणजे पृथ्वीपासून १६० ते २००० किलोमीटर उंचीपर्यंतची कक्षा. ही कक्षा भूस्थिर कक्षेच्या खूप वर असते. या प्रकारे आपण आपल्या कचऱ्याचे व्यवस्थापन करतो. रिमोट सेन्सिंग उपग्रह लोअर ऑर्बिटमध्ये म्हणजे पृथ्वीपासून सुमारे ८०० किलोमीटरपर्यंत स्थिर केले जातात. या उपग्रहांचे इंधन संपते तेव्हा त्यांना खाली खेचले जाते. हे उपग्रह पृथ्वीच्या वातावरणात शिरतात त्यावेळी जळून नष्ट होतात. आपण उपग्रहांचे प्रक्षेपण करताना सोडत असलेल्या अग्निबाणाचे तीन किंवा चार टप्पे असतात. प्रत्येक वेळी ज्वलन झाले की तो भाग रॉकेटपासून वेगळा होतो आणि पुढच्या टप्प्याचे ज्वलन सुरू होते. सर्वात वरचा टप्पा (ज्याला चरण म्हणता येईल) उपग्रहाबरोबर फिरत राहतो. प्रक्षेपण झाल्यावर त्याचे काम संपून कचऱ्यात रूपांतर झालेले असते. पण इंधन शिल्लक असल्यामुळे हा धोकादायक असतो. तो इतर कोणत्याही कचऱ्यावर किंवा उपग्रहावर आदळल्यास स्फोट होतो आणि असंख्य तुकडे होऊन आणखी मोठ्या प्रमाणात कचरा निर्माण होतो. त्यासाठी आपण प्रक्षेपण झाल्यानंतर त्या चरणातील इंधन काढून टाकतो. त्यामुळे त्यातील धोका संपतो. अवकाशातील कचऱ्याच्या धोक्याची आधीच सूचना मिळावी यासाठी इस्रोने स्वत:चे एमओटीआर हे रडार विकसित केले आहे. २०१५ पासून हे रडार काम करत आहे.

एकाच वेळी ३० सेंटीमीटरपर्यंतच्या १० वस्तू ८०० किलोमीटर अंतरावर असताना टिपण्याची क्षमता या रडारमध्ये आहे. ५० सेंटीमीटरपर्यंतची वस्तू असल्यास हे रडार एक हजार किलोमीटर अंतरावर असतानाच माहिती देते. त्यामुळे योग्य प्रकारची उपाययोजना करणे शक्य होते. अवकाशात कचरा होऊ नये यासाठी विविध संकल्पनांचा विचार केला जात आहे. त्यात पेट्रोलपंपाप्रमाणे इंधन भरू शकणारा एखादा उपग्रह सोडण्याचाही विचार केला जात आहे. अर्थात ते खूप अवघड काम आहे. परंतु संशोधन सुरू आहे. या फिरत्या पेट्रोलपंपांची कल्पना अस्तित्वात आली तर कचरा निर्मितीवर मोठ्या प्रमाणात नियंत्रण करता येईल. कदाचित लवकरच आंतरराष्ट्रीय अवकाश कचरा नियंत्रण कायदा किंवा इतर उपाययोजना प्रत्यक्षात आणल्या जातील. भविष्यात अमेरिका कदाचित चंद्रावर वसाहत स्थापन करेल. भारत, जपानसारखे देश अवकाशात मानवी मोहिमा आखतील. चीनचे स्वत:चे अवकाश स्थानक बांधून पूर्ण होईल. स्पेस टुरिझमची सुरुवात झाली आहे. कदाचित पुढील काळात त्याचे प्रमाण अधिक वाढेल. असेही घडू शकेल की, प्रवासी विमानांच्या उड्डाणांप्रमाणे अवकाश मोहिमा आखल्या जातील. अर्थातच यामुळे अवकाशातील कचऱ्यामध्ये भरच पडत राहील. या कचऱ्यामुळे भविष्यातील अवकाश मोहिमांना निर्माण होणारा धोकाही वाढत जाईल. त्यामुळे अवकाश कचऱ्याच्या व्यवस्थापनावर सर्वच देश गंभीरपणे विचार करत आहेत. (लेखक ज्येष्ठ अंतराळ संशोधक आहेत.)

# याला छळ नाही, तर काय म्हणायचे?



समाजभान

शोभा फडणवीस

नुकतीच एका वृत्तपत्रात मुलाखत छापून आली. त्यांच्याबद्दल माझ्या मनात नितांत आदर आहे, त्यांच्या विद्वतेबद्दल अभिमान आहे. त्यांचे लिखाण, त्यांची साहित्यावरील पकड हे मला ज्ञात आहे. परंतु त्यांनी माजी पंतप्रधान इंदिरा गांधींनी आणिबाणीत कुणाचाही छळ केला नाही, हे जे काही सांगितले, ते ऐकून-वाचून मात्र खूप दु:ख झाले.

आणिबाणीत लाखो लोकांना अटक झाली. कुणी १९ महिने, कुणी १६ महिने 'मिसा'त होते तर हजारो लोक सत्याग्रही म्हणून होते. प्रत्येकाचा छळ, प्रत्येकाचे दु:ख, उद्ध्वस्त झालेले संसार, कुटुंबाचे झालेले हाल हे आठवले तरी अंगावर काटा उभा राहतो. असे असताना छळ केला नाही असे म्हणणे म्हणजे आमच्या जखमेवर मीठ चोळण्यासारखे आहे. आदरणीय जयप्रकाश नारायण यांनी दिल्लीला सर्वपक्षीय मोर्चा काढला होता. त्यावेळी मी पण हजर होते. त्यांचे भव्य-दिव्य स्वरूप पाहून तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांचे आसन डगमगले व त्यांनी एका रात्रीत आणिबाणी घोषित केली. विरोधातील हजारो नेत्यांना, कार्यकर्त्यांना तुरुंगात टाकले. हळूहळू तुरुंगातील संख्या वाढू लागली. गुन्हा नसताना लोकांना तुरुंगात टाकणे अखंड सुरू झाले.

कोणी पक्षीय असो नसो, कुणी नाव सांगा, त्याला तुरुंगात टाका हे सत्र सुरू झाले. लाखो लोकांना, कोणताही गुन्हा केला नसताना, वॉरंट नाही, गुन्ह्याची नोंद नाही, घरच्यांना न सांगता घरातून पकडून नेणे हा अन्याय नव्हता का? तो आम्ही मुकाट सहन केला. कारण त्यांच्या दृष्टीने आम्ही मोठे गुन्हेगार होतो, आमचा आवाज दाबण्याचा प्रयत्न झाला, ही लोकशाहीची हत्या होती, तर हुकूमशहाचा उदय होता. हे समजण्याइतपत जनताही हुशार झाली होती. भोगलेला छळ, झालेला अपमान, उद्ध्वस्त संसार, संपलेला व्यवसाय हे अन्याय व अत्याचार नव्हते काय? मग छळ झाला नाही हे आपण कसे म्हणू शकतो? १९ नोव्हेंबर १९७५ ला पहाटे ५ वाजता घरी पोलिस गाडी आली. १ पोलिस निरीक्षक, जमादार, ६ पोलिस, २ महिला पोलिस असा ताफा असलेल्या मोठ्या पोलिस व्हॅनमधून, सराईत गुन्हेगारांना पकडतात त्याप्रमाणे, मला घेऊन गेले. मला कुठे ठेवले हे माझ्या घरच्यांनाही एक महिना कळले नाही. हा मानसिक छळ नव्हता का? संपूर्ण दिवस मला मुख्य पोलिस स्टेशनच्या आवारात एका झाडाखाली, एका खुर्चीवर दिवसभर पोलिसांच्या गराड्यात ठेवले.

रात्री मला वर्धेवरून आरक्षण नसलेल्या सेवाग्राम एक्सप्रेसमध्ये बसवले. एवढा मोठा पोलिस ताफा सोबत, जणू अट्टल गुन्हेगाराला पकडले अशा आविर्भावात ते होते. नाशिकला आम्ही सकाळी पोहोचलो. मला महिलांच्या सबजेलमध्ये आणले. तेथे दोन बरॅक होत्या. एका बराकीत अंदाजे १२ ते १४ महिला होत्या. त्यात २ ते ३ खून करून आलेल्या, दोन पागल महिला होत्या. दुसऱ्या बराकीत माझी रवानगी झाली. माझ्या बराकीत दिवसभर ५०० पॉवरचे दोन बल्ब लावले होते. जेवायला ५२ पत्त्यांची भाजी, पोळ्या आणि भात होता. मी ते खाऊ शकले नाही. सायंकाळी ४ वाजता आम्हा सगळ्यांनाच बाहेर काढले. मला पाहून त्या वेड्या महिला माझ्या जवळ आल्या. माझे केस लांब होते. त्यांनी माझी वेणी घातली, माझे हातपाय चेपू लागल्या, मुका घ्यायला लागल्या. मी घाबरले पण नुसती बसून होते. मी काहीच करू शकत नव्हते. याला मानसिक छळ नाहीतर काय म्हणायचे? रात्री ५०० पॉवरच्या बल्बमध्ये राहायचे. त्यामुळे झोप येत नसे. रात्रभर त्या वेड्यांचा गोंधळ, दिवसभर हा तमाशा. त्यामुळे मलाच पागल व्हायची वेळ आली. म्हणून मी अन्न सत्याग्रह सुरू केला. हे पुरुषांच्या सेंट्रल जेलला कळले व त्यांनीही उपोषण घोषित केले तेव्हा चौथ्या दिवशी माझी रवानगी पुणे महिला तुरुंगात झाली.

आम्ही राजकीय कैदी होतो. मग आमचे जेवण हे इतर कैद्यांसारखेच का होते? कच्च्या पोळ्या, शेवटी बुडाला १० ते १२ मूग व जारभर पाणी, भात, रोज कच्च्या टोमॅटोची भाजी हे जेवण असायचे. या जेवणाचा दर्जा कसा होता हे आम्हीच भोगले. सगळ्यात भयानक घटना तर एका सत्याग्रही महिलेच्या बाबतीत घडली. अत्याचारी गुन्हेगारांनाही लाजवेल अशी घटना पुण्याच्या तुरुंगामध्ये घडली. एका सत्याग्रही महिलेचे पती हृदयविकाराने वारले. त्यासाठी तिला सुटी मिळावी म्हणून सर्वांनीच खूप प्रयत्न केले, परंतु जामीन मिळाला नाही. तिची तीन मुलं खूप लहान होती. म्हणून आम्ही पार्थिव तुरुंगापर्यंत आणायला सांगितले. त्यांनी पार्थिव तुरुंगासमोर आणले. आम्ही गेटपाशी गेलो. मुले आईला पाहून टाहो फोडत होती. नवऱ्याचे पार्थिव शरीर समोर होते. ती महिलाही दु:ख आवरू शकत नव्हती, आम्ही सगळ्यांनी जेलरला विनंती केली की, दार उघडून तिला पार्थिवाला नमस्कार करू द्या.! तिच्या मुलांना समजवू द्या, त्या मुलांचे दु:ख आई जवळ आली तर कमी होईल, अशी विनवणी आम्ही सगळ्या म्हणजे त्यात कै. सुमतीताई सुकळीकर, कै. अहल्याबाई रांगणेकर, कै. शांताताई नाईक इत्यादी मोठ्या पदस्थ महिलांनी केली. परंतु तुरुंगाचे गेट उघडले नाही व दाराच्या आतूनच तिने पतीच्या पार्थिवाला नमस्कार केला. दरवाज्याच्या आतूनच मुलांच्या डोक्यावरून हात फिरवला व अचानक दु:खाचा पहाड कोसळल्यामुळे भोवळ येऊन तिथेच पडली. काय चूक होती तिची? देशाच्या स्वातंत्र्यावर, लोकशाहीवर आघात झाला म्हणून सत्याग्रह करायचा हे तर खरे देशप्रेम होते. त्याची एवढी निर्दयी शिक्षा मिळाली.

याला काय इंदिराजींचे प्रेम म्हणायचे की अत्याचार, छळ म्हणायचे, तुम्हीच ठरवा? आमच्या त्यागाला सलाम करता येत नसेल, माहिती न घेता खोटे सांगून जखमेवर मीठ तरी चोळू नका? विद्यमान सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांच्या मातोश्री कै. मालतीताई या आमच्या बरोबर तुरुंगामध्ये होत्या. एक दिवस त्यांना पोटाचा खूप त्रास व्हायला लागला म्हणून मी निरोप पाठवला. डॉक्टरांनी गोळ्या पाठवल्या. त्या गोळ्या मी डॉ. प्रमिला टोपलेंना दाखविल्या, तर त्या गोळ्या पोटदुखी थांबण्याच्या नसून डोळ्यात टाकायच्या कॅप्सूल होत्या. मी डॉक्टरांना म्हटले- "सर, या गोळ्या डोळ्याच्या आहेत." तर ते मला म्हणाले- "डॉक्टर तुम्ही आहात की मी?" मग आम्ही सर्व महिलांनी मिळून आमच्या बरॅकमध्ये त्यांना कोंडून ठेवले. जेलरचा ताफा आला. नंतर परिस्थिती सांगून आम्ही त्यांना सोडले. याला काय म्हणायचे? चुकीचे औषध देऊन आमच्या आरोग्याशी खेळणे म्हणायचे काय? अशी वागणूक आम्हाला मिळत होती. याला छळ, आमच्या जिवाशी खेळणे असे नाही तर काय म्हणायचे, तुम्हीच सांगा? नागपूर तुरुंगात मला भेटायला आल्यानंतर माझ्या मिस्टरांचा अपघात झाला.

माझी मुलं लहान होती. माझ्या मिस्टरांना मेडिकल हॉस्पिटलमध्ये भरती केले होते. त्यांना भरपूर मार लागला होता म्हणून मी दुसऱ्या दिवशी माझे हॉस्पिटलसाठी नाव दिले, तर माझे नाव कापण्यात आले. त्या दिवशी मला जाता आले नाही. पुन्हा मी दुसऱ्या दिवशी माझे नाव दिले, पुन्हा ते कापण्यात आले. मला दोन दिवस दवाखान्यात जाता आले नाही. त्यामुळे मी अन्न सत्याग्रह सुरू केला. तेव्हा तिसऱ्या दिवशी मला दवाखान्यात जाता आले. नंतर मी माझ्या मिस्टरांची ट्रिटमेंट करणाऱ्या डॉक्टरांना माझी परिस्थिती सांगितली. त्यांनी मला वचन दिले, "तुमच्या मिस्टरांची मी पूर्ण काळजी घेतो, तुम्ही काळजी करू नका." आमच्यासारख्या राजकीय कैद्यांना अपमानाची वागणूक पोलिसांकडून मिळायची. वेळेच्या आत गाडीत आम्हाला कोंबायचे, परंतु स्मगलरांना सन्मानाची वागणूक द्यायचे, त्यांना जेवण करू द्यायचे, त्यांच्या नातलगांना भेटू द्यायचे, त्यांच्या वस्तू जेलमध्ये पुरवायचे व सर्वांत शेवटी त्यांची गाडी भरायचे हा गुन्हेगारांचा सन्मान व सज्जनांचा अपमान नव्हता का? हेच अपेक्षित होते का यांना? हा आमचा मानसिक छळ, अपमान का? ज्यांना समाजात सन्मान होता, त्यांना साध्या पोलिसांकडून अपमानाची वागणूक मिळायची, एका गुन्हेगारासारखी, हे या लोकांना माहीत आहे का? ज्या परिस्थितीत आम्हाला ठेवले होते. तो प्रत्यक्ष नरक होता.

उघड्यावर आंघोळ हा आमच्या इज्जतीचा फालूदा होता. आम्ही रोज थोडे थोडे मरत होतो. त्या घाणेरड्या जेवणाने वयस्क व्यक्तीच्या तब्येतीवर परिणाम झाला म्हणून रात्रीचे जेवण सगळ्यांनी बंद केले. ब्रेड व दूध यावर रात्र काढायचो. अहो, याला मानसिक, शारीरिक त्रास देणे, यालाच आपण छळ म्हणतो ना! छळाची व्याख्या दुसरी काय असते? आम्ही गुन्हा तरी कोणता केला होता? त्याची चार्जशीट नाही. कुठले कलम नाही, कोणता वॉरंट नाही. आमची अटक, जेल हे सर्व बेकायदेशीर होते. कोणत्या कायद्याचा आधार याला होता? 'आले राणीचीया मना' असा सगळा स्वत:च्या बचावाचा खेळ होता. परंतु लाखो लोकांचे संसार बरबाद करणारा, लोकांच्या जिवावर उठणारा खेळ होता. देशावर प्रेम करणे, देशवासीयांसाठी काम करणे हा देशद्रोह कसा होऊ शकतो? याही प्रश्नांची उत्तरे द्यायला हवीत?

